पुस्तके मागविण्यासाठी कृपया राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या नजीकच्या कार्यालयाशी संपर्क साधा.

मुख्य कार्यालय


nbt.india
एकः सूते सकलम्

**राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत**
शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
**NATIONAL BOOK TRUST, INDIA**
Ministry of Education, Government of India
नेहरू भवन, 5 इंस्टीट्यूशनल एरिया, फेज-II, वसंत कुंज, नवी दिल्ली - 4110 070 (भारत)
दूरध्वनी : 91-11-26707700 I ई-मेल : office.nbt@nic.in, scoord@nbtindia.gov.in


**एनबीटी मेट्रो पुस्तक विक्री केंद्रे**

- **काश्मिरी गेट दिल्ली मेट्रो स्टेशन**
- विश्वविद्यालय दिल्ली मेट्रो स्टेशन

ई-मेल : nro.nbt@nic.in

**मुंबई**
रवींद्र नाट्य मंदिर, पहिला मजला
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी
प्रभादेवी, मुंबई - 400 025
दूरध्वनी : 022-23720442, 24320380
ई-मेल : nbtindiamumbai@yahoo.com
wro.nbt@nic.in

**बेंगलुरू**
हॉल नं. 1, बीडीए शॉपिंग कॉम्प्लेक्स
बनाशंकरी 2 स्टेज, बेंगलुरू - 560 070
दूरध्वनी : 080-26716303
फॅक्स : 080-26711994
ई-मेल : sro.nbt@nic.in

**कोलकाता**
जलानसेवा ट्रस्ट बिल्डिंग, दुसरा मजला
61, महात्मा गांधी रोड, कोलकाता - 700 009
दूरध्वनी व फॅक्स : 033-22413899
ई-मेल : ero.nbt@nic.in

**चेन्नई**
तळमजला, ईव्हीके संपत बिल्डिंग
डीपीआय परिसर, कॉलेज रोड
नुंगमबाक्कम, चेन्नई - 600 006
ई-मेल : bpc.chennai@nbtindia.gov.in

**हैद्राराबाद**
जी 2-6, तळमजला, ग्रहकल्प कॉम्प्लेक्स
गांधीभवनसमोर, एम.जे. मार्ग
नामपली, हैद्राबाद - 500 001
दूरध्वनी : 040-27077333
ई-मेल : bpc.hydrabad@nbtindia.gov.in

**गुवाहाटी**
असम राष्ट्रभाषा प्रचार समिति बिल्डिंग
डाग क्र. 531, जीएमसी वार्ड क्र.-45,
हेदायतपूर मोजा उलुबाडी
गुवाहाटी - 781 003
ई-मेल : bpc.guwahati@nbtindia.gov.in

**आगरताळा**
(लायब्ररी, पुरा ग्रंथागार)
तळमजला एएमसी, पोलीस स्टेशन पूर्व अगरतळा
उपविभाग आणि उपनोंदणी, सदर पश्चिम
त्रिपुरा
ई-मेल : bpc.agartala@nbtindia.gov.in

**पाटणा**
73/40, अधिकारी निवास
वेली मार्गपाटणा (बिहार)
ई-मेल : bpc.patna@nbtindia.gov.in

**कटक**
उत्कल साहित्य समाज परिसर, टाउन हॉल मार्ग,
तेलंग बाजार, कटक - 753 009
ओडिशा
ई-मेल : pratipada.mohanty504@gmail.com

**एरर्नाकुलम/कोची**
बी 2, रेव्हेन्यू टॉवर, गवर्नमेंट लॉ कॉलेज जवळ
पार्क अव्हेन्यू, एरर्नाकुलम, कोची, केरळ
ई-मेल : nbt.kochi@gmail.com

**लखनौ**
विश्वविद्यालय, मेट्रो स्टेशन परिसर, लखनौ

**www.nbtindia.gov.in**

मराठी प्रकाशन
सूची-पुस्तिका 2021

# 2021
# सूची-पुस्तिका

Let our lives be open books
india@75

# मराठी प्रकाशन

nbt.india
एकः सूते सकलम्

**राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत**
शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

# मराठी पुस्तक-सूची
# 2021

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

Calalogue of Marathi Publications 2021

संचालक, राष्ट्रीय पुस्तक न्यास, भारत
शिक्षण मंत्रालय, भारत सरकार
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज–II
वसंतकुंज, नवी दिल्ली 110070 यांनी प्रकाशित केले.
www.nbtindia.gov.in

Lasertypeset at Mac Script, Pune and
printed at Educational Stores, Ghaziabad (U.P.)

**नोंद : पुस्तकाच्या मागणीची आपूर्ती नवीनतम किमतीनुसार केली जाते.**

# अनुक्रमणिका


*ओळख* 1

आमचा प्रकाशन कार्यक्रम 6

काही नवी प्रकाशने 11

मालिकांनुसार पुस्तकांची सूची 12-124

*भारत-देश आणि लोक* 12

*तरुण भारती* 15

*लोकोपयोगी विज्ञान* 18

*लोकप्रिय सामाजिक विज्ञान* 26

*विविध* 30

*आदान प्रदान* 33

*अक्षर साहित्य* 48

*विश्व साहित्य* 49

*राष्ट्रीय चरित्रमाला* 50

*लोकसाहित्यमाला* 62

*नेहरू बाल पुस्तकालय* 63

*आशिया पॅसिफिक सहप्रकाशन* 103

*सृजनात्मक शिक्षणमाला* 104

*नवसाक्षर साहित्यमाला* 106

*निरंतर शिक्षणमाला* 121

*सुवर्ण जयंती पुस्तकमाला* 124

# ओळख

राष्ट्रीय पुस्तक न्यासची स्थापना 1957 या वर्षी झाली. भारत सरकारने ही संस्था पुस्तके आणि वाचनाची आवड समाजात रुजविण्यासाठी स्थापन केलेली आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र पाच प्रमुख उपक्रमांत विभागलेले आहे : (1) प्रकाशन (2) पुस्तकांचा प्रचार-प्रसार आणि वाचनवृत्तीचा विकास (3) परदेशात भारतीय पुस्तकांचा प्रसार (4) लेखक, प्रकाशकांना सहायता आणि (5) बालसाहित्याला प्रोत्साहन, असे हे उपक्रम आहेत. या कार्यक्षेत्रांचा तपशील खाली दिलेला आहे.

## प्रकाशन

समाजातील सर्व वर्ग आणि वयोगटातील वाचकांसाठी आम्ही बहुविध वाचनीय साहित्य प्रकाशित करतो. यात लहान मुलांसाठी पुस्तके आणि नवसाक्षरांसाठी वाचनीय पुस्तकांचा समावेश आहे. आमच्या विविध मालिकांमधून योग्य दरातील ललित साहित्य आणि इतर पुस्तके हिंदी, इंग्रजी आणि इतर सोळा प्रमुख भारतीय भाषांत प्रकाशित केली जातात. या भाषा याप्रमाणे : असमिया, उर्दू, उडिया, कन्नड, काश्मिरी, कोंकणी, गुजराती, तमिळ, तेलुगू, नेपाळी, पंजाबी, बांगला, मणिपुरी, मराठी, मल्याळम, आणि सिंधी. या व्यतिरिक्त एक प्रयोग म्हणून निवडक बालसाहित्याचा अनुवाद आओ नागा, लिंबू, लेपचा, कोकबोरक, बोडो, नेवारी, भुतिया, गारो, खासी, मिसींग आणि मिझो अशा काही आदिवासी भाषांतून केला जातो.

ज्या पुस्तकांचे प्रकाशन महत्त्वाचे असूनही, सर्वसाधारणपणे भारतात ज्यांच्याकडे दुर्लक्ष होते अशांकडे आम्ही विशेष लक्ष पुरवितो. यात सामान्य वाचकांसाठी लोकोपयोगी विज्ञान आणि अन्य माहितीपूर्ण पुस्तकांचा समावेश आहे, तसेच देशातील विभिन्न पैलूंवरील पुस्तकेही आहेत.

प्रत्येक भाषेतील मूळ आणि अनुवादित पुस्तके व नव्या आवृत्त्यांचा ओघ वाढवून पुस्तकांचा एक संतुलित संच देण्याचा आमचा प्रयत्न बहुतांशी सफल झालेला आहे. आमच्या पुस्तकांच्या विपणनासाठी अभिनव आणि लवचीक धोरण अवलंबून आम्ही देशभर विक्री आणि वितरण व्यवस्थेचे प्रभावी जाळे पसरवत आहोत. पुस्तकांची किंमत परवडणारी असावी आणि ती सुलभतेने उपलब्ध व्हावीत असा आमचा यामागील हेतू आहे.

## पुस्तकांचा प्रचार-प्रसार आणि संस्कृतीचा विकास

देशभर पुस्तक मेळावे आणि प्रदर्शनांचे आयोजन करून पुस्तकांचा प्रचार-प्रसार आणि वाचनाचा विकास करण्यात आमची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील प्रकाशकांनी योग्य दरात प्रकाशित केलेल्या निवडक पुस्तकांची भाषावार आणि विषयवार प्रदर्शने आयोजित करण्यासही आम्ही सुरुवात केलेली आहे. यात ग्रामीण क्षेत्रात नववाचकांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या वाचन सामग्रीच्या प्रदर्शनांचापण समावेश आहे. सप्टेंबर 1992 मध्ये सुरू केलेल्या या योजनेनुसार आजपावेतो आम्ही देशांतील सर्व प्रांतात, तसेच दुर्गम पूर्वोत्तर प्रांतातही जवळपास 5000 हून अधिक प्रदर्शने आम्ही आयोजित केली आहेत.

आम्ही दिल्लीत जागतिक पुस्तक जत्रेचे आयोजन करतो. केवळ आपल्या देशात होणाऱ्या व्यावसायिक पुस्तकमेळाव्यांपैकी नव्हे, तर आशिया-आफ्रिकेतील हा सर्वांत मोठा पुस्तकमेळा आहे. दर दोन वर्षांतून एकदा विश्व पुस्तक मेळ्याचे आयोजन केले जाते. विश्व पुस्तक मेळ्याचे प्रथम आयोजन 1972 साली केले गेले. प्रगती मैदानाचे अनेक मंडप मिळून 30,000 मीटर क्षेत्र व्यापणाऱ्या या मेळ्यासाठी देशविदेशांतून हजारांहून अधिक पुस्तक-व्यवसायी येतात. 2004 साली, 14 ते 22 फेब्रुवारी दरम्यान सोळावा विश्व पुस्तक मेळा आयोजित करण्यात आला. 'विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात जागतिक स्तरावर भारताचे योगदान' यावर या मेळ्याचा भर होता.

17 वा विश्व पुस्तक मेळा 27 जानेवारी ते 4 फेब्रुवारी 2006 या दरम्यान प्रगती मैदान येथे आयोजित करण्यात आला.

18 वी जागतिक पुस्तक जत्रा 2-10 फेब्रुवारीला नवी दिल्लीतील प्रगती मैदानात भरवली होती. यावेळी रशियाला सन्मान्य अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या जत्रेतील विशेष आकर्षण म्हणजे 'गांधी पॅव्हेलियन.' महात्मा गांधीजींच्या 60 व्या स्मृतिदिनानिमित्त त्याचे आयोजन केले होते. 'इन वर्डस् ॲण्ड इन डिडस्' गांधी साहित्याच्या 'स्वामित्व-अधिकार-सूची'चे प्रकाशन करण्यात आले होते. 19 वी जागतिक पुस्तक-जत्रा नवी दिल्लीतल्या प्रगती मैदानातच 30 जानेवारी ते 7 फेब्रुवारी, 2006 दरम्यान आयोजित केली आहे. 2012 सालचा 20 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 25 फेब्रुवारी ते 04 मार्च 2012 या दरम्यान आयोजित केला होता. हा पुस्तक मेळा आपल्या स्थापनेचा 40 वा वर्धापनदिवस साजरा करीत असतानाच 'दिल्ली' शहरानेही 'राजधानी' म्हणून 100 वर्षे पूर्ण केली. आपणा सर्वांना हे कळविताना आम्हाला आनंद होतो आहे की, 'विश्व पुस्तक मेळा' आता 2013 पासून दरवर्षी भरविण्यात येणार आहे. 2013 सालचा 21 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती

मैदानावर दि. 4 ते 10 फेब्रुवारी 2013 दरम्यान आयोजित केला होता. 2014 सालचा 22 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 15 ते 23 फेब्रुवारी 2014 दरम्यान आयोजित केला होता. 2015 सालचा 23 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 14 ते 22 फेब्रुवारी 2015 दरम्यान आयोजित केला होता. 2016 सालचा 24 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 9 ते 17 जानेवारी 2016 दरम्यान आयोजित केला होता. 2017 सालचा 25 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 7 ते 15 जानेवारी 2017 दरम्यान आयोजित केला होता. 2018 सालचा 26 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 6 ते 14 जानेवारी 2018 दरम्यान आयोजित केला होता. 2019 सालचा 27 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 5 ते 13 जानेवारी 2019 दरम्यान आयोजित केला होता. **2020 सालचा 28 वा 'विश्व पुस्तक मेळा' नवी दिल्ली येथील प्रगती मैदानावर दि. 4 ते 12 जानेवारी 2020 दरम्यान आयोजित केला होता.**

पुस्तक उद्योगाच्या विकासासाठी आम्ही क्षेत्रीय आणि ग्रामीण स्तरांवरील मेळ्यांव्यतिरिक्त दरवर्षी राष्ट्रीय पुस्तक मेळ्याचे आयोजन करतो. आतापावेतो आम्ही अहमदाबाद, बंगलोर, भोपाळ, कोलकाता, चंडीगढ, चेन्नई, हैद्राबाद, इंदूर, जयपूर, लखनौ, मुंबई, नागपूर, नवी दिल्ली, पाटणा आणि तिरुवनंतपुरम येथे 28 राष्ट्रीय पुस्तक मेळे आयोजित केलेले आहेत. तसेच देशातील 30 हून अधिक मोठ्या शहरात 15 बाल पुस्तक मेळे/उत्सव साजरे करण्यात आले. देशातील विविध शहरांमध्येही 50 क्षेत्रीय पुस्तक मेळे/समारोह आयोजित केले गेले. 'आपल्या प्रिय लेखकास भेटा,' आणि 'अन्य साहित्यिक उपक्रम' हे ह्या मेळ्यांचे प्रमुख आकर्षण असतात.

पुस्तक उद्योगाच्या प्रगतीसाठी आम्ही पुस्तकांचा विकास, निर्मिती आणि विपणन यांच्याशी संबंधित असलेल्या व्यावसायिकांसाठी कार्यशाळा, परिषदा आयोजित करतो, प्रकाशकांसाठी प्रशिक्षण आणि उजळणी अभ्यासक्रमांचेही आयोजन करतो. तरुणांना प्रकाशन व्यवसायाकडे आकर्षित करण्यासाठी आम्ही प्रकाशन व्यवसायाची ओळख करून देणारा एक महिन्याचा अभ्यासक्रम आयोजित करतो. 1996 पासून आजवर, आम्ही दिल्लीत एक महिना मुदतीचे आठ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले असून भारतात इतरत्र कानपूर, नासिक, अलीगढ, गोवा आणि तिरुवंतपुरम येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले गेले. इतर भारतीय भाषांमध्ये अशाच प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्याची आमची योजना आहे.

दरवर्षी 14 ते 20 नोव्हेंबरच्या दरम्यान आमच्या पुढाकाराने शैक्षणिक आणि इतर संस्था, साहित्यिक संस्था आणि प्रकाशनगृहांद्वारा ग्रंथविषयक कार्यक्रम, स्पर्धा

आणि पुस्तक प्रदर्शने आयोजित करून राष्ट्रीय ग्रंथसाप्ताहिकी साजरी केली जाते. टपालाने मोठ्या प्रमाणात प्रचार-प्रसार सामग्री पाठविल्यामुळे तथा इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रण माध्यमांकडून मिळणाऱ्या उत्साहवर्धक सहभागामुळे हा विचार देशभर प्रसारित करण्यात आम्ही सफल झालो आहोत.

2003-2004 हे वर्ष भारतासाठी अभिमानास्पद होते, कारण 2003-04 वर्षासाठी भारताची राजधानी नवी दिल्ली ह्या शहराला युनेस्कोतर्फे 'विश्व पुस्तक राजधानी' हा बहुमान प्राप्त झाला. या निर्णयाप्रत आंतरराष्ट्रीय प्रकाशक संघ (आय. पी. ए.) तसेच, पुस्तक व्यवसायाशी संबंधित असलेल्या इतर अनेक मान्यवर आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग होता. अलेक्झांड्रिया आणि माद्रीद यानंतर हा बहुमान प्राप्त होणारे दिल्ली हे तिसरे शहर आहे. ह्यानिमित्त होणाऱ्या सर्व कार्यक्रमांसाठी निर्धारण संस्था म्हणून, भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयातर्फे नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियाला नामित करण्यात आले होते. ह्यानिमित्त योजलेल्या उपक्रमांचा ओनामा 23 एप्रिल 2003 रोजी झालेला असून 22 एप्रिल 2004 रोजी त्यांची सांगता करण्यात आली. ह्या बहुमानाची नोंद योग्यरित्या रेखांकित होण्यासाठी ट्रस्टने वाचनसंस्कृतीच्या वाढीसाठी देशभर एक व्यापक जागृती अभियान चालवले.

2006 साली फ्रँकफर्ट येथे होणाऱ्या पुस्तक मेळ्यात भारताला सन्मान्य अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले. जर्मनी देशात फ्रँकफर्ट येथे दरवर्षी भरणारा हा जगातील सर्वांत मोठा आंतरराष्ट्रीय पुस्तकमेळा आहे. प्रत्येक देशाची पुस्तकप्रकाशनातील गुणवत्ता आणि ज्ञानप्रसाराचे तंत्रज्ञान प्रदर्शित करण्यासाठी हा वैश्विक मंच आहे. फ्रँकफर्ट बुक ऑथॉरिटीतर्फे दरवर्षी एक देश सन्मान्य अतिथी म्हणून निवडण्यात येतो. भारताला हा बहुमान दोनदा-प्रथम 1986 साली आणि 2006 साली लाभलेला आहे.

## भारतीय पुस्तकांचा परदेश प्रसार

भारतीय पुस्तकांचा परदेशात प्रसार करण्यासाठी आम्ही मुख्यतः दक्षिण आशिया आणि आफ्रिका येथील काही देशांमधील आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळ्यांमध्ये भाग घेतो आणि वेगवेगळ्या भारतीय प्रकाशकांनी प्रकाशित केलेल्या निवडक पुस्तकांची विशेष प्रदर्शने आयोजित करतो. 1970 पासून आजपावेतो आम्ही जवळजवळ 300 आंतरराष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनांमध्ये भाग घेतला आहे. यातील ज्या प्रमुख मेळ्यांमध्ये आम्ही नियमितपणे भाग घेतो ते म्हणजे फ्रँकफर्ट पुस्तक मेळा, लंडन पुस्तक मेळा, बोलोना पुस्तक मेळा, झिंबाब्वे आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळा, कैरो आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळा, बीजींग, श्रीलंका, ढाका आंतरराष्ट्रीय पुस्तक मेळा, ऑस्ट्रेलिया पुस्तक मेळा आणि बुडापेस्ट पुस्तक मेळा हे आहेत.

## लेखक आणि प्रकाशकांना सहायता

उच्च शिक्षणासाठी योग्य दरातील पुस्तकांच्या प्रकाशनाला उत्तेजन देण्यासाठी आम्ही पाठ्यपुस्तके आणि संदर्भग्रंथांच्या लेखकांना व प्रकाशकांना आर्थिक मदत देतो. ज्या विषयांवर स्वीकार्य स्तरावरील पुस्तके सहज उपलब्ध नाहीत वा ज्यांची किंमत विद्यार्थ्यांच्या ऐपतीबाहेरची आहे आणि ज्या पुस्तकांची अतिशय आवश्यकता आहे, केवळ अशाच पुस्तकांना आमच्या पुस्तक प्रकाशन सहायता योजनेतून आर्थिक मदत दिली जाते. आजवर आम्ही अधिकांश इंग्रजीतील 928 पेक्षा अधिक पुस्तकांच्या प्रकाशनासाठी मदत दिलेली आहे आणि आता असा निर्णय घेतला गेला आहे की, यापुढे इंग्रजी पुस्तकांची निवड अतिशय काळजीपूर्वकतेने केली जाईल आणि भारतीय भाषांतील प्रकाशकांना या योजनेतून अधिकाधिक लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच भारतीय भाषातील ललितेतर वैचारिक पुस्तकांच्या प्रकाशनाला आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेचा विस्तार केला गेला आहे. ह्याव्यतिरिक्त, संविधानाच्या आठव्या सूचीतील भाषांतील भारतातील विश्वविद्यालयांच्या पदवी अथवा पदव्युत्तर स्तरावरील, तसेच तांत्रिक शिक्षण संस्थांच्या पदविका स्तरावरील विभिन्न विषयातील पाठ्यपुस्तकांशी निगडित संदर्भग्रंथांना ह्या योजनेद्वारा अर्थसाहाय्य केले जाऊ शकेल. वरील पुस्तकांबरोबरच ह्यात शब्दकोश, विश्वकोश, तसेच, ललितेतर वैचारिक ग्रंथांचा समावेश असेल.

## बालसाहित्याला प्रोत्साहन

विभिन्न भारतीय भाषातील बालसाहित्याची जोपासना, नियोजन आणि मदत करण्यासाठी ट्रस्टने 1993 साली राष्ट्रीय बाल साहित्य केंद्राची स्थापना केली आहे. बालसाहित्याचे वाचनालय आणि प्रलेखन अनुभागाचा विकास, या व्यतिरिक्त हे केंद्र कार्यशाळा आणि प्रदर्शनांचे आयोजन आणि शालेय पातळीवर वाचनाला उत्तेजन देण्यासाठी वाचकमंचाची स्थापना या बाबतीत कार्यरत आहे. हे केंद्र बालसाहित्याशी संबंधित अशा विषयातील संशोधनकार्य करते. आता या केंद्रातर्फे बालसाहित्यविषयक पत्रिका सुरू करण्याचा मानस आहे.

# आमचा प्रकाशन कार्यक्रम

आमच्या ज्या सुनियोजित पुस्तक मालिकांतर्गत पुस्तके प्रकाशित होतात त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

### *भारत-देश आणि लोक*

भारत-देश आणि लोक या मालेत भारतातील विविध भौगोलिक प्रदेश, बहुविध सांस्कृतिक परंपरा, येथील वन्यप्राणी जीवन आणि नानाविध बहुरंगी गोफांनी साकार झालेल्या भारतीयत्वाचा परिचय घडविला जातो.

या मालेतील पुस्तके तज्ज्ञांनी सुबोध भाषेत लिहिली आहेत. भारताशी संबंधित असलेल्या कोणत्याही विषयावरील मूलभूत आणि अद्ययावत माहिती या पुस्तकांत दिली जाते, यातील कुठल्याही विषयाचे पूर्वज्ञान नसलेल्या वाचकांनाही ही पुस्तके आवडतील.

### *तरुण भारती*

या मालिकेतील पुस्तकांचा प्रमुख उद्देश 18+ या वयोगटातील तरुण तरुणींना त्यांच्या पुढील आयुष्यातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्या व त्याबाबतच्या दृष्टिकोनांची जाणीव करून देणे आणि त्यांचे कुतूहल जागृत करून त्यांना अधिक वाचनासाठी प्रवृत्त करण्याचा आहे.

प्रवास आणि व्यावसायिक संधींविषयीची पुस्तके या मालिकेत नव्याने गुंफली गेली आहेत. यातून तरुण वाचक पुढील जीवनात सामोरे येणाऱ्या अनेक निर्णयांशी परिचित होतील.

### *लोकोपयोगी विज्ञान*

सर्वसामान्य सुशिक्षित वाचकाला आपल्या सभोवतीच्या घडामोडींविषयी अधिक सजग करणे आणि या घडामोडींमागील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या भूमिकेचा परामर्श घेणे आणि याबरोबरच शक्य तेथे या क्षेत्रातील भारताच्या प्रगतीचा आलेख नोंदवणे असा या ग्रंथमालिकेचा उद्देश आहे.

या मालिकेतील पुस्तके सरल आणि वाचनीय शैलीत लिहिलेली आहेत. वैज्ञानिक संकल्पना समजावून सांगण्यासाठी दैनंदिन जीवनातील घटना आणि प्रसंगांची उदाहरणे वापरल्याने या शैलीला खुलावट आलेली आहे. तक्ते, आकृत्या आणि छायाचित्रांचा नेमका वापर केला आहे.

### *आदान-प्रदान*
भारताच्या निरनिराळ्या भाषांतून झालेली उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती इतर भाषिकांनाही उपलब्ध करून देणे हा या ग्रंथमालिकेचा हेतू आहे. एका भाषेतील कालाकृती अनुवादित झाल्याने त्या विशिष्ट भाषाप्रदेशातील जनजीवन, राहणीमान, आचारविचार, सुखदुःख यांचा परिचय इतर प्रदेशातील लोकांना होतो.

### *अक्षर वाङ्मय*
आदान-प्रदान या मालेत केवळ आधुनिक साहित्यकृतींचा परिचय करून देण्यात येत असल्याने अक्षर भारतीय साहित्यासाठी आम्ही भारतीय अक्षर वाङ्मय ही मालिका योजिली आहे.

### *लोकसाहित्यमाला*
या मालेचा सुरुवातीचा हेतू देशाच्या वेगवेगळ्या भागातील विविध लोकसंस्कृतीत वाढलेल्या लोकांना एकमेकांच्या संस्कृतीचा परिचय करून देणे हा होता. लोक, त्यांच्या मिथ्यकथा, परंपरा, पुराणे, धर्म, रूढी, जत्रा, सण आणि उत्सव, कला आणि लोकसाहित्याचा या मालिकेतील पुस्तकांमध्ये अंतर्भाव केला जाई.

आता केवळ या चौकटीत अडकून न राहता आपली जिवंत लोकसंस्कृती आणि तिचे नवनवे उन्मेष प्रस्तुत करावे असा हेतू आहे. लोकांना आकर्षक स्वरूपात आपल्या संस्कृतीचा परिचय घडवावा आणि अनेक बोलक्या चित्रांनी या साहित्याला उठाव मिळावा ही यामागची मुख्य कल्पना आहे.

### *लोकप्रिय सामाजिक विज्ञान*
या मालिकेतील पुस्तके लोकोपयोगी आणि महत्त्वाच्या सामाजिक संकल्पना व धारणांची सर्वसामान्य वाचकांना ओळख करून देतील. नव्याने उभरणारी लिंग-अभ्यास, आदिवासी विमर्श, शांतता आणि संघर्ष निवारण, विकास अर्थशास्त्र, सामाजिक संरचना इत्यादी क्षेत्रांचा या मालिकेत ऊहापोह होईल.

हे विषय बहुतांश शैक्षणिक परिघातच सीमित राहिल्याने सर्वसामान्य वाचकांपर्यंत त्यांना संक्षेपाने थेट नेणे आवश्यक आहे.

### *बृहन्भारतीय डायस्पोरा अध्ययन*
या मालिकेतील पुस्तके जगभर विस्तारलेला बृहन्भारतीय समाज आणि त्याच्या कार्यावर प्रामुख्याने केंद्रित असतील. यात साहित्य, समाजशास्त्र, संस्कृती, तत्त्वज्ञान इत्यादी प्रमुख ज्ञानशाखांवरील आंतर-सांस्कृतिक संबंध, परात्मीकरण आणि निष्कासन, विस्थापन, देशांतरण इत्यादींच्या प्रभावाचे महत्त्वपूर्ण पैलू सामोरे आणले जातील. अप्रवासी विमर्श ह्या महत्त्वाच्या उभरत्या ज्ञानक्षेत्रातील प्रकाशनाचा नॅशनल बुक ट्रस्टचा हा पथनिदर्शक प्रयत्न आहे.

### *राष्ट्रीय चरित्रमाला*

ज्या भारतीय स्त्री-पुरुषांनी भारतीय समाज, संस्कृती, अर्थकारण, राजकारण यांतून आधुनिक भारतीय मानसाचा विकास करण्यात अपूर्व भर घातली आहे अशांची चरित्रे उद्धृत करणे हा राष्ट्रीय चरित्रमालेचा हेतू आहे. त्यांच्या जीवनाचा आणि कालखंडाचा सत्य, वस्तुनिष्ठ, व्यापक आणि विश्लेषणात्मक आढावा या मालिकेत घेतला जातो.

आता या मालिकेत जीवनचित्रांतून उभरणारे कलाप्रकारांचे दर्शन, सामाजिक आणि राजकीय चळवळींची वाटचाल आणि विचारप्रवाहांचा परामर्श घेण्याची योजना आकार घेते आहे.

### *आफ्रो-आशियाई देश*

वसाहतोत्तर जगात आशिया आणि आफ्रिकेतील देश सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील प्रभावी शक्ती आहेत. यांच्यासमोरील समस्यांतील साधर्म्यांमुळे हे एक महत्त्वाचे अभ्यासक्षेत्र बनले आहे. या मालिकेतील पुस्तके वरील भौगोलिक-राजकीय क्षेत्रांतील विज्ञान-तंत्रज्ञान, व्यापार, शेती, पायाभूत सोयी, शिक्षण, आरोग्य, राजनैतिक संबंध अशा बाबींचा उचित विकास, वैश्वीकरण, तसेच परस्पर-संबंधांतील समस्या आणि आव्हाने यांवर भर देतील.

### *आत्मचरित्र*

या नव्याने सुरू झालेल्या मालिकेत भारतासाठी गौरवास्पद असलेल्या सामाजिक, राजकीय आणि साहित्यिक क्षेत्रांतील प्रभावशाली व्यक्तींच्या आत्मचरित्रांचे प्रकाशन करण्यात येईल.

### *नेहरू बाल पुस्तकालय*

नेहरू बाल पुस्तकालय मालेत मुलांसाठी मनोरंजक आणि माहितीपूर्ण साहित्याचा खजिनाच साठलेला आहे. आपणहून मुलांना वाचावी वाटणारी अशी ही पुस्तके आहेत. भारतभरच्या विविधभाषी मुलांना आपल्या मातृभाषेत अनेकविध विषयांवर समान साहित्य वाचायला मिळत असल्याने या मालेतून राष्ट्रीय एकात्मतेचा हेतू सहजगत्या साधला जातो.

इतिहास, लोककथा, सण, राष्ट्रीय चळवळ, विज्ञान आणि तंत्रज्ञान, वन्य प्राणी, वनस्पती जीवन, साहित्य, खेळ, आदिवासी जीवन, भारतीय चित्रशैली, थोर भारतीय लेखकांच्या साहित्यातील काही नमुने अशी या मालेतील पुस्तकांची व्याप्ती आहे.

या मालेतील पुस्तके चार वयोगटातील मुलांसाठी अभिप्रेत आहेत. शालापूर्व, सहा ते आठ, नऊ ते अकरा आणि बारा ते चौदा असे हे वयोगट आहेत. या मालेतील

सर्व पुस्तकांसाठी ट्रस्ट खास चित्रांकन करवून घेते. सर्व पुस्तकांत भरपूर रंगीत वा एकरंगी चित्रे, रेखाटने आणि छायाचित्रे असतात. शालापूर्व वयोगटातील मुलांच्या पुस्तकातील मजकूर फार थोडा असतो. सहजतेने गोष्ट सांगणाऱ्या बहुरंगी चित्रांभोवती तो गुंफलेला असतो.

### *विश्व साहित्य*

स्वातंत्र्योत्तर काळातील निवडक भारतीय कादंबऱ्यांचा अनुवाद इंग्रजीमधून करणे आणि भारतीय भाषांतील साहित्याचा जागतिक स्तरावर प्रसार करणे, हा या मालिकेमागील हेतू आहे. तसेच प्रमुख भारतीय भाषांतील निवडक लघुकथांचे संग्रहदेखील या मालिकेंतर्गत इंग्रजीत प्रकाशित केले जात आहेत. याशिवाय, आशिया आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका येथील विविध देशांतील निवडक कथासाहित्याचे प्रकाशन करून त्यांच्या समकालीन साहित्याचा परिचय भारतीय वाचकांना करून देण्याची ही योजना आहे.

### *सृजनात्मक शिक्षण*

पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील नव्या शैक्षणिक संकल्पना आणि शिक्षण पद्धतींचा प्रसार करण्यासाठी सृजनात्मक शिक्षण मालेची सुरुवात करण्यात आलेली आहे. या मालिकेचा भर कृतिशील दृष्टिकोनावर असून, शिक्षण आणि शिक्षण क्षेत्राशी संलग्न असलेल्यांच्या गरजा ध्यानात घेऊन या मालिकेची आखणी करण्यात आलेली आहे.

### *निरंतर शिक्षणमाला*

स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त ग्रामीण भागातील वाचकांसाठी विविध भारतीय भाषांत पन्नास पुस्तके तयार करण्याची योजना आम्ही कार्यवाहीत आणली. ही पुस्तके प्राथमिक शिक्षण झालेल्या ग्रामीण वाचकांसाठी तयार केली आहेत.

त्यांना विविध प्रकारची माहिती देण्याचा या मालिकेचा प्रमुख हेतू आहे. या मालिकेत प्रत्येक भारतीय भाषेतीय निवडक स्वातंत्र्य गीतांचे संकलन करण्यात आलेले आहे.

### *आशिया-पॅसिफिक सहप्रकाशन कार्यक्रम*

आशियातील मुलांसाठी, आशियातील लेखकांनी पुस्तके तयार करण्याचा हा युनेस्कोचा नूतन प्रकल्प आहे. कोरियातील मुलांना श्रीलंकेतील मुलांशी आपल्या कल्पनांची देवाणघेवाण करता यावी ही लहानसहान बाब नव्हे. आपल्या खंडातील वीसेक देशांच्या संपादक मंडळांत भारतीय आणि पाकिस्तानी संपादक आपल्या मुलांना काय आवडेल याचा एकत्र येऊन विचार करताहेत ही एक फार आशादायक

सुरुवात आहे. तेहरानपासून तोक्योपर्यंतच्या नानाविध रंगांची ही लयलूट, या खंडातील, कदाचित जगभरातील मुलांनाही नक्की आवडेल. मनामनांतील दऱ्या पार करणारा या प्रचंड खंडाचा हा एक बहुमोल वारसा आहे. हे आशियातील सर्वोत्तम बालसाहित्य आहे.

### *नवसाक्षर साहित्यमाला*

या मालेतील पुस्तके ग्रामीण कार्यशिबिरातून तयार होतात. यात स्थानिक लोकांचा सहभाग असतो. काही पुस्तके तज्ज्ञांकडून आणि इतर लेखकांकडूनही लिहून घेतली जातात. खास या मालेसाठी काही पुस्तकांचे संक्षिप्तीकरण केले जाते. लोकांना परिचित असलेल्या शैलींचा वापर या पुस्तकांत प्रामुख्याने होतो. त्यांची क्षेत्रचाचणी घेण्यात येते. या मालिकेतील पुस्तकात भरपूर चित्रे असतात.

लघुकथा, चरित्रे, कादंबरिका, लोककथा, आधुनिक समस्यांचे चित्रण आणि उपयोगी माहिती यासाठी नवसाक्षरांना वाचायला प्रवृत्त करणारी शैली वापरली जाते.

### *विविध*

इतर कोणत्याही मालिकेत न येणारी पुस्तके विविध या मालेअंतर्गत प्रकाशित केली जातात.

### *सुवर्ण जयंती पुस्तकमाला*

ट्रस्टच्या स्थापनेला 2007 मध्ये 50 वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने ट्रस्टने 2007-08 हे सुवर्ण जयंती वर्ष म्हणून साजरे केले. त्यातील एक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत सुवर्ण जयंती पुस्तक मालेचे विविध भारतीय भाषांमध्ये प्रकाशन करण्यात आले. सर्व भारतीय भाषांमधील कथा, कविता आणि नाटक या साहित्य प्रकारांतील स्वातंत्र्योत्तर काळातील त्या-त्या भाषेतील अतिशय महत्त्वाच्या निवडक कथाकार, नाटककार आणि कवींच्या साहित्यकृतींचा यात समावेश आहे.

### *ब्रेल साहित्य*

अंध वाचकांसाठी नॅशनल बुक ट्रस्टने ब्रेल लिपीतील प्रकाशनास प्रारंभ केला असून हिंदी व इंग्रजी भाषेतील ब्रेलमधील पुस्तकांचा संच प्रकाशित करण्यात आलेला आहे. निवडक भारतीय भाषांतील, ज्यात मराठीचाही समावेश केला असून काही पुस्तके प्रकाशितही झाली आहेत.

# आगामी पुस्तके

### *नेहरु बाल पुस्तकालय*

**बोलक्या गोष्टी**
Bolkya Gosthi (Marathi Original)
*राजीव तांबे*

**सरदार नावाचा झंझावात**
Sardar Navacha Zanzavat (Marathi Original)
*दीपक चैतन्य*

### *लोकप्रिय सामाजिक विज्ञान*

**गदर चळवळ : संक्षिप्त इतिहास**
Ghadar Movement : A Short History (English Original)
*हरीष के. पुरी / अनुवाद : प्रा. अविनाश कोल्हे*

**आपले संविधान**
Our Constitution (English Original)
*सुभाष कश्यप / अनुवाद : संतोष दास्ताने*

**१८५७चा संक्षिप्त इतिहास**
1857cha Sankshipta Itihasa (Marathi Original)
*माधव साठे*

# भारत-देश आणि लोक

1. **आपली संसद**
   Our Parliament ISBN 978-81-237-4769-9
   *सुभाष सी. कश्यप / अनुवाद : न. ब. पाटील* पृ. 300 ₹ 130.00
   भारतीय संसदेचा इतिहास, जडणघडण, कार्यपद्धती, संसदेची संस्कृती, उत्कृष्ट संसदपटू अशा विविध पैलूंतून संसदेचे दर्शन.

2. **आपल्या भारतातील साप**
   Comman Indian Snakes ISBN 978-81-237-3179-7
   *रोम्युलस व्हिटेकर* पृ. 180 ₹ 115.00
   *अनुवाद : मारुती चितमपल्ली*
   ह्या पुस्तकात भारतातील प्रातिनिधिक सर्पकुळे आणि त्यातील सापांचे स्वभावविशेष, सवयी, आहार, वीण याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे. बहुमोल छायाचित्रे.

3. **औषधी वनस्पती**
   Medicinal Plants ISBN 978-81-237-1744-9
   *सुधांशुकुमार जैन* पृ. 152 ₹ 65.00
   *अनुवाद : विजयसिंह परदेशी*
   या पुस्तकात औषधी वनस्पतींचे संशोधन, वनस्पतींचे नामकरण, संरक्षण अशा विविध अंगांचे विवेचन केले आहे. सुमारे शंभर वनस्पतींची स्थानिक नावे, वर्णने, त्या आढळणाऱ्या जागा आणि औषधीय गुणधर्म यांबाबत माहिती देणारे पुस्तक.

4. **फुलझाडे**
   Flowering Trees ISBN 978-81-237-3640-2
   *एम. एस. रंधावा* पृ. 204 ₹ 80.00
   *अनुवाद : व्यंकटेश वकील*
   हे पुस्तक डॉ. रंधवा यांच्या प्रगाढ ज्ञानाचे आणि निसर्गप्रेमाचे उत्कृष्ट फलित आहे. ही वृक्षसौंदर्याची गाथा आहे. लेखक कृषी, पहाडी चित्रकला अशा विविध विषयांवरचे मान्यवर तज्ज्ञ होते.

5. **भारताची राष्ट्रीय संस्कृती**
The National Culture of India ISBN 978-81-237-1573-5
*एस. अबीद हुसेन* पृ. 152 ₹ 85.00
*अनुवाद : प्रकाश देशपांडे केजकर*
भारताचे राष्ट्रीयत्व, येथील राष्ट्रीय संस्कृतीचा भूतकाळातील विकास, तिची आजची स्थिती याचा ऊहापोह आणि एकात्मिता जतन करण्यासाठीच्या उपाययोजनेची चर्चा करणारे महत्त्वपूर्ण पुस्तक.

6. **भारतीय पक्षी**
Comman Birds ISBN 978-81-237-2276-4
*सलिम अली आणि लईक फतेहअली* पृ. 104 ₹ 75.00
*अनुवाद : रा. वि. सोवनी*
भारतीय पक्षी, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांच्या सवयी आणि त्यांचा परिसर याविषयी एका थोर पक्षिशास्त्रज्ञाने लिहिलेल्या पुस्तकाचा उत्कृष्ट अनुवाद.

7. **हिंदुस्थानी संगीत**
Hindustani Music ISBN 978-81-237-4692-0
*अशोक दा. रानडे* पृ.168 ₹ 65.00
भारतीय संगीतातील महत्त्वपूर्ण संगीतप्रकारांची जडणघडण, संकल्पना आणि संगीतकार यांचा तपशीलावर वेध.

8. **भारतीय समाजातील स्त्रिया**
Women in Indian Society ISBN 978-81-237-7807-5
(English Original) पृ. 224 ₹ 195.00
*नीरा देसाई, उषा ठक्कर*
*अनुवाद : शांता कोठेकर*
'भारतीय समाजातील स्त्रिया' हे पुस्तक सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक परिदृष्यात भारतातल्या स्त्रियांशी जोडलेल्या प्रश्नांची गंभीरपणे चर्चा करते. स्त्रियांशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांना, त्यांच्या भूतकाळातील संदर्भांना कवेत घेत हे पुस्तक आपणाला दाखवून देते की, स्त्रिया किती आणि कोणकोणत्या कठीण परिस्थितीतून, खास करून संघटित आणि असंघटित क्षेत्रांत मेहनत करत समाज आणि देशासाठी मूलभूत योगदान देत आहेत. हे पुस्तक स्त्री-अभ्यास आणि समाजशास्त्रीय अभ्यासातील आगळावेगळा संदर्भग्रंथ आहे.

9. **भटके-विमुक्त समाज : भाषा व संस्कृती**
Bhatke-Vimukta Samaj : Bhasha va Sanskriti
(Marathi Original) ISBN 978-81-237-9034-3
*श्रीकृष्ण काकडे* पृ. 224 ₹ 255.00
भारताच्या भूमीत भटक्या-विमुक्त लोकांची वैशिष्ट्यपूर्ण लोकसंस्कृती आहे. सतत भटकंती करणाऱ्या या जमाती हजारो वर्षांपासून विविध व्यवसाय, उदा., पशुपालन, मनोरंजन, शिकार, भविष्यकथन तसेच देवधर्माच्या नावाने भिक्षा मागून उदरनिर्वाह करीत आलेल्या आहेत. या लोकांचे वेगळे रीतिरिवाज, प्रथा-परंपरा, मौखिक लोकसंस्कृती आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या झंझावातामुळे या लोकांची पारंपरिक लोकसंस्कृती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या पार्श्वभूमीवर या पुस्तकातून भटक्या-विमुक्त लोकांच्या भाषेत व लोकसंस्कृतीत झालेले बदल रेखाटण्यात आले आहेत.

10. **भारतीय चित्रकला**
Indian Painting (English Original) ISBN 978-81-237-9348-1
*सी. शिवराममूर्ती / अनुवाद : पल्लवी पंडित* पृ. 116 ₹ 175.00
या पुस्तकात पुरातन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत भारतातील विविध चित्रकला-शैलींची ठळक वैशिष्ट्ये आणि ओघवता इतिहास सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

# तरुण भारती

1. **आझाद हिंद फौजेची कहाणी**
The Story of INA ISBN 978-81-237-2935-0
*एस. ए. अय्यर* पृ. 108 ₹ 60.00
*अनुवाद : म. अ. करंदीकर*
आझाद हिंद फौजेने भारतीय स्वातंत्र्ययुद्धाला एक नवे परिमाण दिले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या देदीप्यमान नेतृत्वाखाली अथक शौर्य गाजविले. नेताजींच्या एका जवळच्या सहकाऱ्याने सांगितलेली एका विलक्षण झुंजीची ही प्रेरक कहाणी.

2. **आपले काम आपले जीवनसर्वस्व**
The Joy of Work ISBN 978-81-237-1746-3
*स. आ. सप्रे* पृ. 88 ₹ 45.00
कर्मयोग ही गीतेची शिकवण आहे. काम करण्यामुळेच व्यक्ती आणि समष्टीचा विकास संभवतो. कर्मयोग्याचे जीवनही कसे सुंदर असते हे सांगणारे प्रेरक पुस्तक. डॉ. वि. ना. श्रीखंडे यांची प्रस्तावना.

3. **आपले पर्यावरण**
Our Environment ISBN 978-81-237-3177-3
*लईक फतेहअली* पृ. 96 ₹ 75.00
*अनुवाद : रा. वि. सोवनी*
आपल्या पर्यावरणाचे घटक कोणते, त्यांचा एकमेकांवर कसा परिणाम होतो, प्रदूषणामुळे पर्यावरणाची कशी हानी होते, आपले पर्यावरण वाचविण्याकरता काय करायला हवे हे उत्कटतेने मांडणारे पुस्तक.

4. **ॲथलेटिक्समधील सुवर्णपदकाच्या दिशेने**
A Way to Athletic Gold ISBN 978-81-237-2461-6
*एरिक प्रभाकर* पृ. 236 ₹ 85.00
*अनुवाद : सुरेशचंद्र नाडकर्णी*
ॲथलेटिक्समधील भारतातील युवा-किशोर क्रीडापटूना स्फूर्तिदायक आणि उद्बोधक अशी मार्गदर्शिका.

5. **कौटिलीय अर्थशास्त्राचा परिचय**

Kautiliy Arthashastracha Parichay (Original Marathi) ISBN 978-81-237-5572-4 पृ. 176 ₹ 65.00

*वसुंधरा पेंडसे नाईक*

राजनीतीच्या सर्वंकष ज्ञानाला अनुभवाची जोड देणाऱ्या कौटिल्य चाणक्याने 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा ग्रंथ लिहिला तो 'राज्य' या विषयावरील प्रत्येक घटकाचा सांगोपांग विचार सर्वांपुढे मांडण्यासाठी. सुमारे चोवीसशे वर्षांपूर्वी कौटिल्य चाणक्याने आपल्या अर्थशास्त्रातून दिलेले दंडनीतीचे-राज्यशास्त्राचे-ज्ञान आजही संपूर्णतः कालबाह्य झालेले नाही.

6. **ट्रेकिंग**

Trekking ISBN 978-81-237-5898-5

*मनोहर पुरी* पृ. 136 ₹ 60.00

*अनुवाद : उषाप्रभा पागे*

ट्रेकिंगवरून आलेल्या व्यक्तीमध्ये मूलभूत बदल घडतात. ट्रेकिंग मनुष्याच्या सुप्त कलागुणांना वाव देते आणि एक जबाबदार नागरिक बनण्यास मदत करते. म्हणूनच ट्रेकिंगबद्दलची अतिशय महत्त्वपूर्ण माहिती या पुस्तकाद्वारे, आम्ही आपल्याला देत आहोत.

7. **भारतीय समाज**

Indian Society ISBN 978-81-237-1051-8

*श्यामचरण दुबे* पृ.132 ₹ 55.00

*अनुवाद : प्रकाश देशपांडे केजकर*

भारतीय समाजाच्या जडणघडणीची आणि परिवर्तनाची ओळख करून देणारे एका प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाने लिहिलेले उत्कृष्ट पुस्तक.

8. **मानवी हक्क : प्रश्न**

Human Rights : Questions & Answers ISBN 978-81-237-3926-7

*लिआ लेव्हिन* पृ. 156 ₹ 80.00

*अनुवाद : विकास देशपांडे*

मानवी हक्काचे स्वरूप आणि व्याप्ती, त्यांच्या रक्षणाची निकड आणि आपली कर्तव्ये याविषयक जाणीव यांचा सुबोध आढावा घेणारे आणि यासंदर्भात जागतिक पातळीवर कार्यरत असलेले आयोग व संघटनांची थोडक्यात ओळख.

9. **लोकशाही : ऐंशी प्रश्न**

Democracy : 80 Questions & Answers — ISBN 978-81-237-4085-9 — पृ. 96 ₹ 70.00

*डेव्हिड बीथॅम व केनेथ बॉयल*

*अनुवाद : लीना मेहेंदळे*

बहुमत म्हणजेच लोकशाही का, आपले हक्क, राष्ट्रवाद, खुली अर्थव्यवस्था, अल्पसंख्याकांचे समाजातील स्थान या मुद्यांचा लोकशाहीशी काय संबंध? पारदर्शक शासन, निर्भय निवडणुका, लोकशाहीचे भविष्य या सर्वांचा मार्मिक ताळेबंद.

10. **सत्याच्या शोधार्थ वैज्ञानिक मनोवृत्ती**

The Spirit of Science in Quest of Truth — ISBN 978-81-237-9340-5 — पृ. 56 ₹ 75.00

*आर. बी. लाल / अनुवाद : सुजाता बाबर*

हे पुस्तक जीवनाच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय पैलूंमध्ये वैज्ञानिक पद्धतींचे महत्त्व आणि त्याचे अनुप्रयोग यांवर चर्चा करते. निसर्गाची रहस्ये उलगडण्यासाठी याच वैज्ञानिक मनोवृत्तीची कास धरावी लागते.

# लोकोपयोगी विज्ञान

1. **आनंद वाटे मनी बनविता भारतीय खेळणी**
   The Joy of Making Indian Toys ISBN 978-81-237-5836-7
   *सुदर्शन खन्ना* पृ. 148 ₹ 75.00
   *अनुवाद : उल्हास टुमणे*
   भारतातल्या विविध प्रदेशातील मुलांना कोणताही खर्च न करता बनवता येण्याजोगी प्रदेशविशिष्ट 101 खेळणी बनविण्याचे तंत्र हे पुस्तक शिकवते. स्वनिर्मितीचा आनंद आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी हे पुस्तक बरेच उपयोगी ठरेल.

2. **आपली जलसंपत्ती**
   Our Water Resources ISBN 978-81-237-1925-2
   *राम / अनुवाद : आर. टी. नारकर* पृ.68 ₹ 80.00
   या पुस्तकात भारतातील जलसंपत्तीचे थोडक्यात चित्रण केले गेले आहे. सोबत अनेक तक्ते व आकृत्या.

3. **ऊर्जा**
   Energy ISBN 978-81-237-2306-8
   *ए. के. बक्षी* पृ. 100 ₹ 110.00
   *अनुवाद : अ. पां. देशपांडे*
   ऊर्जा म्हणजे काय, तिचे आजच्या आधुनिक जगात काय महत्त्व आहे, ऊर्जेचे प्रकार कोणते आणि ऊर्जेचे उत्पादन व वापराचे मानवी जीवनावर होणारे बरेवाईट परिणाम यांचे सुलभतेने विवेचन करणारे पुस्तक. सोबत अनेक आकृत्या आणि रंगीत छायाचित्रे.

4. **उद्या काय झालं!**
   What Happened Tomorrow ISBN 798-81-237-4632-6
   *संपा. : बाळ फोंडके* पृ. 244 ₹ 125.00
   *अनुवाद : मीना वैशंपायन*
   विविध भारतीय भाषांतील रोचक विज्ञान-कथांचा संग्रह.

5. **कर्करोग**

Cancer ISBN 978-81-237-2988-6

*एस. एम. बोस / अनुवाद : जयंत एरंडे* पृ. 72 ₹ 65.00

कर्करोगाची कारणे, प्राथमिक धोकादायक संकेत आणि वैद्यक चाचण्या, तसेच कर्करोगाचा उपचार आणि रोग्याची देखभाल कशी करावी ह्याबाबत एका तज्ज्ञाने लिहिलेले पुस्तक. माहितीदर्शक छायाचित्रे, तक्ते आणि आकृत्या.

6. **कलावस्तू आणि वाचनालय साहित्याचे संरक्षण**

Preservation of Art Objects & Library Materials ISBN 978-81-237-2546-8

पृ. 100 ₹ 70.00

*ओ. पी. अगरवाल*

*अनुवाद : सुजला देव*

कलावस्तू, ग्रंथ आणि हस्तलिखिते यांच्या संग्रहपालास धोक्यांचे स्वरूप, त्यांची कारणे, परिणाम आणि त्यांचा प्रतिबंध करण्याचे तंत्र माहिती करून देण्याच्या हेतूने, हे पुस्तक अत्यंत सोप्या भाषेत एका संग्रहतज्ज्ञाने लिहिले आहे. आपल्या सांस्कृतिक वारशाच्या सवंर्धनासाठी सर्वांनाच या पुस्तकाचा उपयोग होईल.

7. **काही नेहमीची दुखणी**

Some Common Ailments ISBN 978-81-237-1952-8

*अनिल अगरवाल* पृ. 76 ₹ 50.00

*अनुवाद : आर. टी. नारकर*

एका वैद्यकीय तज्ज्ञाने लिहिलेले हे पुस्तक काही सर्वसाधारण दुखण्यांविषयी हसत खेळत माहिती देते.

8. **काळाच्या संदर्भात**

About Time ISBN 978-81-237-6796-3

*बाळ फोंडके* पृ. 196 ₹ 130.00

*अनुवाद : सुहासिनी अग्निहोत्री*

काळाला सुरुवात व शेवट नाही ह्याची जाणीव होते तेव्हा तो गूढ, अतिवास्तववादी स्वरूप धारण करतो. तो शाश्वत आहे, तो उलट दिशेने प्रवाहित होऊ शकणार नाही, त्याचा प्रवाह एकाच दिशेने-भूतकाळापासून भविष्याकडे-आहे. अल्बर्ट आईनस्टाईनने तर अधिकृतपणे जाहीर केले की काळ ही अशी चौथी मिती आहे, ज्यात विश्वाचे अस्तित्व आहे, जी स्थळापासून

विभक्त होऊ शकत नाही. शिवाय काळ स्वायत्त नसतो पण तो निरीक्षकाच्या संदर्भ चौकटीवर अवलंबून असतो. कदाचित आईनस्टाईन किंवा स्टीफन हॉकिंग हे आपण पूर्णपणे जाणतो असा दावा करू शकतात पणआपल्यासारखे मर्त्य जीव तसे करण्याचा केवळ प्रयत्नच करण्यास धजू शकतात. हाही असाच एक प्रयत्न!

9. **केव्हा....?**

When? ISBN 978-81-237-7167-0

*बाळ फोंडके* पृ. 240 ₹ 200.00

*अनुवाद : सुहासिनी अग्निहोत्री*

लेखनाचा शोध कधी लागला? मुल चेहरे कधी ओखळू लागते? आपण कधी स्वप्ने पाहतो?... अशा साध्या आणि उत्तरे द्यायला अवघड असणाऱ्या प्रश्नांची मालिका तशी संपणारी नाही. काही प्रश्न रोजच्या जगण्याशी निगडित तर काही शास्त्रीय प्रक्रियांशी निगडित आणि त्यातले काही तर चक्क तत्त्वज्ञानाशी संबंधित, त्यांचे स्वरूप कोणतेही असो, शास्त्रज्ञ फक्त त्यांना आदराने हाताळतातच असे नव्हे तर त्यांची तार्किक, पटणारी, शास्त्रीयदृष्ट्या मान्य अशी उत्तरे द्यायचा प्रयत्न करतात. अतिशय साध्या, ओघवत्या भाषेत याही पुस्तकात अशाच पन्नास प्रश्नांची अतिशय उद्‌बोधक तरीही गमतीदार उत्तरे दिली आहेत.

10. **कोलाहल, अपूर्णमित आणि स्वयंसंघटन**

Chaos, Fractals & Self-Organisation ISBN 978-81-237-3471-2

पृ. 168 ₹115.00

*अरविंद कुमार*

*अनुवाद : चिंतामणी देशमुख*

कोलाहल, अपूर्णमित आणि स्वयंसंघटन हे औत्सुक्यपूर्ण नव्या वैज्ञानिक संकल्पनांचा धावता आढावा घेणारे पुस्तक.

11. **तुमच्या चहाच्या कपातील कोडी**

Riddles In Your Tea Cup ISBN 978-81-237-1572-8

*पार्थ घोष आणि दीपंकर होम* पृ. 188 ₹ 80.00

*अनुवाद : आर. एम. देशपांडे*

या पुस्तकात दूरदर्शनवरील ‘क्वेस्ट’ या लोकप्रिय मालिकेत सादर केलेली दैनंदिन जीवनातील 100 विज्ञानकोडी सादर केलेली आहेत. हसत खेळत वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहायला शिकविणारे एक अपूर्व पुस्तक.

12. **दमा : एक वैद्यकीय कोडे**
Asthama : How to Control it ISBN 978-81-237-1368-7
*एम. पी. एस. मेनन/ अनुवाद : य. त्र्यं. भालेराव* पृ. 56 ₹ 55.00
एका नाणावलेल्या तज्ज्ञाने लिहिलेल्या या पुस्तकात दम्याचे नियंत्रण आणि प्रतिबंध याविषयी सुलभ माहिती दिलेली आहे.

13. **दैनंदिन जीवनातील गणित**
Everyday Mathematics ISBN 978-81-237-2267-2
*र. म. भागवत* पृ. 76 ₹ 90.00
या पुस्तकामध्ये गणिताचा उगम आणि त्याचा विकास याविषयी सुबोध विवेचन केले असून विविध प्रश्न सोडविण्यासाठी गणित कसे उपयोगी पडते हे स्पष्ट केले आहे. 'सर्वांसाठी गणित' या गणितविषयक जागतिक चळवळीचाही हा उद्देश आहे की प्रत्येक नागरिकाला आवश्यक तेवढे गणित त्याच्यापर्यंत पोचवावे.

14. **पवनऊर्जा**
Wind Energy ISBN 978-81-237-2645-8
*सुनील आठवले* पृ. 68 ₹ 85.00
*अनुवाद : अशोक पाध्ये*
पवनऊर्जा या अपारंपरिक ऊर्जास्रोताबद्दल माहिती देणाऱ्या या पुस्तकात पवनचक्क्यांचा इतिहास, त्यांच्या रचनेतील बदल, त्यामागचे मूलभूत सिद्धांत, इत्यादींचे मनोहर दर्शन घडविलेले आहे.

15. **पदार्थांची नवलाई**
Meterial Marvels ISBN 978-81-237-4652-4
*बी. सी. शर्मा* पृ. 136 ₹ 65.00
*अनुवाद : अ. पां. देशपांडे*
धातू, प्लॅस्टिक, मृदिकी असे मानवाला साहाय्यकारी नानाविध पदार्थ, त्यांची वैशिष्ट्ये, शोध आणि वापर याबाबत बहुमोल माहिती.

16. **पृथ्वी**
The Earth ISBN 978-81-237-1235-2
*सतेंद्र आणि सोमेंद्र कुमार सिंह* पृ. 152 ₹ 100.00
*अनुवाद : सुधाकर भालेराव*
या पुस्तकात पृथ्वीच्या जन्मापासून मानवाच्या उत्क्रांतीपर्यंतची प्रदीर्घ कहाणी सरळ, सुबोध आणि वैज्ञानिक शैलीत सादर केली आहे. भरपूर चित्रे.

17. **भारतातील संकटग्रस्त प्राणी आणि त्यांचे संरक्षण**
Endangered Animals of India and
their Conservation ISBN 978-81-237-2463-8
*एस. एम. नायर* पृ. 105 ₹ 60.00
*अनुवाद : सुहासिनी अग्निहोत्री*
या पुस्तकात भारतातील दुर्मीळ आणि संकटग्रस्त प्राण्यांविषयी माहिती आहे. त्यांचे संरक्षण होण्यास कोणते प्रयत्न आवश्यक आहेत आणि त्यात आपला नेमका सहभाग कोणता असू शकतो, हे एक ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ या पुस्तकात आपल्याला सांगत आहेत.

18. **मनोहारी दीप्ती**
Ravishing Radiance ISBN 978-81-237-7150-9
*बाळ फोंडके / अनुवाद : सुहासिनी अग्निहोत्री* पृ. 88 ₹ 105.00
विश्वाच्या जन्मापासून हा सर्वव्यापी व सर्वगामी किरणोत्सर्ग आपल्या सभोवार आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी लागलेल्या त्याच्या शोधाने आण्विक युगाची सुरुवात केली. ह्या गूढ आविष्काराची उकल करण्याने अणुच्या रचनेला समजणं शक्य झालं. पुढे मानवाने कृत्रिमपणे किरणोत्सर्ग उत्पन्न करणं सुरू केलं. आज, किरणोत्सर्गाच्या उपयोगांची व्याप्ती सर्व व्यवसायात आहे. त्याच्या शोधाची कथा आणि वेगवेगळ्या क्षेत्रात त्याचे कल्पकतेने केलेले उपयोग ह्यांना जाणण्यासाठी हे आहे एक चित्तवेधक वाचन.

19. **मुकबधिर वाणीउपचार : प्रयास पद्धती**
Mukbadhir Vaniupachar: ISBN 978-81-237-6319-4
Prayas Paddhati पृ. 204 ₹ 100.00
*मूळ हिंदी लेखक / मराठी अनुवाद : पंजाब शिरभाते*
वाचाशिक्षणाच्या सध्याच्या दिशाहीन अवस्थेत हे पुस्तक आमूलाग्र बदल घडवून आणेल. तीव्र श्रवणदोष असणाऱ्या आपल्या मुलांना बोलके करण्यासाठी धडपडणाऱ्या पालकांसाठी हे पुस्तक दीपस्तंभासारखे मार्गदर्शक सिद्ध होईल, यात शंका नाही.

20. **वृद्धत्व**
Aging ISBN 978-81-237-3592-9
*कल्लुरी सुब्बाराव / अनुवाद : सुरेश नाडकर्णी* पृ. 84 ₹ 75.00
वृद्धत्वाची थोडक्यात शास्त्रीय माहिती देणारे, आणि जीवनाला सामोरे जाण्याचा सकारात्मक संदेश देणारे नाना उदाहरणांनी मंडित पुस्तक.

21. **शास्त्र आणि शास्त्रज्ञांसंबंधी**

Of Science and Scientists ISBN 978-81-237-6964-6

*ए.एन. कोठेकर, एस.एस. पळसुले, एस.एम. पारेख, एम.पी. नवलकर*

*अनुवाद : एस. एन. जोगळेकर* पृ. 240 ₹ 145.00

शास्त्रज्ञांनी विज्ञानालाच जरी आपला सहचर बनवले असले तरी तेही आपल्याप्रमाणे मानवच आहेत. त्यांचे जीवनही सामान्य माणसांच्या जीवनाप्रमाणे विसंगती आणि चुकांनी भरलेलं असते. एका विजयासाठी अनंत पराजय त्यांनी पत्करलेले असतात आणि थोड्याशा वेडेपणाबरोबरच शालिनता, विनय आणि सचोटी अशा गुणांचा दुर्लभ ठेवाही असतोच. आणि यातूनच मानवी सभ्यतेच्या इतिहासाने या वैज्ञानिक शोधांमुळे अनेक बदल अनुभवले. या पुस्तकाचे मूल्य 'शास्त्र शास्त्रज्ञ आणि सत्य आणि विनोद, विनय आणि मानवता' या लेखांमुळे वाढले आहे. यांतून शास्त्रज्ञांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखवले आहेत तर आख्यायिका शास्त्रज्ञांच्या मानवी अंगाचे दर्शन घडवतात.

22. **श्वासागणिक प्रदूषण**

We Breath And Drink Poison ISBN 978-81-237-3490-3

*एन. मणिवासकम* पृ. 108 ₹ 70.00

*अनुवाद : क. कृ. क्षीरसागर*

हवा, पाणी आणि माती आपण प्रदूषित केलेली आहे. नैसर्गिक स्रोत चुकीच्या पद्धतीने हाताळल्याने आपण गंभीर पर्यावरणीय संकटात सापडलो आहोत. पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्याचे संरक्षण याविषयी सूत्रमय मांडणी असलेले पुस्तक.

23. **सर्वांसाठी दंत आणि मौखिक आरोग्य**

Saransathi Danta Ani Maukhik Arogya

Dental and Oral Health For All (English Original)

*डॉ. अभिजीत कुलकर्णी /* ISBN 978-81-237-7166-3

*अनुवाद : नीलिमा कुलकर्णी* पृ. 92 ₹ 120.00

या पुस्तकाचा हेतू म्हणजे वाचकाला दंत आणि मौखिक आरोग्यविषयक शिक्षण देणे, उपलब्ध असलेल्या उपचार पद्धती आणि आधुनिक काळातील प्रतिबंधात्मक उपाय योजनांची माहिती देणे ज्या योगे मौखिक आरोग्य राखण्यास आणि सुधारण्यास मदत होऊ शकेल.

24. **सागर विज्ञान**
Science of the Oceans ISBN 978-81-237-2648-9
*ए. एन. पी. उमरकुट्टी* पृ. 172 ₹ 90.00
*अनुवाद : अशोक पाध्ये*
सागर आणि त्याचे सुप्त गुणधर्म व सामर्थ्य यांचा अभ्यास जगभर जोमाने चालू आहे. पृथ्वीवरील हवामानावर सागराचे नियंत्रण आहे. सागरविज्ञानाची ओळख करून देणाऱ्या ह्या पुस्तकात आपल्या देशातील सागरसंपत्तीचे विवरण केलेले आहे.

25. **सूक्ष्मजीवाची कहाणी**
Microbe Saga ISBN 978-81-237-5880-0
*बाळ फोंडके / अनुवाद : जयंत श्रीधर एरंडे* पृ. 176 ₹ 125.00
अदृश्य तरी क्षुद्र नाहीत असे सूक्ष्मजीव पृथ्वीवरील सजीवांपैकी सर्वांत प्राचीन सजीव. पृथ्वीवरील प्राथमिक पर्यावरण घडवण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. आपल्याभोवती व आपल्यामध्ये अदृश्य अवस्थेत विपुल प्रमाणात असणाऱ्या या लाखो सूक्ष्मजीवांकडे जवळून सहानुभूतिपूर्वक बघायला लावणारे हे पुस्तक.

26. **सौंदर्याचा ऐना तुझ्याच हाती**
Self Care for Women ISBN 978-81-237-6626-3
*पारुल आर. शेठ* पृ. 168 ₹ 80.00
*अनुवाद : नंदा सं. हरम*
हे पुस्तक म्हणजे स्त्रियांसाठी जीवनाच्या कोणत्याही वळणावर आरोग्यदायी जीवन जगण्याचा कानमंत्र देणारे मार्गदर्शकच. या पुस्तकात स्त्रियांच्या शारीरिक माहितीसह, खासकरून मासिक पाळी, गर्भधारणा, बाळंतपणातील स्वतःची व बाळाची काळजी, रजोनिवृत्ती यांसारख्या काळात कशाप्रकारचा आहार-विहार आणि व्यायाम असावा, याबाबत अमूल्य माहिती दिलेली आहे.

27. **हृदयविकार आणि आपण**
Heart Disease and The Layman ISBN 978-81-237-2986-2
*एस. पद्मावती* पृ. 68 ₹ 45.00
*अनुवाद : जयंत एरंडे*
हृदयविकाराची लक्षणे, चिन्हे, चिकित्सेचे सर्वसामान्य प्रकार, उपचार आणि प्रतिबंधक उपाय यांची सविस्तर चर्चा करणारे एका ज्येष्ठ हृदयविकार तज्ज्ञाने लिहिलेले पुस्तक. सुलभ अनुवाद.

28. **आयुर्वेदाची ओळख**

Ayurveda Unravelled (English Original)

*डॉ. शरदिनी डहाणूकर व डॉ. ऊर्मिला थत्ते* ISBN 978-81-237-7808-2

*अनुवाद : संदिप पाटील* पृ. 240 ₹ 135.00

आयुर्वेद अर्थात चिकित्सा-विज्ञान नक्की आहे तरी काय? हे पुस्तक आयुर्वेदातील 'दोष-धातू-मल' या मुख्य संकल्पनांना सोप्या भाषेत उलगडून सांगते, ज्यानुसार दोष शरीररूपी राज्यातील 'शासक' बनतो तर धातू (अग्नी) 'जनता' आणि मल त्यांचे 'उत्पादन'! वयोमानानुसार जीवनाच्या विविध टप्प्यांवर लहान-सहान तक्रारींवर कोणते उपाय अथवा औषधे घ्यावीत याबद्दलही या पुस्तकात सांगितले गेले आहे.

# लोकप्रिय सामाजिक विज्ञान

1. **१८५७चा उठाव**

   Rebellion 1857 ISBN 978-81-237-6963-9

   *संपा. : पी. सी. जोशी/ अनुवाद : शांता कोठेकर* पृ. 380 ₹ 220.00

   सर्वसाधारणपणे भारताचे पहिले स्वातंत्र्य-युद्ध म्हणून प्रसिद्ध असलेल्या १८५७चा उठाव म्हणजे भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना होय. या उठावाला राष्ट्रीय चळवळीचे परिमाण लाभले असले तरी; या उठावाच्या स्वरूप आणि उद्दिष्टांवर अजूनही वाद होतात. विस्तृत प्राथमिक संदर्भांबरोबरच इतर अनेक ऐतिहासिक दस्तावेजांमधून या पुस्तकातील विविध विषयांवर लिहिलेले निबंध या उठावाचे निश्चित स्वरूप, कारणे, व्याप्ती आणि या उठावाचे राष्ट्रीय साहित्यावरील परिणाम आणि राष्ट्राच्या इतर भागात त्यावर उमटलेल्या प्रतिक्रियांबाबत विस्तृत चर्चा करतात.

2. **काही महान ऑलराउंडर्स**

   Some Great All Rounders ISBN 978-81-237-5617-2

   *सुर्यप्रकाश चतुर्वेदी* पृ. 228 ₹ 75.00

   *अनुवाद : प्रतिमा डिके*

   ज्यांच्यात जन्मजात व नैसर्गिक प्रतिभा आहे, अशा क्रिकेट क्षेत्रातील, साऱ्या जगातील सोळा खेळाडूंच्या कामगिरीची व व्यक्तिमत्त्वाची ओळख या पुस्तकात करून देण्यात आली आहे. सर्वच ऑलराउंडर्सनी किती संघर्ष करत, दुखापती व जखमांशी झुंजत, प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत आपले उद्दिष्ट गाठले, हे पुस्तक वाचून आपल्या लक्षात येते.

3. **प्रतिष्ठेसह विकास**

   Development with Dignity ISBN 978-81-237-6962-2

   *अमित भादुरी / अनुवाद : संतोष दास्ताने* पृ. 108 ₹ 75.00

   स्वातंत्र्य मिळून भारताला सहा दशके उलटून गेली तरी भारतात अजूनही माणुसकीला काळिमा असणारी भीषण गरिबी टिकून आहे. सरकारच्या हस्तक्षेपाने सरकारी उदारीकरण हे याला उत्तर आहे काय? ‘तसे करणे म्हणजे चुकीच्या दिशेने जाणे होय’ असे सैद्धांतिक अर्थशास्त्रात तज्ज्ञ असलेल्या लेखकाच्या प्रस्तुत पुस्तकात सरळ आणि सोप्या भाषेत पण आग्रहाने मांडण्यात आले आहे.

4. **बख्त खान**
Bakhta Khan ISBN 978-81-237-5999-9
*इकबाल हुसैन / अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 24 ₹ 25.00
बख्त खान हे अठराशे सत्तावनच्या लढ्यातील एक मुख्य क्रांतिकारी होते. दिल्ली आणि लखनौमधे त्यांनी इंग्रजांना कडवा विरोध केला होता. सत्तावनच्या लढ्यातील प्रत्यक्ष परिस्थिती, अविश्वासाचे वातावरण, समन्वयाचा अभाव, क्षुद्र सत्ताकारणावर प्रकाश टाकणारी ही छोटेखाणी पुस्तिका.

5. **भगतसिंग : निवडक भाषणे व लेखन**
Bhagat Singh : Selected Speeches & Writtings ISBN 978-81-237-5279-2
पृ. 176 ₹ 95.00
*संपादक : डी. एन. गुप्ता*
*अनुवाद : रमेशचंद्र पाटकर*
शहीद भगतसिंगांच्या जन्मशताब्दीच्या खास प्रसंगी आणि त्यांच्या हौतात्म्याला झालेल्या पंचाहत्तराव्या वर्षाचे स्मरण करताना त्यांची भाषणे, लेखन व पत्रे अशा निवडक लेखसंग्रहाचा यात समावेश आहे.

6. **भारताचा गौरवशाली स्वातंत्र्यसंग्राम आणि स्वातंत्र्योत्तर भारत**
Glorious Indian Freedom Struggle and Post-Independence Era ISBN 978-81-237-6242-5
*डॉ. मोहन धारिया / अनुवाद : माधवी वैद्य* पृ. 116 ₹ 60.00
*प्रस्तावना : डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम*
भारताच्या महान संस्कृतीचा वारसा आणि स्वातंत्र्यासाठी केलेला वैभवशाली संघर्ष यांची ओळख या पुस्तकातून होते. भारताने केलेली प्रगती आणि भावी आव्हानांची कल्पनाही या पुस्तकातून येते. भारताचे संविधान, भारताची नियोजन पद्धती, भारताने केलेली रोमहर्षक प्रगती आणि महासत्तेकडे भारताची चाललेली आत्मविश्वासी वाटचाल याचेही दर्शन या पुस्तकातून होते.

7. **भारताची फाळणी**
Partition of India ISBN 978-81-237-5544-1
*अनिता इंदर सिंह / अनुवाद : अविनाश कोल्हे* पृ. 92 ₹ 40.00
जागतिक राजकारणात जेव्हा शासन आणि धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक घटक एकमेकांत गुंतले, तेव्हा त्याठिकाणी फाळणी करावी लागली. जगाच्या इतिहासात भारताची फाळणी ही एक खळबळजनक घटना होती. या पुस्तकात भारताच्या फाळणीच्या आंतरराष्ट्रीय आयामांची चर्चा आहे.

8. **भारतीय प्रबोधनाच्या महिला प्रणेत्या**

Women Pioneers of India Renaissance

*संपा. : सुशीला नायर, कमला माणकेकर* ISBN 978-81-237-7000-0

*अनुवाद : शांता कोठेकर* पृ. 436 ₹ 230.00

भारतीय प्रबोधनकाळ हा भारतीय राष्ट्रवादाचा उगम आणि प्रसार आणि त्याद्वारे भारतीय स्वातंत्र्य-लढ्याची वाटचाल हे जैविकरीत्या जोडले गेलेले आहेत. या काळाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या प्रवाहातील अनेक महिलांनी दिलेले अभूतपूर्व योगदान. यातल्या प्रत्येकीने स्वतः निवडलेल्या क्षेत्रात आपल्या अंगभूत क्षमतेने आणि त्यागाने मोलाची भर घातली आणि यातून त्यांनी अनेक लोकांचे जीवनच बदलवून टाकले असे नाही तर; एकूणच आधुनिक भारताला निश्चितपणे आकार दिला. हे पुस्तक त्यांचा त्याग, लढा आणि त्यांचे योगदान आपल्या समोर मांडण्याचा प्रयत्न करते. यातल्या प्रत्येक स्त्री-चरित्र आणि त्या संबंधीच्या आठवणींवर ह्या लेखक-द्वयींच्या त्यांच्याशी असलेल्या जवळीकतेचा गाढ ठसा जाणवतो. आणि म्हणूनच वर्तमान आणि भविष्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक दस्तावेज ठरावा.

9. **भारताच्या महिला शेतकरी**

Women Farmers in India ISBN 978-81-237-6803-8

*मैत्रेयी कृष्णराज, अरुणा कांची* पृ. 172 ₹ 95.00

*अनुवाद : विजया साळुंके*

शेती आणि शेतीपूरक क्षेत्रात, दिवसेंदिवस कमी होत चाललेला पुरुषांचा सहभाग आणि महिलांचे या क्षेत्रातील वाढते योगदान यांची अभ्यासपूर्ण मांडणी या पुस्तकात केली आहे. 'भारतीय शेतकऱ्याचा चेहरा आता स्त्री-मुखी झाला आहे' असे ठामपणे या पुस्तकात मांडले असले तरी; या क्षेत्रातील स्त्रीयांना अजूनही दुजाभावाने वागणूक दिली जाते आणि हे एकांगी स्वरूपाच्या सार्वजनिक समजुती आणि धोरणकर्त्यांचा विचार यांमधूनही दिसून येते. सदरचा अभ्यास, भारतातील 'महिला शेतकऱ्यांची अदृश्यता' याविषयी चर्चा घडवून आणण्याच्या दृष्टीने निश्चितच चालना देणारा ठरेल.

10. **भारतीय शेतीची अवस्था**

The Condition of Indian Peasantry ISBN 978-81-237-6192-3

*जी. एस. भल्ला / अनुवाद : मारोती तेगमपुरे* पृ. 120 ₹ 60.00

शेतकऱ्याची त्यांच्या व्यवसायाबद्दलची निराशा, भविष्याच्या दृष्टिकोनातून नियोजनशून्यता, शासनाचा बेजबाबदारपणा तसेच सहकारी आणि इतर

संस्थांच्या कामकाजाच्या ढिसाळ पद्धती यांमुळे लहान आणि सिमांत शेतकऱ्याची स्थिती अतिशय बिकट बनली आहे. ही परिस्थिती बदलावी यासाठी काही महत्त्वपूर्ण सूचना-योजनाही या पुस्तकातून सूचवल्या आहेत.

11. **मध्ययुगीन भारत**

Medieval India ISBN 978-81-237-6965-3

*इरफान हबीब / अनुवाद : विजया कुलकर्णी* पृ. 272 ₹ 180.00

इसवी सन ६०० ते १७५० हा प्राचीन भारत आणि वसाहतकालीन भारत यांना जोडणारा भारताच्या इतिहासातील सर्वांत मोठा कालखंड. भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासाच्या प्रवाहाला निर्णायक वळण या मध्ययुगीन कालखंडातच लाभले. अनेक छोट्या-छोट्या राज्यांची उपस्थिती, वाढते शहरीकरण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास, तत्त्वज्ञान, साहित्य आणि कला क्षेत्रातील भरीव कामगिरी आणि उपखंडांचे एकत्रीकरण हे सर्व याच कालखंडाने पहिले. प्राथमिक ऐतिहासिक साधने, पुरातत्त्वीय संदर्भ, ऐतिहासिक कथानके आणि देशी-परदेशी प्रवाशांनी लिहिलेले वृत्तांत व युरोपियन व्यापारी दस्तावेज यांच्यावर आधारित भारताच्या मध्ययुगीन इतिहासावरील हा एक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ आहे.

12. **सर्वांसाठी अंगणवाडी : प्राथमिक माहिती पुस्तिका**

Anganwadis for All ISBN 978-81-237-6283-8

*देविकासिंग आणि इतर/ अनुवाद : रवींद्र ठिपसे* पृ. 76 ₹ 45.00

एकात्मिक बाल विकास योजनेतील (अंगणवाडी) सर्व कार्यक्रमांचा प्रश्नोत्तर रूपाने या माहिती-पुस्तिकेत आढावा घेण्यात आला आहे.

13. **स्त्री-अस्मितेची अग्निपरीक्षा**

Stri-Asmitechi Agnipariksha ISBN 978-81-237-7231-8

Asmita Ki Agnipariksha पृ. 144 ₹ 135.00

*मीनाक्षी स्वामी / अनुवाद : अनिला फडणवीस*

हे पुस्तक बलात्कारी पुरुषाची मानसिकता, कुटुंब आणि समाज, शेजारी यांची वागणूक, पोलीस आणि न्यायालयीन प्रक्रियेतील गुंतागुंतीच्या गाळात रुतलेल्या असाहाय स्त्रीच्या मनोवस्थेचे सहानुभूतीने आकलन प्रस्तुत करते. यातल्या अनेक प्रकरणांतून हेही दाखवायचा प्रयत्न केला गेला आहे की, तपास-यंत्रणेतील कमकुवतपणा आणि न्यायालयीन प्रक्रियेतील गुंतागुंतीचा फायदा घेऊन बलात्कारी कशा पद्धतीने प्रत्यक्ष पीडित-शोषित स्त्रीलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतात.

# विविध

1. **1857च्या लढ्याबाबत नेहरू आणि आझाद यांचे विचार**
   Nehru & Azad on 1857 ISBN 978-81-237-5565-6
   *अनुवाद : उज्ज्वला म्हात्रे* पृ. 36 ₹ 35.00
   प्रस्तुत पुस्तकात पंडित जवाहरलाल नेहरू आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांनी इंग्रजांविरुद्ध 1857 मध्ये लढल्या गेलेल्या 'पहिले स्वातंत्र्य युद्ध' या विषयावर दिलेल्या भाषणांचे संपादित अंश संकलित केले आहेत.

2. **गुरू नानक वाणी**
   Guru Nanak Vani ISBN 978-81-237-8868-5
   *संपा. : भाई जोध सिंह/अनुवाद : सुनंदा कोगेकर* पृ. 148 ₹ 210.00
   गुरू नानक देव यांच्या विविध विषयांवरील उपदेशांच्या संकलनाचा ओघवता मराठी अनुवाद.

3. **नंदलाल बोस : कला आणि सामाजिक मूल्ये**
   Nandlal Bose: Art and Social Values ISBN 978-81-237-3698-3
   *कृष्ण कृपलानी / अनुवाद : नरेश परळीकर* पृ. 112 ₹ 8.00
   दिल्ली विद्यापीठ हीरक महोत्सवानिमित्त शांतिनिकेतनचे थोर चित्रकार नंदलाल बोस यांचे जीवन आणि कलामूल्ये यांचा ऊहापोह करणारे भाषण.

4. **मराठी काव्यसंग्रह**
   Marathi Kavyasangrah ISBN 978-81-237-6725-3
   *अनिल* (Marathi Original) पृ. 64 ₹ 40.00
   हे संकलन स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी प्रसिद्ध झालेल्या अखिल भारतीय भाषांतील काव्य संग्रहापैकी एक. प्रस्थापितांविरुद्ध झेंडा फडकावणाऱ्या कवींची या संग्रहात ओळख होईल.

5. **भगतसिंहांवरचे पोवाडे**
   Bhagatsinhavarache Powade ISBN 978-81-237-5522-9
   *संकलन : डॉ. गुरुदेवसिंह सिद्धू* पृ. 36 ₹ 25.00
   हे पुस्तक म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील भगतसिंहांवरील प्रतिबंधित पोवाड्यांचे संकलन होय. यातून भगतसिंह यांच्या कृती आणि विचारांची लोकप्रियता आणि लोकांचे त्यांच्यावरील डोळस प्रेम लक्षात येते.

6. **लोकसंख्या स्थिरता भारताचा दीर्घकालीन शोध**
India's Quest for Population Stabilisation ISBN 978-81-237-6790-1 पृ. 236 ₹ 135.00
*आशिष बोस / अनुवाद : विजया साळुंके*
भारताच्या लोकसंख्या धोरणात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन्ही प्रकाराचे बदल झाले त्यांचा मागोवा घेणारे हे पुस्तक आहे. या संदर्भातील अनेक अहवाल, अप्रकाशित कागदपत्रे, दस्तऐवज इत्यादींचा धांडोळा घेऊन, छानन्नी करून प्रभावीपणे वाचकाला या विषयापर्यंत घेऊन जाण्याचे काम हे पुस्तक करते. भारतातील लोकसंख्या सांख्यिकीचा विस्तार आणि लोकसंख्या-विषयक संशोधनातील समस्या यांची चर्चा या पुस्तकात लेखकाने केली आहे.

7. **विजयनगरचे साम्राज्य**
Vijaynagar Empire ISBN 978-81-237-0963-5
*दुमिंगुश पाइश व फेर्नांव नुनीश* पृ. 140 ₹ 65.00
*अनुवाद : चंद्रशेखर जहागिरदार*
विजयनगर राज्याची आणि या राज्यातील काही प्रमुख राज्यकर्त्यांची ही गाथा आहे. विशेषेकरून कृष्णदेवराय या महान राज्यकर्त्याचा वृत्तांत त्याच्या राज्याला भेट दिलेल्या सोळाव्या शतकातील दोन पोर्तुगीज बखरकारांनी येथे वर्णिलेला आहे. या साम्राज्याच्या इतिहासाची मूळ साधने म्हणून या दोन्ही पोर्तुगीज बखरींचे स्थान अबाधित आहे.

8. **शीख धर्मातील निरपेक्ष जाणिवा**
Secular Preceptions in Sikh Faith ISBN 978-81-237-4666-1
*कर्तारसिंग दुग्गल / अनुवाद : आ. ह. साळुंखे* पृ. 108 ₹ 45.00
नानाविध धार्मिक, वांशिक, भाषिक आणि जातीय वारसा असलेल्या आपल्या देशात एक अंतर्गत सुसंवाद आहे. भारतातील एका महान धर्मातील प्रखर धर्मनिरपेक्ष जाणिवांचे चित्रण या पुस्तकात आहे. नवी आवृत्ती.

9. **श्रद्धांजली आणि शब्दचित्रे**
Pen-Portraits and Tributes by Gandhiji ISBN 978-81-237-1466-0
*महात्मा गांधी / संपा. यू. एस. मोहम राव* पृ. 192 ₹ 70.00
*अनुवाद : प्रकाश देशपांडे केजकर*
महात्मा गांधींच्या प्रेमास आणि आदरास पात्र झालेल्या व्यक्तींचा त्यांनी केलेला गौरव, त्यांना अर्पण केलेली श्रद्धांजली यातून उभरणाऱ्या मनोज्ञ शब्दचित्रांचे निवडक संकलन.

10. **सम्राट अकबराच्या जीवनातील प्रसंग**

*कागदपत्रांतील उतारे आणि आठवणी*

Episodes in the life of Akbar ISBN 978-81-237-4229-8

*शरीन मूसवी* पृ. 128 ₹ 125.00

*अनुवाद : विजया कुलकर्णी*

प्रस्तुत ग्रंथात सम्राट अकबराच्या समकालीन दस्तावेजांतून त्याचे सम्यक मूर्तिमंत दर्शन घडते. त्याची बुद्धिमत्ता, धार्मिक सुसंवादासाठीचे अथक प्रयत्न; प्राचीन हिंदू ग्रंथांविषयीची आस्था; स्त्रियांबाबतचा प्रगत दृष्टिकोन इत्यादी अनेक पैलू दृगोचर होतात. व्हिक्टोरिया आणि आल्बर्ट संग्रहालय, लंडन येथील दुर्मीळ लघुचित्रे आणि रेखाचित्रांचा समावेश.

11. **सामाजिक बदलासाठी शिक्षण**

Education for Social Change ISBN 978-81-237-5841-1

*सुचेता महाजन* पृ.76 ₹ 45.00

*अनुवाद : संध्या पेडणेकर*

या पुस्तकात एम. व्येंकटरंगैय्या फाउण्डेशन (MVF) या गैर शासकीय संस्थेने आंध्रप्रदेशात बालमजुरांकरिता चालविलेल्या यशस्वी कार्याचे वर्णन-अनुभव आहेत.

12. **स्वातंत्र्याचा लढा**

Freedom Struggle ISBN 978-81-237-3052-3

*बिपन चंद्र, अमलेश त्रिपाठी, बरुन डे* पृ. 160 ₹ 90.00

*अनुवाद : मा. कृ. पारधी*

आपल्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, त्यातील सर्व छटांसह आणि सखोल आशयासह, संक्षिप्त स्वरूपात मांडणारे आणि लढ्याला हातभार लावणाऱ्या भिन्नभिन्न शक्तींचे आणि प्रवृत्तींचे समर्पक चित्र रेखाटणारे, थोर इतिहास-तज्ज्ञांनी लिहिलेले पुस्तक.

13. **हिंदू धर्म म्हणजे काय?**

What is Hinduism? ISBN 978-81-237-1523-4

*महात्मा गांधी / अनुवाद : तारा धर्माधिकारी* पृ. 108 ₹ 55.00

या पुस्तकात महात्मा गांधीच्या हिंदू धर्मविषयक निवडक विचारांचे संकलन करण्यात आलेले आहे. त्यांच्या सर्वसमावेशक वृत्तीचे प्रतिबिंब यात दिसून येते.

# आदान प्रदान

*कथा*

1. **कथाभारती : उर्दू लघुकथा**

   Katha Bharati : ISBN 978-81-237-4631-9
   Urdu Short Stories पृ. 234 ₹ 80.00
   *अनुवाद : श्रीपाद जोशी*
   आधुनिक उर्दू साहित्यातील श्रेष्ठ कथाकार कृष्णचंदर, राजेंद्रसिंह बेदी आणि इस्मत चुगताई यांच्या कथा या संग्रहात समाविष्ट आहेत. नावाजलेला अनुवाद आणि आकर्षक मुखपृष्ठ.

2. **कथाभारती : गुजराती लघुकथा**

   Katha Bharati : ISBN 978-81-237-1232-1
   Gujrati Short Stories पृ. 196 ₹ 75.00
   *संपा. य. शुक्ल आणि अ. ब्रम्हभट्ट*
   *अनुवाद : दीपक कुमार*
   गुजराती भाषेतील विख्यात वीस कथांचा हा संग्रह गुजराती कथासाहित्याच्या संपन्नतेचा आणि खोलीचा मराठी वाचकांना विशेष परिचय घडवून आणण्यास समर्थ आहे.

3. **कथाभारती : तमिळ लघुकथा**

   Katha Bharati : ISBN 978-81-237-4894-8
   Tamil Short Stories पृ. 220 ₹ 80.00
   *संपा. मी. पा. सोमसुंदरम/ अनुवाद : श्रीपाद जोशी*
   तमिळनाडूमधील लक्षणीय वीस लघुकथांचा संग्रह. तमिळ कथासाहित्यातील नाना प्रवाहांचे विवरण करणारी साक्षेपी प्रस्तावना.

4. **कथाभारती : तेलुगू कहाण्या**

   Katha Bharati : Telugu Short Stories ISBN 978-81-237-4633-4
   *संपा. व्ही. पांडुरंग राव आणि पु. स. शर्मा* पृ. 360 ₹ 145.00
   *अनुवाद : नरेंद्र बल्लाळ*
   आंध्रप्रदेशातील सत्तावीस आधुनिक तेलुगू-लघुकथा या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. या कथांतून तेलुगू-भाषकांच्या जीवनाचा वेगवेगळा अविष्कार प्रतीत होतो.

5. **कथाभारती : पंजाबी लघुकथा**

Katha Bharati : Punjabi Short Stories ISBN 978-81-237-4895-5

*संपा. हरभजन सिंह / अनुवाद : प्रभाकर माचवे* पृ.180 ₹ 70.00

सन सत्तेचाळीसच्या देश विभाजनाने पंजाबी कथेला विशेष प्रभावित केले आहे. तरीही पूर्वग्रह आणि एकांगी कडवटपणापासून मुक्त अशा जीवनदृष्टीत या कथांचे यश सामावले आहे.

6. **कथाभारती : बंगाली लघुकथा**

Katha Bharati :

Bengali Short Stories ISBN 978-81-237-0266-7

*संपा. अ. मुखोपाध्याय / अनुवाद : सुमती सरन* पृ. 232 ₹ 85.00

आधुनिक काळातील समस्यापूर्ण नागरी जीवन आणि पश्चिमेकडील नद्यांनी समृद्ध असे ग्रामजीवन यांचे बंगाली साहित्यात प्रतिबिंब दिसून येते. रवीन्द्रोत्तर बंगाली साहित्याचा मौलिक परिचय करून देणारा लघुकथासंग्रह.

7. **कथाभारती : मराठी लघुकथा**

Katha Bharati : Marathi Short Stories ISBN 978-81-237-3644-4

(Original Marathi) पृ. 240 ₹ 125.00

*संपा. भालचंद्र फडके*

मराठी लघुकथेचा उगम आणि विकास याचा प्रत्यय देणाऱ्या निवडक एकोणीस कथांचा संग्रह. अभ्यासपूर्ण प्रस्तावना.

8. **कथाभारती : मल्याळम लघुकथा**

Katha Bharati : ISBN 978-81-237-4015-7

Malyalam Short Stories पृ. 176 ₹ 70.00

*संपा. ओमचेरी एन. पिळ्ळा*

*अनुवाद : सुनील सुभेदार*

समृद्ध मल्याळम कथासाहित्यातील विविध प्रवाहांचा आणि वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैलींचा परिचय करून देणारा कथासंग्रह.

9. **कथाभारती : हिंदी लघुकथा**

Katha Bharati : Hindi Short Stories ISBN 978-81-237-4431-5

*संपा. नामवर सिंह / अनुवाद : प्रभाकर माचवे* पृ. 196 ₹ 105.00

हिंदी कथासाहित्य प्रवाहातील विविध वळणांचा समर्थ आढावा घेणारा रोचक कथासंग्रह.

10. **जयकांतनच्या कथा**
Stories of Jaykanthan ISBN 978-81-237-4818-4
*डी. जयकांतन* पृ. 192 ₹ 90.00
*अनुवाद : माधव कानिटकर*
विख्यात तमिळ लेखक जयकांतन यांच्या निवडक कथांचा संग्रह. या कथा संवेदनाशीलही आहेत आणि मर्मभेदकही, यात चीडही आहे आणि तटस्थताही.

11. **निवडक पुदुमैपित्तन**
Selected Puddumaipittan ISBN 978-81-237-4893-1
*पुदुमैपित्तन* पृ. 120 ₹ 55.00
*अनुवाद : श्रीकांत रानडे*
सखोल चिंतन, अप्रतिम शैली आणि कथावस्तूतील विविधता या त्यांच्या गुणांमुळे तमिळ साहित्यात पुदुमैपित्तन यांनी चिरंतन स्थान मिळविलेले आहे. नवी आवृत्ती.

12. **निवडक प्रेमचंद**
Selected Premchand ISBN 978-81-237-2970-1
*संकलन : राधाकृष्ण* पृ. 204 ₹ 65.00
*अनुवाद : दिनकर साक्रीकर*
भारतीय ग्रामीण जीवनाचे घनघोर वास्तव वाचकांसमोर जिवंत करणारे श्रेष्ठ हिंदी साहित्यिक प्रेमचंद यांच्या निवडक कथांचे संकलन.

13. **समकालीन हिंदी कथा**
Contemporary Hindi Stories ISBN 978-81-237-3774-4
*संपा. धनंजय वर्मा / अनुवाद : निशिकांत ठकार* पृ. 256 ₹ 85.00
समकालीन हिंदी कथेच्या अनेक पातळ्या, प्रवृत्ती आणि प्रवाह आहेत. ही बहुध्वन्यात्मकता अधोरेखित करणारा संग्रह.

14. **हिमांशू जोशी : निवडक कथा**
Himanshu Joshi : ISBN 978-81-237-6243-2
Sankalit Kahaniyan पृ. 192 ₹ 145.00
*हिमांशू जोशी / अनुवाद : अरुण मांडे*
या कथासंग्रहात स्वतः लेखकाने निवडलेल्या तेवीस कथा समाविष्ट आहेत. कल्पना आणि वास्तव, फँटसी आणि वास्तविकता यांमध्ये गोंधळलेल्या

परिस्थितीमध्ये स्वातंत्र्योत्तरकालीन भारतीय नागरिकाचे जीवन-प्रपंच, संशय आणि दहशत यात व्यक्त झाले आहे. त्यांचं विस्मयकारी दर्शन या कथांमध्ये पूर्णपणे विश्लेषित झाले आहे. लहान मुलासारखी जिज्ञासा, कुठले तरी आठवणींचे धागे, पारिवारिक जीवनातले चढउतार, तर कुठं उपेक्षितांचं दुखः. कधी या कथा म्हणजे प्रत्यक्ष आयुष्य आहे तर; कधी आयुष्य म्हणजे या कथा आहेत असं वाटू लागत.

## *कविता*

15. **नव्या जगाला प्रणाम**

Navya Jagala Pranam — ISBN 978-81-237-3725-6

*अली सरदार जाफरी / अनुवाद : श्रीपाद जोशी* — पृ.108 ₹ 55.00

एका प्रसिद्ध उर्दू शायराचे स्वातंत्र्यलढ्यावरील प्रतिकात्मक दीर्घकाव्य.

## *कादंबरी*

16. **भारतीपूर**

Bharatipur (Kannada Original) — ISBN 978-81-237-7810-5

*यू. आर. अनंतमूर्ती* — पृ. 240 ₹ 205.00

*अनुवाद : उमा कुलकर्णी*

या कादंबरीचा नायक 'जगन्नाथ' हा आधुनिक-सुधारक प्रवृत्तीचा प्रतिनिधी आहे. स्वतःतील आणि अवतीभवतीच्या परिस्थितीत बदल घडवण्याच्या प्रयत्नांत जगन्नाथ अनपेक्षित आणि हिंसक घटनांमध्ये कसा अडकत जातो हे यू. आर. अनंतमूर्तींनी त्यांच्या गोष्ट सांगण्याच्या हातोटीतून वाचकांसमोर आणले आहे. सामाजिक वास्तवाला थेट भिडणारी अभिव्यक्ती, तिचे मूलगामी विश्लेषण करणारा नैतिक दृष्टिकोन यांद्वारे आधुनिक भारतातील सामाजिक न्याय आणि जातिव्यवस्था यांच्यातील सूक्ष्म गुंतागुंत लेखक समर्थपणे उलगडून दाखवितात.

17. **ऊनसावली**

Una-Sawali — ISBN 978-81-237-7809-9

*चुनीलाल मडिया / अनुवाद : दीपक कुमार* — पृ. 324 ₹ 270.00

काळानुसार बदलणाऱ्या जनमानसाची ही कथा. कादंबरीतील वातावरण अगदी थेट सौराष्ट्राचे आहे. तत्कालीन सौराष्ट्रातील दळणवळण, रस्ते, घरं, व्यक्ती, प्रसंग वर्णन, संवाद आणि लोकांची वृत्ती, त्यांची मने या सर्वांचे सूक्ष्म निरीक्षण यातून आढळते. ग्रामीण जीवनाच्या चित्रणात चुनीलाल मडिया यांचा हातखंडा

आहे. प्रादेशिक वातावरण व विशिष्ट निवेदनशैली यांमुळे प्रस्तुत कादंबरी विलक्षण मनोवेधक झाली आहे. दीपक कुमार यांनी या कादंबरीचा अनुवाद केला आहे.

18. **अनादी अनंत**

Anadi Anant ISBN 978-81-237-3744-7

*श्रीरंग / अनुवाद : शकुंतला बोरगावकर* पृ. 208 ₹ 185.00

श्रीरंग ऊर्फ आद्य रंगाचार्य यांच्या या कन्नड कादंबरीचे कथानक आहे स्त्री-पुरुष संबंध. केवळ तीन पात्रांद्वारे लेखकाने हे कथाबीज प्रभावीपणे व्यक्त केले आहे.

19. **आगीचा दर्या**

Aagicha Darya ISBN 978-81-237-4922-8

Aag Ka Darya (Hindi Original) पृ. 384 ₹ 120.00

*कुर्रतल-ऐन हैदर / अनुवाद : श्रीपाद जोशी*

'आग का दरिया' ह्या अस्तित्वाच्या प्रश्नाला सामोरे जाणाऱ्या आणि प्राचीन भारतापासून ते स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात लीलया संचार करणाऱ्या विलक्षण मूळ उर्दू कादंबरीचा अनुवाद.

20. **कठडा**

Kathada (Marathi), ISBN 978-81-237-0449-6

Enipadkkal (Malyalam Original) पृ. 516 ₹ 85.00

*तकषी शिवशंकर पिळ्ळा*

*अनुवाद : माधव कानिटकर*

केरळच्या पार्श्वभूमीवर नोकरशाहीचे चित्रण करणारी सुप्रसिद्ध मल्याळम लेखकाची 'एनिपडिक्कळ' ही विदारक कादंबरी.

21. **कपिलीकाठची कहाणी**

Kapilikathachi Kahani/ ISBN 978-81-237-6726-0

Kapiliparia Sadhu (Original Asmiya) पृ. 76 ₹ 60.00

*नवकांत बरुआ/ अनुवाद : श्री. बा. जोशी*

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे सळसळते चैतन्य जाणवून देणारी ही एक मनोवेधक कादंबरी. उत्कट अनुभूती आणि सुसाटत पुढे धावणाऱ्या पाणलोटासारख्या गतिमान जाणिवेमुळे मूळ असमिया भाषेत लिहिलेली ही कादंबरी मनाचा ठाव घेते.

22. **कपीशजी**

Kapishji (Marathi), ISBN 978-81-237-6226-5

Kapishji (Hindi Original) पृ. 148 ₹ 120.00

*मनोहर श्याम जोशी/अनुवाद : विशाल तायडे*

'कपीशजी' ही मनोहर श्याम जोशींची मरणोत्तर प्रसिद्ध झालेली कादंबरी. एका लहानशा गावातला विनायक उर्फ कपीश हा मुलगा आयुष्यातील वळणं अनुभवत कसा आंतरराष्ट्रीय पातळीवरचा आध्यात्मिक गुरू बनतो, त्याची ही कहाणी आहे. त्याच्या तीन पिढ्यांचा इतिहास अतिशय मार्मिक आणि विडंबणात्मक शैलीत लेखकाने मांडला आहे.

23. **कवी**

Kavi (Marathi)/ ISBN 978-81-237-4764-0

Kavi (Original Bengali) पृ. 224 ₹ 60.00

*ताराशंकर बंदोपाध्याय*

*अनुवाद : अरुणा नगरकर*

साहित्य अकादमी आणि भारतीय ज्ञानपीठ पारितोषिकाने विभूषित लेखकाची व्यक्तिचित्रणाचे विलक्षण सामर्थ्य असलेली 'कवी' ही कादंबरी आधुनिक बंगाली साहित्याची नांदीच मानली जाते. नवी आवृत्ती.

24. **काळी माती हिरवी नाती**

Kali Mati Hiravi Nati (Marathi), ISBN 978-81-237-2616-8

Maila Anchal (Hindi Original) पृ. 320 ₹ 100.00

*फणीश्वर नाथ 'रेणु' / अनुवाद : श्री. ज. जोशी*

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय जीवनाची सर्वोत्तम, कलात्मक आणि वास्तववादी कृती म्हणून नावाजलेल्या 'मैला आँचल' या मूळ हिंदी कलाकृतीचा अनुवाद.

25. **काठनिबारी घाट**

Kathnibari Ghat (Marathi) ISBN 978-81-237-3733-1

Kathnibari Ghat (Asamiya Original) पृ. 136 ₹ 65.00

*महिम बरा / अनुवाद : शोभना रानडे*

आधुनिक असमिया लघुकथेच्या क्षेत्रात महिम बरा यांचे स्थान अद्वितीय आहे. वातावरण निर्मिती आणि मनोविश्लेषणात प्रावीण्य असलेला हा लेखक ग्रामीण जीवनाचे चित्रण तेवढ्याच कुशलतेने करतो.

26. **कोमेजलेला चंद्र** (सुधारित आवृत्ती/मुद्रनाधीन)
Komejlela Chandra (Marathi), ISBN 978-81-237-
Mala Janhya (Odiya Original) पृ. 76 ₹ 15.00
*उपेंद्रकिशोर दास*
*अनुवाद : नागनाथ कोत्तापल्ले*
जठरकुमारी विवाहाचे वास्तववादी चित्रण करणाऱ्या 'मला जन्ह्य' या मूळ उडिया कादंबरीचा अनुवाद. सहजसाध्या बोलीभाषेत लिहिलेल्या या कादंबरीत वास्तवाच्या प्रखर आंचेने जीवन कसे कोमेजून जाते याचे चटका लावणारे वर्णन आहे.

27. **ग्रामायण**
Gramayan (Marathi), ISBN 978-81-237-2848-3
Gramayan (Kannada Original) पृ. 420 ₹ 130.00
*रावबहादुर कुळकर्णी*
*अनुवाद : श्री ज. जोशी*
'ग्रामायण' या मूळ कन्नड कादंबरीच्या या वैशिष्ट्यपूर्ण अनुवादात एका गावाच्या पटावरील मानवी सुखदुःखाची, ऱ्हासाची आणि अविवेकी शौर्याच्या फोलपणाची विलक्षण कहाणी.

28. **जागरी**
Jagari (Marathi), ISBN 978-81-237-1210-0
Jagari (Bangla Original) पृ. 232 ₹ 100.00
*सतीनाथ भादुडी / अनुवाद : शंकर सारडा*
बेचाळीस सालच्या ऑगस्ट-क्रांती-आंदोलनाची धगधगती पार्श्वभूमी लाभलेल्या 'जागरी' या मूळ बांगला कादंबरीने बांगला राजकीय कादंबरीचा नवा अध्यायच उघडला. एका बहुचर्चित कृतीचा अनुवाद.

29. **जीवन हे असे आहे**
Jevan He Ase Ahe (Marathi), ISBN 978-81-237-1050-1
Ye Hamara Jivan (Punjabi Original) पृ. 68 ₹ 35.00
*दलीप कौर टिवाणा / अनुवाद : विद्या बाळ*
एका जीवनोत्सुक स्त्रीची स्वतःच्या जीवनावर अधिकार न राहिल्यामुळे झालेली असहाय परवड. अतिशय समर्थपणे लिहिलेली आणि अनुवादिलेली 'ए हमारा जीवन' ही पंजाबी कादंबरी.

30. **तमस**

Tamas (Marathi),

Tamas (Hindi Original) ISBN 978-81-237-1377-9

*भीष्म साहनी* पृ. 276 ₹ 80.00

*अनुवाद : चंद्रकांत पाटील*

भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'तमस' ही मूळ हिंदी विदारक कादंबरी. या कृतीसाठी लेखकाला साहित्य अकादमी सन्मान प्राप्त झाला. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त अनुवाद, वेधक मुखपृष्ठ.

31. **त्याने जंगल जिंकले**

Tyane Jangle Jinkale (Marathi) ISBN 978-81-237-5978-4

Usane Jungle Ko Jeeta (Hindi Original) पृ. 88 ₹ 55.00

*केशव रेड्डी*

*अनुवाद : वसंत केशव पाटील*

निसर्ग आणि मानव यांच्यातील शाश्वत संघर्षाला डुकरिणीच्या शोधाच्या निमित्ताने लेखकाने अत्यंत प्रत्ययकारी रूपात मांडले आहे. असंख्य मर्यादांसह निसर्गाशी दोन हात करण्याच्या अदम्य मानवी साहसाचे रोमांचकारी चित्रण.

32. **ना राधा ना रुक्मिणी**

Na Radha Na Rukmini ISBN 978-81-237-1964-1

*अमृता प्रीतम* पृ. 104 ₹ 80.00

*अनुवाद : हेमा जावडेकर*

एका प्रसिद्ध चित्रकाराच्या जीवनावर आधारित साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कारप्राप्त कादंबरीत त्यांच्या एकाकी प्रेम-जीवनाचे चित्रण अमृता प्रीतम यांनी अत्यंत गहिरेपणे आणि सूचकतेने केले आहे.

33. **निसर्ग**

Nisarg (Marathi),

Nisarg (Kannad Original) ISBN 978-81-237-1826-2

*मिर्जि अण्णाराया* पृ. 256 ₹ 60.00

*अनुवाद : उमाकांत ठोमरे*

'निसर्ग' ही परंपरानिष्ठ समाजातील एक असफल प्रणयकथा. या सुप्रसिद्ध कादंबरीत कन्नड समाजातील रीतीभाती आणि प्रादेशिक लोकपरंपरांचे समृद्ध चित्रण आहे.

34. **नीलशैल**

Nilshail (Marathi), ISBN 978-81-237-3756-0

Nilshali (Odiya Original) पृ. 256 ₹ 90.00

*सुरेंद्र महांति / अनुवाद : वसुधा माने*

'नीलशैल' या मूळ उडिया कादंबरीचे कथानक सतरा-अठराव्या शतकात घडते. या कादंबरीत भक्ती आणि देशप्रेम एकमेकांत गुंफलेले आहे. ही जशी एक यशस्वी कादंबरी आहे तसेच साधासुधा आणि विषण्ण इतिहासही आहे.

35. **पत्त्यांचे बंगले**

Pattyanche Bangle (Marathi), (Out of Print)

Peka Medalu (Telugu Orignal) पृ. 120 ₹ 13.50

*मुप्पाळ रंगनायकम्मा / अनुवाद : मो. ग. तपस्वी*

'पेका मेडाळू' या प्रसिद्ध तेलुगू कादंबरीच्या या अनुवादात स्वतःच्या अगतिकतेची व्याकूळ जाण असलेल्या आधुनिक स्त्रीचे सजीव चित्रण केलेले आहे.

36. **परशा**

Parsha (Marathi), ISBN 978-81-237-5962-3

Parsa (Punjabi Original) पृ. 348 ₹ 145.00

*गुरूदयाल सिंह / अनुवाद : वसंत केशव पाटील*

पंजाबचे लोकप्रिय ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखक गुरूदयाल सिंह यांची एक अत्यंत लोकप्रिय कालाकृती. चाळीस वर्षीय विधवा जी कालांतराने आपल्या दोन्ही मुलांपासून वेगळी होते, आपल्या प्रिय मुलाला तथाकथित पोलीस एनकाउण्टरमधे गमावते आणि त्याच्या अंत्यसंस्काराबाबतीत शेवटच्या त्याच्या ईच्छेखातर समाजाचा रोषही पत्करते ... तत्त्वे आणि वास्तवाच्या तणावात धडपडणाऱ्या मानवाची अप्रतिम कहाणी.

37. **पात्तुम्माची शेळी व बालमैत्रीण**

Pattummachi Sheli ani Balmaitrin (Marathi) (Out of Print)

Pattummayute Atu and Balyakal Sakhi पृ. 132 ₹ 10.00
(Malyalam Orignal)

*वैकुम मुहम्मद बशीर / अनुवाद : उमाकांत ठोमरे*

'पात्तुम्मायुटे आटू' आणि 'बाल्यकाल सखी' या मल्याळम साहित्यातील एका थोर लेखकाच्या सर्वोत्तम कादंबऱ्यांचा सार्थ अनुवाद.

38. **प्रतिपदा**

Pratipada (Marathi), ISBN 978-81-237-0314-5

Pratipada (Asamiya Original) पृ. 224 ₹ 95.00

*वीरेंद्र कुमार भट्टाचार्य*

*अनुवाद : माधव कानिटकर*

1937 साली दिग्बोई येथे झालेल्या मजूर संपाच्या पार्श्वभूमीवर समाजाच्या विविध थरांतील स्वातंत्र्यलक्षी मूल्यांचा शोध घेणाऱ्या 'प्रतिपदा' ह्या मूळ असमिया कादंबरीचा प्रवाही अनुवाद.

39. **मानवजन्माचे नाटक**

Manav Janmache Natak (Marathi) (Out of Print)

Manvini Bhavai (Gujrathi Original) पृ. 278 ₹ 17.00

*पन्नालाल पटेल / अनुवाद : भाऊ धर्माधिकारी*

मूळ 'मानवीनी भावाई' ह्या श्रेष्ठ गुजराती कादंबरीचा हा अनुवाद. यात ज्या दुष्काळाचे वर्णन आहे तो दुष्काळ आणि जगण्याचा संघर्ष याला केवळ ऐतिहासिक महत्त्व नाही, तर त्यातून एका भयानक अनुभवाचा साक्षात्कार वाचकांना होतो.

40. **माणसाची रूपं**

Manasachi Roope (Marathi), ISBN 978-81-237-2358-7

Manushya Ke Roop (Hindi Original) पृ. 278 ₹ 155.00

*यशपाल / अनुवाद : वा. रा. कांत*

साधनहीन आणि साधनसंपन्न वर्गातील तरुणींच्या चित्रणाद्वारे यशपाल यांनी स्त्रीस्वातंत्र्याचा प्रश्न येथे भेदकपणे उभा केलेला आहे. उत्कृष्ट राजकीय आणि सामाजिक जाणिवांनी त्यांचे लिखाण रसरसलेले आहे. 'मनुष्यके रूप' या त्यांच्या मूळ हिंदी कादंबरीचा हा अनुवाद.

41. **मुक्ती**

Mukti (Marathi), (Out of Print)

Mukti (Kannad Original) पृ. 184 ₹ 35.00

*शांतिनाथ देसाई / अनुवाद : महेश जोशी*

कन्नड साहित्यातील नव्या शैलीचे जनक शांतिनाथ देसाई यांच्या 'मुक्ती' या सुप्रसिद्ध मूळ कन्नड कादंबरीच्या अनुवादात जीवनाकडे पाहण्याच्या विविध दृष्टी प्रतीत झाल्यामुळे, या कादंबरीला यथार्थ जीवनदर्शनाचे मौलिक परिणाम लाभले आहे.

42. **मृत्यूनंतर**

Mrutyunantar (Marathi), ISBN 978-81-237-4388-2

Alida Mele (Kannad Original) पृ. 180 ₹ 65.00

*शिवराम कारंत*

*अनुवाद : केशव महागावकर*

लेखकाने ज्याच्याबरोबर अर्धा दिवस प्रवास केला अशा व्यक्तीची ही जीवनगाथा. पद्‌मभूषण शिवराम कारंत यांनी 'अलिदा मेले' या मूळ कन्नड भाषेत लिहिलेल्या कादंबरीत मानवी जीवनाच्या सारतत्त्वाला स्पर्श करायचा प्रयत्न केला आहे.

43. **राग दरबारी**

Rag Darbari (Marathi), ISBN 978-81-237-1226-0

Rag Darbari (Hindi Original) पृ. 292 ₹ 135.00

*श्रीलाल शुक्ल / अनुवाद : श्रीपाद जोशी*

स्वातंत्र्योत्तर हिंदी कादंबरीक्षेत्रातील 'राग दरबारी' ह्या नावाजलेल्या कृतीचा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त अनुवाद. या कादंबरीत उपरोधाबरोबरच असलेल्या गांभीर्यामुळे ती अभिजात वाङ्मयाच्या तोडीची झालेली आहे.

44. **रात्र अर्ध्या चंद्राची**

Ratra Ardhya Chandrachi (Marathi) ISBN 978-81-237-0961-1

Adh Chandni Rat (Punjabi Original) पृ. 116 ₹ 55.00

*गुरूदयाल सिंह / अनुवाद : विद्या बाळ*

समकालीन पंजाबी साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेल्या साहित्यिकाची 'अध चाँदनी रात' ही सामाजिक न्याय आणि व्यक्तिगत आकांक्षातील प्रक्षोभक संघर्ष नेमकेपणे टिपणारी कादंबरी.

45. **विसरलेली स्मृतिचित्रे**

Visarleli Smritichitre (Marathi) ISBN 978-81-237-4405-6

Bhule Bisare Chitra (Hindi Original) पृ. 340 ₹ 115.00

*भगवतीचरण वर्मा / अनुवाद : इंदुमती केळकर*

'भूलेबिसरे चित्र' या गाजलेल्या हिंदी कादंबरीचा हा अनुवाद. एकत्र कुटुंबपद्धतीचा अस्त, मध्यम वर्गाचा उदय, सरंजामशाहीचा भांडवलशाहीने केलेला पराभव आणि राष्ट्रीय आंदोलनाचा विकास अशा चार बिंदूंवर कादंबरीचे कथानक तोलले आहे.

46. **शिकार**

Shikar (Marathi), ISBN 978-81-237-3669-X

Shikari (Kannad Original) पृ. 260 ₹ 85.00

*यशवंत चित्ताल/ अनुवाद : केशव महागावकर*

'शिकारी' ह्या मूळ कन्नड कादंबरीच्या ह्या अनुवादात मानव स्वार्थी हेतूने इतरांची कशी शिकार करतो हे सांगताना लेखकाने मानवी जीवनाच्या श्रेयाबाबत मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत.

47. **श्वेत रक्त**

Shwet Rakta (Marathi), ISBN 978-81-237-3770-6A

Chitta Lahu (Punjabi Original) पृ. 188 ₹ 90.00

*नानक सिंह / अनुवाद : हेमा जावडेकर*

'चिट्टा लहू' ह्या मूळ पंजाबी कादंबरीचा हा पुरस्कारप्राप्त अनुवाद वाचकाला अंतर्बाह्य हलवून सोडतो. अज्ञान, अस्पृश्यता, स्त्रियांवरील अत्याचार इत्यादी गोष्टींची गुंफण कथानकात अतिशय परिणामकारकरीत्या झालेली आहे.

48. **सूर्यमुखीचे स्वप्न**

Surajmukhiche Swapna (Marathi) ISBN 978-81-237-4393-6

Suraj Mukir Sapna (Asamiya Original) (Out of Print)

*सय्यद अब्दुल मलिक / अनुवाद : अशोक जैन* पृ.164 ₹ 90.00

सय्यद अब्दुल मलिक हे असमिया भाषेतील प्रसिद्ध लेखक आहेत. अकादमी पारितोषिक विजेत्या 'सूरजमुखीर सपना' या त्यांच्या कादंबरीत आसाममधील मुसलमान समाजाचे चित्रण आहे. प्रेमकथेचा घाट असलेल्या या कादंबरीत निसर्गाच्या कोपाला तोंड देणाऱ्या मानवी शक्तीचे प्रभावी वर्णन आहे.

49. **सेतू**

Setu (Marathi), ISBN 978-81-237-3749-1

Varadhi (Telugu Original) पृ. 212 ₹ 30.00

*द्विवेदुल विशालाक्षी / अनुवाद : गिरिजा कीर*

'वरधि' या तेलुगू भाषेतील कादंबरीचा हा अनुवाद. जीवनातील निरनिराळ्या हेतूंमध्ये आणि आदर्श विचारांमध्ये सेतू बांधता येतील का? याचा ही कादंबरी ऊहापोह करते. द्विवेदुल विशालाक्षी तेलुगू भाषेतील सुप्रसिद्ध लेखिका असून त्यांच्या कादंबऱ्यांत संवेदनशीलता आणि वास्तवता यांचे हृदयंगम चित्रण आढळते.

50. **सेवासदन**

Sevasadan (Marathi), ISBN 978-81-237-6961-5

Sevasadan (Hindi Original) पृ. 308 ₹ 215.00

*प्रेमचंद*

*अनुवाद : सुरेशचंद्र नाडकर्णी*

प्रेमचंद यांची 'सेवासदन' ही पहिली मोठी कादंबरी. ती आधी हिंदीत 'सेवासदन' या नावाने १९१९ मध्ये जरी प्रकाशित झाली असली तरी; ती मुळात उर्दू भाषेत 'बाजार-ए-हुस्न' या नावाने लिहिली गेली होती आणि जी कालांतराने उर्दूत त्याच नावाने लाहोर येथून १९२४ साली प्रकाशित झाली. पारतंत्र्याच्या बेड्यांमध्ये जखडलेल्या राष्ट्राचेच प्रतीक ठरलेल्या विवश स्त्री-जीवनाचे मर्मग्राही चित्रण यात आढळते. लग्न, लैंगिकता आणि वेश्यावृत्ती बाबतीत त्या काळच्या प्रचलित राजकीय-धार्मिक मूल्य-व्यवस्थेच्या दुटप्पीपणावर ही कादंबरी खरमरीत भाष्य करते. समाज-संस्कृती आणि परंपरेचे समाजातील तथाकथित आधारस्तंभ बनलेले उच्चभ्रू ठेकेदार बंद दाराआड त्याच संस्कृती-मूल्यांना पायदळी तुडवतात हेही ही कालाकृती अतिशय सूक्ष्मपणे दाखवते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या शहरी स्त्री-पुरुषांच्या बदलत्या आंतर-संबंधांचे आणि हिंदू-मुस्लीम समाजाच्या परस्पर बदलत्या विश्वास-अविश्वासाचे ही कादंबरी अतिशय मार्मिक विश्लेषण करते.

## *नाटके आणि एकांकिका*

51. **अंधायुग**

Andha Yug (Marathi), ISBN 978-81-237-6009-4

Andha Yug (Hindi Original) पृ. 75 ₹ 55.00

*डॉ. धर्मवीर भारती*

*अनुवाद : शशिकांत कुलकर्णी*

अंधाराच्या रोरावत्या महासागराच्या आव्हानांचा स्वीकार करण्याची, पर्वतप्राय लाटांशी निःशस्त्र आणि रिकाम्या हातांनी झुंजण्याची, त्या अथांगात खोलवर डुंबण्याची, आणि स्वतःला या साऱ्या संकटात झोकून देत, श्रद्धा, सत्य, प्रकाश आणि विवेकरूपी मर्यादेचे काही कण वेचून सांभाळत धरतीवर येण्याच्या हव्यासाचं फलित म्हणजे ही कलाकृती.

52. **ईला**

Ila (Marathi) ISBN 978-81-237-5926-5B

*प्रभाकर श्रोत्रिय / अनुवाद : अरुण मांडे* पृ. 92 ₹ 50.00

प्रभाकर श्रोत्रिय यांची ही एक बहुचर्चित आणि सन्मानित नाट्यकृती. ह्या नाट्यकृतीने हिंदी रंगभूमीला नवे प्रश्न, नवी भूमिका यांची संवेदनशील जाण दिली.

53. **तीन पंजाबी नाटके**

Teen Punjabi Natake (Marathi) ISBN 978-81-237-2159-0

*बलवंत गार्गी, दुग्गल आणि सेखों* पृ. 156 ₹ 80.00

*अनुवाद : चंद्रकांत पाटील*

गार्गी, दुग्गल आणि सेखों या त्रयीने पंजाबी भाषेतील नाट्यसाहित्य संपन्न केले आहे. पंजाबीतील तीन विभिन्न शैलीतील या नाटकांना डॉ. हरभजन सिंह यांची विस्तृत प्रस्तावना लाभलेली आहे.

54. **पंजाबी एकांकिका**

Punjabi Ekankika (Marathi) ISBN 978-81-237-4660-9

*संपा. अत्तार सिंह/ अनुवाद : मीनकेतन* पृ. 172 ₹ 85.00

या संग्रहात दहा पंजाबी एकांकिका समाविष्ट आहेत. यातील प्रत्येक एकांकिका पंजाबी नाट्यकलेच्या विकासावर आणि पंजाबातील जनजीवनाच्या वेगवेगळ्या पैलूंवर झोत टाकते.

55. **हिंदी एकांकिका**

Hindi Ekankika (Marathi) ISBN 978- 81-237-3727-0

*संपा. चंद्रगुप्त विद्यालंकार/अनुवाद : चंद्रकांत पाटील* पृ. 212 ₹ 100.00

या संग्रहात दहा प्रसिद्ध हिंदी एकांकिकांचा समावेश आहे. हिंदी नाट्यक्षेत्राचा परिचय करून घेण्यास हा संग्रह उपयुक्त आहे.

56. **कंस : कथा अस्तित्वाची ...**

Katha Eek Kansa Ki (Hindi) ISBN 978-81-237-9389-4

*दयाप्रकाश सिन्हा / अनुवाद : नागेंद्र माणेकरी* पृ. 100 ₹ 115.00

पौराणिक मिथकावर आधारित या नाटकामध्ये मानवीकरणाची झलक दिसून येते. कंसाच्या माध्यमातून त्या स्वेच्छाचारी, हुकूमशहाच्या उदय आणि अस्ताचे विश्लेषण केले गेले आहे. कंसासारख्या प्रवृत्तींचा इतिहासाच्या वेगवेगळ्या वळणावर अंतर्भाव झाला आहे. कधी तो कंस असता, कधी औरंगजेब, तर

कधी हिटलर, मुसोलिनी, किंवा सद्दाम हुसैन! न परतू शकण्याच्या आत्मघाती मार्गावर अशी व्यक्ती उद्दाम महत्त्वाकांक्षेमुळे पुढे-पुढे जातच असते. हे नाटक आजच्या जागतिक राजकरणाच्या दिशेला स्पष्ट करण्याचा प्रयत्न तर करतेच, तसेच मानवाचा सामान्य स्वभाव सत्तेच्या भोवऱ्यात अडकल्यावर मानव आणि असुरी प्रवृत्तींमध्ये कसा दुभंगला जातो हेही स्पष्ट करते.

## *लघुनिबंध*

56. **डबक्यात सूर्याचे प्रतिबिंब : मुक्तिबोध यांचे निवडक गद्यलेखन**
Dabkyat Suryache Pratibimb ISBN 978-81-237-6622-5
(Marathi) पृ. 284 ₹ 155.00
Dabare Par Suraj Ka Bimb (Hindi Original)
*संकलन : चंद्रकान्त देवताले / अनुवाद : चंद्रकान्त पाटील*
डबक्यात सूर्याचे प्रतिबिंब हे हिंदीचे महान लेखक गजानन माधव मुक्तिबोध यांच्या प्रातिनिधिक गद्यलेखनाचे अनोखे संकलन आहे. या प्रातिनिधिक संकलनात मुक्तिबोधांचे 10 निबंध, 4 टीकालेख, 6 कथा, डायरीतील 3 लेख, 'कामायनी' वरील पुस्तकातील 3 लेख, आणि 3 राजकारणविषयक लेख आहेत.

57. **हजारीप्रसाद द्विवेदी यांचे संकलित निबंध**
Hazari Prasad Dwivedi : Sankalit Nibandh (Out of Print)
*संपादक : नामवर सिंह* ISBN 978-81-237-3148-3
*अनुवाद : विद्या सहस्त्रबुद्धे* पृ. 148 ₹ 65.00
आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या 'कालजयी' निबंधांचा संग्रह. उत्कृष्ट अनुवाद.

## *ललित लेखन*

58. **भारतींच्या ललित साहित्यकृती**
Bharatinchya Lalit Sahityakruti (Marathi)
*सुब्रम्हण्य भारती/संपादक : पेरियस्वामी तूरन* ISBN 978-81-237-3788-1
*अनुवाद : अरुण टिकेकर* पृ.128 ₹ 50.00
थोर तमिळ कवी, पत्रकार आणि स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या लेखकाच्या निवडक साहित्यकृतींचे पेरियस्वामी तूरन या ख्यातनाम तमिळ कवीने केलेले साक्षेपी संपादन.

# अक्षर साहित्य

1. **करावे तसे भरावे**

   Karave Tase Bharave (Marathi) ISBN 978-81-237-3901-X
   Madidunno Maharaya (Kannada Original) पृ.128 ₹ 75.00
   *एम. एस. पुटण्णा*
   *अनुवाद : उमा वि. कुळकर्णी*
   'माडिदुण्णो महाराया' ह्या मूळ कन्नड कादंबरीच्या ह्या अनुवादात एकोणिसाव्या शतकातील कन्नड समाजजीवन आणि जनसामान्यांच्या विचारपद्धतीचे विलक्षण चित्रमयी दर्शन घडते.

2. **लोकमान्य टिळकांचे निबंध**

   Lokmanya Tilakanche Nibandh
   (Marathi Original) ISBN 978-81-237-1700-5
   *संपा. राम शेवाळकर* पृ. 324 ₹ 105.00
   या लेखसंग्रहात लोकमान्य टिळकांचे विविध विषयातील व्यासंगपूत विवेचन आपल्या प्रत्ययाला येते. लोकमान्यांचे तत्त्वज्ञानपर चिंतन हे या मूळ मराठी संग्रहाचे वैशिष्ट्य.

3. **विनोबा-नवनीत**

   Vinoba-Navneet ISBN 978-81-237-6193-0
   *विनोबा* पृ. 244 ₹ 120.00
   *संपा : पराग चोळकर*
   या संकलनात विनोबा-विचारांच्या अमृतसिंधूतील काही बिंदू प्रस्तूत केले आहेत. ते केवळ वानगीदाखल नाहीत; तर विनोबांच्या विविध क्षेत्रांतील विचारांचे एकत्र व सुसंगत दर्शन घडवण्याचा यात प्रयत्न आहे. यातून विनोबांचे विचार-दर्शन स्पष्ट होईल.

# विश्व साहित्य

1. **फिनिक्सची दंतकथा आणि व्हिएतनाममधील इतर कथा**
   Legend of Phoneix and other Stories
   from Vietnam ISBN 978-81-237-4432-2
   *निवड आणि संपादन : हो आन्ह थाई* पृ. 172 ₹ 70.00
   *अनुवाद : विजया देव*
   या महत्त्वपूर्ण कथासंग्रहात व्हिएतनामची भूमी, तेथील कष्टमय ग्रामीण जीवन, शहरी हिंसा, अमेरिकेने लादलेल्या राजवटीत प्रामुख्याने बौद्ध असलेल्या या देशाची झालेली शकले आणि त्यातूनही फिनिक्सप्रमाणे उभरणारी नवनिर्मितीची ऊर्जा यांचे प्रत्ययकारी चित्रण आहे.

# राष्ट्रीय चरित्रमाला

1. **अमीर खुसरो**
Amir Khusro ISBN 978-81-237-3905-2
*सय्यद गुलाम सम्नानी* पृ. 80 ₹ 40.00
*अनुवाद : भगवंत देशमुख*
एक श्रेष्ठ कवी, गद्यलेखक, संगीतकार आणि दरबारी, हजरत निजामुद्दीन अवलियांचा आवडता सुफी शिष्य असे खुसरोंचे बहुमुखी व्यक्तिमत्त्व होते. गुलाम वंशाच्या राजवटीपासून ते खिलजी वंशापावेतो अनेक राजवंशांचे उत्कर्ष आणि पाडाव त्यांनी प्रत्यक्ष पाहिले.

2. **ऑलंपिकवीर : के. डी. जाधव**
Olympikveer : K. D. Jadhav
(Original Marathi) ISBN 978-81-237-5023-1
*संजय दुधाने* पृ. 124 ₹ 60.00
भारतीयांना खाशाबांचे निरलस, सचोटीचे जीवन, त्यांचे अथक परिश्रम आणि बालपणापासून त्यांना लाभलेल्या उत्तम निस्वार्थी प्रशिक्षकांचा परिचय व्हावा; विस्मरणात गेलेल्या इतिहासाला झळाळी द्यावी आणि तरुणांनी क्रीडाक्षेत्रातील नवी क्षितिजे पादाक्रांत करण्यासाठी कठोर परिश्रमाला पर्याय शोधू नये अशा ध्यासाने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे.

3. **कमलादेवी चट्टोपाध्याय**
Kamaladevi Chattopadhyay ISBN 978-81-237-6791-8
*जसलीन धामिजा / अनुवाद : संध्या पेडणेकर* पृ. 132 ₹ 80.00
कमलादेवी चट्टोपाध्याय या विसाव्या शतकातील एका अतिशय महत्त्वाच्या स्त्री-नेत्याचे हे संक्षिप्त जीवन चरित्र. त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या आणि नंतरच्या काळात देशासाठी मोलाची कामगिरी केली. या पुस्तकाद्वारे कमलादेवी चट्टोपाध्यायांच्या जीवनाबद्दल आणि त्यांच्या काळाबद्दल बरीच माहिती मिळते. त्यांच्याबरोबर काम केलेल्या लेखिकेने कमलादेवींच्या व्यक्तिमत्त्वातील राजकीय, सामाजिक, सर्जनशील आणि मानवी गुणांचा या पुस्तकात शोध घेतला आहे. शिवाय स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या आणि स्वातंत्र्यानंतरच्या त्यांच्या पुरोगामी भूमिकेचा योग्य दृष्टिकोनातून वेध घेतला आहे.

4. **कबीर**
Kabir ISBN 978-81-237-2943-5
*पारसनाथ तिवारी* पृ. 92 ₹ 60.00
*अनुवाद : अशोक प्रभाकर कामत*
हिंदू आणि मुसलमानांच्या धर्मांधतेवर कठोर प्रहार करणारे आणि जातिधर्मांचे बंधन उल्लंघून फक्त ईशभक्तीला प्रमाण मानणाऱ्या संताचे चरित्र.

5. **कलामहर्षी नंदलाल बोस**
Kalamaharshi Nandlal Bose ISBN 978- 81-237-4747-0
*दिनकर कौशिक* पृ. 152 ₹ 60.00
*अनुवाद : उमाकान्त ठोमरे*
आधुनिक काळातील भारतीय कलामहर्षी नंदलाल बोस आणि भारतीय कलेच्या पुनरुज्जीवनाची तेजस्वी कहाणी.

6. **कृष्णदेवराय**
Krishnadevrai ISBN 978-81-237-0956-7
*एम. रामाराव* पृ. 56 ₹ 35.00
*अनुवाद : लीला बावडेकर*
विजयनगर साम्राज्याचा कृष्णदेवराय हा मध्ययुगातील एक थोर सम्राट होता. रणांगणावर तो जसा श्रेष्ठ होता तसाच कला, साहित्यातही श्रेष्ठ होता. त्याचे साम्राज्य हिंदू पुनरुज्जीवनाचे केंद्र असून, त्याच्या राज्यात सामंजस्य होते.

7. **गुरू गोविंदसिंग**
Guru Govind Singh ISBN 978- 81-237-2459-1
*गोपालसिंग / अनुवाद : अरविंद देशपांडे* पृ.144 ₹ 70.00
शीखांमधल्या खालसा पंथाचे स्थापनकर्ते आणि हिंदू-मुसलमानांना एकत्र आणणारे दहावे थोर गुरू गोविंदसिंग यांच्या रोमहर्षक जीवनाची आणि विपरीत सामाजिक परिस्थितीत त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांची कहाणी.

8. **गुरू नानक**
Guru Nanak ISBN 978-81-237-3786-6
*गोपालसिंग* पृ. 92 ₹ 30.00
*अनुवाद : के. गो. अक्षीकर*
शीख धर्मांचे संस्थापक गुरू नानक यांचे हे प्रेरक चरित्र, या धर्माचे अभ्यासक श्री गोपालसिंग यांनी लिहिले आहे.

9. **गोपाळ गणेश आगरकर**
Gopal Ganesh Agarkar
(Original Marathi) ISBN 978-81-237-1745-6
*स. मा. गर्गे* पृ. 152 ₹ 80.00
थोर महाराष्ट्रीय समाज-सुधारक, स्त्री-शिक्षणाचे पुरस्कर्ते आणि खंदे बुद्धिवादी चिंतक आगरकर यांचे मूळ मराठी चरित्र.

10. **चंद्रशेखर व्यंकट रमण**
Chandrashekhar Venkat Raman (Out of Print)
*जी. एच. केसवानी /अनुवाद : जगदीश काबरे* पृ.120 ₹ 19.50
चंद्रशेखर व्यंकट रमण जगप्रसिद्ध वैज्ञानिक होते. त्यांचे वैयक्तिक जीवन आणि वैज्ञानिक कारकिर्दीची ही हकिकत.

11. **छत्रपती शिवाजी**
Chhatrapati Shivaji
(Original Marathi) ISBN 978-81-237-9292-7
*सेतुमाधवराव पगडी* पृ.176 ₹ 90.00
भारताच्या श्रेष्ठ राष्ट्रपुरुषांत शिवाजी महाराजांची गणना होते. हिंदवी राज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या छत्रपतींच्या चरित्राची ही सुधारित आवृत्ती. चरित्रलेखक मराठी, उर्दू आणि फारसी भाषांत पारंगत असलेले नाणावलेले इतिहाससंशोधक होते.

12. **जगदीशचंद्र बोस**
Jagdish Chandra Bose ISBN 978-81-237-0455-6
*सच्चिंद्रनाथ बसू / अनुवाद : चंद्रकांत पाटील* पृ. 64 ₹ 40.00
साधने आणि उपकरणांचा तुटवडा असतानाही या थोर शास्त्रज्ञाने प्राणी आणि वनस्पती जीवनातले साम्य यशस्विरीत्या दाखवले. ही त्यांची जीवन कहाणी.

13. **जाणिली तयाने अनंतता : प्रतिभावतं गणितज्ञ रामानुजनची जीवनगाथा**
The Man Who Knew Infinity : A Life of
the Genius Ramanujan ISBN 978-81-237-7050-5
*रॉबर्ट कानिगेल / अनुवाद : नीला चांदोरकर* पृ. 564 ₹ 500.00
सध्याच्या तामिळनाडू राज्यातील कुंभकोणम या लहानशा गावात जन्मलेला, सनातन भारतीय परंपरा पाळणारा श्रीनिवास रामानुजन इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतो.

केंब्रिजमधील वास्तव्यात त्याचं गणित बहराला येतं. तो अनेक मानमरातब मिळवतो. गणित जगतातील रथी-महारथी त्याच्या विलक्षण बुद्धिमत्तेने अवाक् होतात. पण तो क्षयरोगासारख्या दुर्धर व्याधीचा शिकार बनतो आणि जेमतेम वर्षभरातच वयाच्या तेहेतिसाव्या वर्षी तो मृत्यूला समोरा जातो. एका अत्यंत प्रतिभासंपन्न, स्वयंशिक्षित, 'स्वयंभू' भारतीय गणितज्ञाचे, मनावर गारुड करणारे हे त्याचे विलक्षण संवेदनशीलतेने रेखाटलेले हे जीवन चरित्र.

14. **जोतिचरित्र**

Jyoti Charitra (Marathi Original) ISBN 978-81-237-2617-5

*तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी* पृ. 108 ₹ 70.00

महात्मा फुले हे एकोणिसाव्या शतकातील एक श्रेष्ठ समाजसुधारक. त्यांची विचारसरणी क्रांतिकारक होती. महाराष्ट्रातील नव्या पिढीने त्यांचे वैचारिक ऋण मान्य केलेले आहे. महात्मा फुल्यांच्या ह्या महत्त्वपूर्ण मूळ मराठी चरित्राची नवी आवृत्ती.

15. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

Dr. Babasaheb Ambedkar

(Original Marathi) ISBN 978- 81-237-2901-5

*वसंत मून* पृ. 152 ₹ 90.00

अस्पृश्यांचा प्रश्न हा एक राष्ट्रीय प्रश्न होता आणि तो सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आयुष्य वेचले. त्यांच्या राजकारणाला विद्वत्तेची बैठक होती. ह्या महान भारतीय नेत्याच्या स्फूर्तिदायी चरित्राची नवी आवृत्ती.

16. **दादासाहेब फाळके**

Dadasaheb Phalke (Original Marathi) ISBN 978-81-237-1398-4

*बापू वाटवे* पृ. 164 ₹ 70.00

भारतीय चित्रपटसृष्टीच्या जनकाचे ध्येयप्रवण आणि भावावेशाने भरलेले मूळ मराठी चरित्र. कृष्णधवल छायाचित्रे आणि चित्रपटसूची.

17. **नरसी मेहता**

Narsi Mehta ISBN 81-237-0034-2

*के. का. शास्त्री/अनुवाद : आशा खोत* पृ. 96 ₹ 21.00

नरसी मेहता हे मध्ययुगीन वैष्णव संत आणि गुजराती साहित्यातील आद्यकवी.

18. **नागार्जुन**

Nagarjun ISBN 978-81-237-1428-8

*के. सच्चिदानंद मूर्ती / अनुवाद : आ. ह. साळुंखे* पृ. 124 ₹ 50.00

महायान पंथाचे महान संघटक, तांत्रिक, गूढवादी, रसज्ञ (किमयागार) आणि विख्यात वैद्य म्हणून जगाला ज्ञात असलेले नागार्जुन एक प्रखर तत्त्ववेत्ते होते. त्यांच्या चरित्राचा सिद्धहस्त अनुवाद.

19. **नाना फडणीस**

Nana Phadnis (Original Marathi) ISBN 978-81-237-2643-4

*य. ना. देवधर*

*अनुवाद : भीमराव कुळकर्णी* पृ. 64 ₹ 40.00

नाना फडणीस हे पेशव्यांच्या दरबारातीलच नव्हे, तर भारतातील एक उत्कृष्ट मुत्सद्दी आणि जबरदस्त राजकारणी. इंग्रजी सत्तेचे तुल्यबळ प्रतिस्पर्धी. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे चरित्र.

20. **नेताजी सुभाषचंद्र बोस**

Netaji Subhash Chandra Bose ISBN 978-81-237-2384-6

*शिशिर कुमार बोस / अनुवाद : निर्मला मोने* पृ. 140 ₹ 85.00

आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात एक अपूर्व असे स्थान आहे. या चरित्रात त्यांच्या जीवनातील घटना आणि तत्त्वज्ञानाचा प्रामुख्याने वेध घेण्यात आलेला आहे.

21. **बिरबल साहनी**

Birbal Sahani ISBN 978-81-237-5620-2

*शक्ती गुप्ता / अनुवाद : कालिदास देशपांडे* पृ. 64 ₹ 35.00

बिरबल साहनी हे भारतातील सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ, विद्वान आणि देशभक्त होते. वृत्तीने धार्मिक असलेले साहनी प्रामुख्याने परामानसशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होते.

22. **भगिनी निवेदिता**

Sister Nivedita ISBN 978-81-237-5892-3

*वसुधा चक्रवर्ती / अनुवाद : प्रभाकर दांडे* पृ. 72 ₹ 60.00

आपल्या मातृभूमीपासून हजारो मैल दूर असलेला देश व तेथील लोक यांच्याविषयी प्रगाढ कणव बाळगणाऱ्या भगिनी निवेदिता या हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या निस्वार्थी व्यक्तिंमधे येतात ज्यांना विश्वनागरिक म्हणता येईल.

23. **माझा भाऊ बलराज**

Balraj : My Brother ISBN 81-237-0955-0

*भीष्म साहनी/ अनुवाद : भाऊ पाध्ये* पृ. 108 ₹ 55.00

बलराज साहनी भारतीय चित्रपटसृष्टीतील मान्यवर व्यक्तिमत्त्व. पंजाबी साहित्यिक म्हणून त्यांना मान्यता मिळाली. टागोर, गांधीच्या सहवासात ते आले. भाऊ पाध्यांनी आपल्या खास शैलीत केलेला त्यांच्या चरित्राचा हा अनुवाद मराठी वाचकांचे लक्ष वेधून घेईल.

24. **महात्मा गांधी : जीवन चरित्र**

Gandhi : A Life ISBN 978-81-237-0960-4

*कृष्ण कृपलानी/अनुवाद : उमाकांत ठोमरे* पृ. 224 ₹ 125.00

गांधीच्या जीवनाला आणि विचारसरणीला चिरंतन मूल्य लाभले आहे. ओघवत्या भाषेत श्री कृपलानी यांनी लिहिलेले हे गांधीचरित्र जगभर नावाजले आहे.

25. **महाराणा प्रताप**

Maharana Pratap ISBN 978-81-237-3803-1

*राजेन्द्र शंकर भट्ट*

*अनुवाद : शांताराम अमृत सबनीस* पृ. 88 ₹ 55.00

राजपुतान्याच्या इतिहासात महाराणा प्रतापचे नाव सर्वत्र गौरवशाली आहे. स्वतंत्रतेचा पुजारी, स्वार्थत्यागी आणि दृढप्रतिज्ञ अशा या शूर योद्ध्याचे हे स्फूर्तिदायी जीवनचरित्र.

26. **मानवेंद्रनाथ रॉय**

M. N. Roy ISBN 978-81-237-1862-0

*व. भ. कर्णिक / अनुवाद : द्वा. भ. कर्णिक* पृ. 108 ₹ 50.00

जहाल मानवतावादाचे प्रणेते एम. एन. रॉय हे एक थोर क्रांतिकारक आणि कृतिशील राजकीय नेते होते. लेनिन ट्रॉटस्कीसारख्यांच्या ते सहवासात आले. त्यांचे हे अभूतपूर्व जीवनचरित्र.

27. **मेघनाद साहा**

Meghnad Saha ISBN 978-81-237-1397-7

*शांतिमय आणि एनाक्षी चटर्जी/अनुवाद : र. गो. लागू* पृ. 144 ₹ 55.00

आधुनिक भारतातील या थोर वैज्ञानिकाने आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा उपयोग देशातील नियोजन, नद्यांचे नियंत्रण आणि दिनदर्शिकेतील सुधारणेसाठीही केला. विस्तृत सूची आणि लक्षणीय वेचे.

28. **यशवंतराव चव्हाण**

Yashawantrao Chavan

(Original Marathi) ISBN 978-81-237-7739-9

*भावना पाटोळे* पृ. 232 ₹ 225.00

एखादा रेशमी पट उलगडावा तसे या थोर चरित्रनायकाचे विविध पैलू डोळ्यांसमोर उलगडत जातात. त्यांचे हे जीवनचरित्र वाचताना त्यांच्या यशवंत व्यक्तिमत्त्वाने स्तंभित न केले तरच नवल! 'सर्वे सुखिना संतु' या विचारसरणीची कास धरणाऱ्या या अत्यंत परिपक्व व सुसंस्कारित नेत्याचे हे चरित्र येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरक व मार्गदर्शक ठरेल. उद्यासाठी या मौलिकतेचे जतन होणे गरजेचे आहे.

29. **युसुफ मेहेरअली**

Yusuf Mehralli ISBN 978-81-237-3656-3

*मधु दंडवते* पृ. 144 ₹ 65.00

*अनुवाद : कुमुद करकरे*

1942 च्या लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजाविलेल्या थोर समाजवादी नेत्याचे ओघवते मनोज्ञ चरित्र.

30. **रणजितसिंग**

Ranjit Singh ISBN 81-237-3787-4

*देवराज सूद* पृ. 96 ₹ 45.00

*अनुवाद : जी. वी. वैद्य*

पंजाबातील मोठ्या राज्यांना एकत्र आणून महाराज रणजितसिंगांनी पंजाबात एक स्वतंत्र राज्य स्थापन केले आणि राष्ट्रवादाचा पाया घातला. त्यांचे हे चरित्र.

31. **रमण महर्षी**

Raman Maharshi ISBN 978-81-237-2966-4

*कृ. स्वामीनाथन* पृ. 116 ₹ 35.00

*अनुवाद : शं. गो. तुळपुळे*

अद्वैत ज्ञानमार्ग आपल्या काळात शिकवणारे आणि आचरून दाखवणारे रमण महर्षी हे एक समकालीन सत्पुरुष. आत्मज्ञानाच्या शोधातील त्यांची तन्मयता प्रस्तुत चरित्रात प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे.

32. **राजर्षी शाहू छत्रपती**
Rajarshi Shahu Chhatrapati ISBN 978-81-237-6577-8
(Original Marathi) पृ. 148 ₹ 75.00
*रमेश जाधव*
राजर्षी शाहू छत्रपतींचे मोठेपण जसे त्यांच्या समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या सूत्रानुसार नवसमाज रचनेचे स्वप्न साकारण्यासाठी आयुष्याच्या अखेर-पर्यंत केलेल्या अखंड धडपडीत आहे तसे ते त्यांनी आपले विचार आणि आचार यामध्ये जोपासलेल्या कमालीच्या समरसतेत सामावलेले होते. अशा या मुलखावेगळ्या राजाचे हे प्रत्ययकारी चरित्र चित्रण.

33. **राणी चेन्नमा**
Rani Chennamma ISBN 978-81-237-2504-8
*सदाशिव वोडेयर* पृ. 108 ₹ 45.00
*अनुवाद : पंडित आवळीकर*
कर्नाटकातील कित्तूर या लहानशा संस्थानाची राणी चेन्नमा ही बलिष्ठ ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध बंड पुकारणाऱ्या भारतीय संस्थानिकांमध्ये सर्वप्रथम होती. तिचे स्फूर्तिदायक चित्र.

34. **राम मनोहर लोहिया**
Ram Manohar Lohia ISBN 81-237-3615-0
*इंदुमती केळकर* पृ. 176 ₹ 65.00
*अनुवाद : आचार्य श्रीपाद केळकर*
एका ज्येष्ठ समाजवादी नेत्याची जडणघडण, त्यांच्यावरील प्रभाव, पक्षातील वैशिष्ट्यपूर्ण स्थान आणि स्त्री, दलित व गरिबांविषयी त्यांच्या संवेदनशीलतेचा व विद्रोही, चिंतनशील, रसिक व्यक्तित्वाचा माग.

35. **लोकमान्य टिळक**
Lokmanya Tilak (Original Marathi) ISBN 978-81-237-2195-8
*ग. प्र. प्रधान* पृ. 140 ₹ 85.00
कर्मयोगी टिळकांचे हे मूळ मराठी चरित्र त्यांच्या प्रखर देशाभिमानाची आणि अथक ज्ञानोपासनेची ओळख करून देते. नवी आवृत्ती.

36. **व. वे. सु. अय्यर**
V. V. S. Ayyar ISBN 978-81-237-0323-7
*रा. अ. पद्मनाभन / अनुवाद : अ. के. भागवत* पृ. 172 ₹ 85.00
तमिळनाडूतील लघुकथेच्या जनकाचे हे चरित्र. व. वे. सु. अय्यर हे वीर सावरकरांचे लंडन येथील सहकारी, विद्वान, क्रांतिकारी आणि देशभक्त म्हणून प्रसिद्ध होते.

37. **विठ्ठल रामजी शिंदे**
Vitthal Ramji Shinde
(Original Marathi) ISBN 978-81-237-5076-7
*गो. मा. पवार* पृ. 132 ₹ 45.00
अखिल भारतीय पातळीवर संस्था स्थापून आपले जीवित अस्पृश्यता-निवारणासाठी वाहून घेणाऱ्या थोर कार्यकर्त्याचे मूळ मराठी चरित्र. सुधारित मोठी आवृत्ती.

38. **विनोबा**
Vinoba (Original Marathi) ISBN 978-81-237-2394-5
*निर्मला देशपांडे* पृ. 112 ₹ 55.00
भूदान आंदोलनाचे प्रणेते संत विनोबा यांच्या तपस्वी जीवनाचे कैक पैलू उलगडणाऱ्या सहजस्फूर्त मूळ मराठी चरित्राची नव्या छायाचित्रांसह आवृत्ती. 'जय जगत' या विनोबांच्या नित्यमंत्रामागील खोल वैश्विक प्रेरणेचे सखोल विवेचन.

39. **विष्णू दिगंबर पलुस्कर**
Vishnu Digambar Pluskar
(Original Marathi) ISBN 978-81-237-0596-5
*वि. रा. आठवले* पृ. 52 ₹ 35.00
भारतीय संगीताचा समाजात प्रसार करणारे युगपुरुष पंडित पलुस्कर यांच्या चरित्राचे विविध पैलू जाणतेपणे उलगडून दाखविणारे प्रेरक चरित्र.

40. **विष्णू नारायण भातखंडे**
Vishnu Narayan Bhatkande
(Original Marathi) ISBN 978-81-237-3789-8
*डॉ. एस. एन. रातंजनकर* पृ. 48 ₹ 35.00
पंडित भातखंडे यांचे जीवन आणि संगीत-सेवेच्या साधार माहितीचे जिव्हाळ्याने केलेले कथन.

41. **शंकरदेव**

Shankardev ISBN 978-81-237-2974-9

*महेश्वर नियोग / अनुवाद : इंदुमती शेवडे* पृ.96 ₹ 45.00

शंकरदेव आसामातील एक श्रेष्ठ संतकवी. इसवीसनाच्या पंधराव्या शतकात त्यांनी असमिया भाषेला समृद्धी प्राप्त करून दिली, भक्तीचा मार्ग दाखवला, त्यांचे हे स्फूर्तिदायी चरित्र.

42. **समर्थ रामदास**

Samarth Ramdas (Original Marathi) ISBN 978-81-237-2541-3

*वि. रा. करंदीकर* पृ. 104 ₹ 45.00

समर्थ रामदास हे महाराष्ट्रातील प्रमुख संतपंचायतापैकी एक. समाजाच्या ऐहिक जीवनात उत्पन्न होणारे प्रश्न सोडविण्यासाठी प्रपंच-परमार्थाचा विवेक साधावा ही त्यांची शिकवण.

43. **सयाजीराव गायकवाड**

Sayajirao Gaikwad ISBN 978-81-237-3015-8

*व्ही. के. चावडा* पृ. 108 ₹ 65.00

*अनुवाद : सं गं. मालशे*

महाराज सयाजीराव गायकवाड हे उदारमतवादी, लोकशाहीचे पुरस्कर्ते. पुरोगामी, सुधारक राजे म्हणून त्यांची ख्याती होती. बडोदे संस्थानातील आपल्या कारकिर्दीत त्यांनी कैक सुधारणा घडवून आणल्या. महर्षी अरविंद, डॉ. आंबेडकर ह्यांसारख्या लोकोत्तर पुरुषांना राजाश्रय दिला. त्यांचे हे मननीय चरित्र.

44. **साने गुरुजी**

Sane Guruji (Original Marathi) ISBN 978-81-237-2355-6

*यदुनाथ थत्ते* पृ. 64 ₹ 35.00

महाराष्ट्रातील हे थोर लेखक, स्वातंत्र-चळवळीतील प्रेरक व्यक्तिमत्त्व, आणि दिनदलितांचे कनवाळू होते. भावी पिढ्यांवर चांगले संस्कार व्हावे म्हणून त्यांनी अथक प्रयास केले. त्यांचे मूळ मराठी चरित्र.

45. **सुब्रम्हण्य भारती**

Subramanyam Bharati ISBN 978-81-237-0293-3

*प्रेमा नंदकुमार / अनुवाद : लीला बावडेकर* पृ.104 ₹ 45.00

सुब्रम्हण्य भारती तमिळ भाषेतील श्रेष्ठ कवी. स्वातंत्र्य चळवळीत त्यांची गीते सर्वांच्या ओठावर खेळू लागलीत. त्यांच्या कवितेने अनेकांना प्रेरणा दिली.

46. **सूरदास**

Surdas ISBN 81-237-3783-1

*वज्रेश्वर शर्मा / अनुवाद : इंदुमती केळकर* पृ. 112 ₹ 35.00

सूरदास या मध्ययुगीन संतकवीचे हे चरित्र. वल्लभाचार्यांनी त्यांना दीक्षा दिलेली होती. श्रीनाथजींच्या सेवेत त्यांचे सारे जीवन व्यतीत झाले.

47. **सेनापती बापट**

Senapati Bapat (Original Marathi) ISBN 978-81-237-0177-6

*य. दि. फडके* पृ. 100 ₹ 55.00

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकाचे थरारक जीवनवृत्त. नवी अस्सल संदर्भसाधने वापरून डॉ. फडके यांनी सेनापतींच्या जीवनातील स्वातंत्र्योत्तर काळाचेही समर्थ विवेचन केले आहे.

48. **स्वामी रामानंद तीर्थ**

Swami Ramanand Teerth

(Original Marathi) ISBN 978-81-237-3745-4

*अनंत भालेराव* पृ. 108 ₹ 60.00

स्वामी रामानंद तीर्थ हैद्राबाद मुक्तिलढ्याचे नेते होते. मराठवाड्यात शैक्षणिक चळवळ उभी करून संस्थात्मक जीवनाचा त्यांनी पाया घातला. लेखक हैद्राबाद चळवळीतले आघाडीचे कार्यकर्ते होते.

49. **श्री अरविंद**

Shri Aurobindo ISBN 978-81-237-2275-7

*नवजात अनुवाद : म. अ. करंदीकर* पृ. 104 ₹ 55.00

श्री अरविंद महान तत्त्वज्ञ संत असून ते विलक्षण प्रतिभावंत कवी होते. तरुण वयातच ते देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचे नेते झाले. त्यांची सखोल अध्यात्मिक प्रेरणा आणि त्यांच्या कार्यातील श्री माताजींचा सहभाग याविषयी विस्तृतपणे विवेचन.

50. **श्री चक्रधर**

Shri Chakradhar (Original Marathi) ISBN 978-81-237-2590-1

*बापूजी संकपाळ* पृ. 84 ₹ 45.00

श्री चक्रधर हे महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक होते. वैदिक परंपरा नाकारणाऱ्या त्यांच्या संप्रदायाने मराठी भाषेची आद्य जडणघडण केली. त्यांचे हे महत्त्वपूर्ण चरित्र.

51. **श्री चैतन्य महाप्रभू**
Shri Chaitany Mahaprabhu ISBN 978-81-237-1567-4
*दिलिपकुमार मुखर्जी*
*अनुवाद : आशा खोत* पृ. 84 ₹ 40.00
तत्त्वज्ञान, साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य अशा परस्परभिन्न क्षेत्रात नावीन्यपूर्ण शिक्षणप्रणाली आणि मानदंड निर्माण करण्यात श्री चैतन्य आणि त्यांच्या संप्रदायाने हातभार लावला. मध्ययुगातील या थोर धार्मिक विभूतीची ओळख.

52. **श्री बसवेश्वर**
Basavanna, Shri Basveshwar
(Marathi Translation) ISBN 978-81-237-4320-2
*एम. चिदानंद मूर्ती / अनुवाद : रवींद्र किंबहुने* पृ. 92 ₹ 45.00
श्री बसवेश्वर हे बाराव्या शतकातील एक महान श्रेष्ठ कवी म्हणून तर मानले जातातच, शिवाय ते थोर संत आणि समाजसुधारक होते. वीर शैव संप्रदायाचे ते संस्थापक होते.

53. **हर्ष**
Harsha (Original Marathi) ISBN 978-81-237-2973-2
*व्ही. डी. गांगल* पृ. 68 ₹ 50.00
भारतीय इतिहासातील देदीप्यमान सम्राट हर्ष (इ.स 590) हा थोर सेनानी, उत्कृष्ट प्रशासक व बौद्ध धर्माचा आश्रयदाता, तसेच थोर साहित्यिक होता. त्याचे हे मनोज्ञ चरित्र.

54. **हरी नारायण आपटे**
Hari Narayan Apte
(Original Marathi) ISBN 978-81-237-3807-9
*म. अ. करंदीकर* पृ. 68 ₹ 35.00
हरि नारायण आपटे हे मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार, त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांनी मराठीत एक युग निर्माण केले. समाजकार्यात ते अग्रभागी होते.

## लोकसाहित्य माला

1. **जेव्हा जग अगदी नवं नवं होतं**
When the World was Young ISBN 81-237-6236-4
*वेरयिर एल्विन / प्रस्तावना : रामचंद्र गुहा* पृ. 140 ₹ 70.00
*अनुवाद : सुवर्णा बेडेकर*
मानवजातीचा विकास टप्प्याटप्प्याने कसा झाला; याचा आलेख या लोककथांमधून मांडण्यात आला आहे. या पारंपरिक कथांना आदिवासी समाजमनाचा आणि त्या काळच्या कल्पनाशक्तीचा एक वेगळाच गंध आहे. काही विशिष्ट संदर्भात आपले पूर्वज कसा विचार करत होते, ते वाचणे नक्कीचा मनोरंजक ठरणार आहे.

2. **झाडावर चढणारा कोल्हा आणि आफ्रिकेतील इतर प्राणिकथा**
When Hippo Was Hairy And
Other Tales from Africa ISBN 978-81-237-2605-2
*निक ग्रीव्हज* पृ. 144 ₹ 160.00
*अनुवाद : व्यंकटेश माडगूळकर*
आफ्रिकेच्या लोककथा भांडारातील छत्तीस वेधक प्राणिकथा. रॉड क्लेमंट यांची अविस्मरणीय चित्रे आणि माडगूळकरांचा लीलया अनुवाद.

# नेहरू बाल पुस्तकालय

1. **अतूट मैत्री**
   A Friend Forever — ISBN 978-81-237-4819-1
   *ऐंद्रिला मित्र* — पृ. 24 ₹ 55.00
   *अनुवाद : सुषमा सोनक*
   एक एकाकी झाड आणि निळा पक्षी यांच्या अतूट मैत्रीची मनोहारी कहाणी.

2. **अनोखे नाते**
   Bond of Love — ISBN 978-81-237-4923-5
   *पुष्पा यादव* — पृ. 16 ₹ 40.00
   मनोरंजनातून मुलांना पर्यावरणाची ओळख करून देणारे अप्रतिम पुस्तक.

3. **अमर ज्योती**
   Amar Jyoti — ISBN 978-81-237-3686-X
   *गोपीनाथ तळवलकर* — पृ. 64 ₹ 45.00
   अस्पृश्यतेच्या डागाविरुद्ध लढलेल्या भारतातील विविध संतांचे जीवन आणि त्यांचे कार्य या पुस्तकात मनोभावे विशद करून सांगितले आहे. वेधक चित्रे.

4. **अमर पुस्तके**
   Books Forever — ISBN 978-81-237-2923-7
   *मनोज दास* — पृ. 64 ₹ 45.00
   *अनुवाद : शामला शिरोळकर*
   भारतातील काही अजरामर ग्रंथांतील कहाण्या एका प्रसिद्ध बालसाहित्यकाराने मुलांसाठी आपल्या शब्दात सांगितलेल्या आहेत.

5. **अरण्यराग**
   Wild Woodnotes — ISBN 978-81-237-0610-8
   *जित रॉय* — पृ. 64 ₹ 45.00
   *अनुवाद : निर्मला चंद्रकांत*
   झाडे, जनावरे आणि पक्षी यांसंबंधी एका निसर्गप्रेमी लेखकाची टिपणे आणि निरीक्षणे या रोचक पुस्तकात सामावली आहेत. आकर्षक दुरंगी चित्रे.

6. **अरे बापरे! साप!**
Snake Trouble ISBN 978-81-237-4059-1
*रस्किन बाँड*
*अनुवाद : क. दि. सोनटक्के* पृ. 32 ₹ 30.00
आजोबांनी पाळायला अजगराचे पिल्लू आणल्यावर उडालेली धमाल सिद्धहस्त बालसाहित्यकाराच्या खुमासदार शैलीत वाचा. मिकी पटेल यांची हसरी चित्रे.

7. **अशी आपली पृथ्वी**
The Earth of Ours ISBN 978-81-237-1701-2
*लईक फतेहअली* पृ. 64 ₹ 45.00
*अनुवाद : सुधाकर भालेराव*
संपूर्ण निसर्ग हे विशाल आणि गुंतागुंतीचे कोडे कसे आहे हे अतिशय सुलभपणे सांगणारे एका नामांकित निसर्गप्रेमी लेखिकेचे पुस्तक. सुधासत्त्व बसू यांची वैशिष्ट्यपूर्ण सजावट आणि चित्रे.

8. **अशी आहे माझी गोष्ट**
This is My Stroy ISBN 978-81-237-0615-3
*विकी आर्य* पृ. 24 ₹ 50.00
*अनुवाद : नरेश परळीकर*
या उत्साही आणि टवटवीत चित्रपुस्तकात एक बेडूक आपल्या रोजच्या दिनक्रमाची कहाणी सांगत आहे.

9. **असा जाहला स्वतंत्र भारत**
How India Won her Freedom ISBN 978-81-237-3373-9
*कृष्ण चैतन्य* पृ. 36 ₹ 40.00
*अनुवाद : सुनीता गाडगीळ*
भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची प्रेरक कहाणी सांगणारे ज्योतिष दत्तगुप्ता यांच्या सुंदर चित्रांनी सजलेले पुस्तक.

10. **आई समान कुणीही नाही**
Maan Ke Saman Aur Kaun ISBN 978-81-237-6846-5
*केंग्सम केंगलाम / स्मिता पुनवतकर* पृ. 32 ₹ 65.00
खरंच...आईच्या प्रेमाला सीमा असते काय? नाहीच! चला तर मग पूर्वोत्तर राज्यांतील लोककथांमधून आपण समजून घेऊ.

11. **आधाशी वासरू**
Adhashi Vasaru (Out of Print) ISBN 978-81-237-0049-0
*मोमोको इशई / अनुवाद : सुधाकर भालेराव* पृ. 36 ₹ 12.00
सुंदर रंगीत चित्रांनी सजलेल्या एका जपानी गोष्टीचा हा सुरेख अनुवाद वाचतांना नकळत बोध घडतो.

12. **आपलं झाड**
Our Tree ISBN 978-81-237-3703-4
*प्रणब, स्मिता चक्रवर्ती* पृ. 16 ₹ 35.00
*अनुवाद : नरेश परळीकर*
झाडाच्या वेगवेगळ्या भागांशी आपल्या सर्वांच्या कोणकोणत्या कृती कसकश्या निगडित होतात हे सांगणारे बहुरंगी चित्रपुस्तक.

13. **आपले नौदल**
Our Navy ISBN 978-81-237-0506-4
*कमांडर आर. एन. गुलाटी* पृ. 64 ₹ 25.00
*अनुवाद : प्रताप चव्हाण*
भारतीय नौदलाची बांधणी कसकशी होत गेली याची कहाणी या पुस्तकात सांगितलेली आहे. युद्ध असो वा शांतता, नौदल देशाच्या संरक्षणात केवढी मोठी भूमिका निभावते, त्याचे चित्रण करणारे पुस्तक.

14. **आपले भूदल**
Our Army ISBN 978-81-237-0505-7
*मेज. जन. डि. के. पालित* पृ. 64 ₹ 30.00
*अनुवाद : महेश जोशी*
भारतीय सैन्याचा इतिहास, वर्तमान आणि त्यातील खडतर आणि साहसपूर्ण जीवन डोळ्यांसमोर उभे करणारे पुस्तक.

15. **आपले शरीर**
Our Body ISBN 978-81-237-0106-6
*रमेश बिजलानी* पृ. 32 ₹ 55.00
*अनुवाद : अनिकेत जोशी*
आपले शरीर आणि त्यातील विविध घटकांचा सुबोध परिचय करून देणारे पुस्तक. सोबत निरेन सेनगुप्ता यांची कल्पक चित्रे.

16. **आपल्या उपयोगाची झाडे**
Our Useful Plants ISBN 978-81-237-0473-3
*के. एस. शेखरन* (Out of Print)
*अनुवाद : शर्मिला कारखानीस* पृ. 32 ₹ 9.00
माणसांच्या आणि जनावरांच्या कामी येणाऱ्या झाडाझुडपांची ओळख करून देणारे पुस्तक.

17. **आपल्या नद्यांची कहाणी : भाग-१**
The Story of Our Rivers (Part I) ISBN 978-81-237-2703-5
*लीला मुजुमदार / अनुवाद : मो. ग. तपस्वी* पृ. 64 ₹ 35.00
उत्तर भारतातील नद्या आणि त्यांच्या काठावरील जनजीवनाची वेधक कहाणी. तपस दत्ता यांच्या कुंचल्यातून उतरलेली चित्रे.

18. **आम्ही सारे भारतीय**
We Indians ISBN 978-81-237-4011-9
*मेहरू जे. वाडिया* पृ. 24 ₹ 45.00
*अनुवाद : शशांक वि. कुलकर्णी*
भारतातील विविध प्रांतांतील मुलांची, त्यांच्या संस्कृतीची लहान मुलांना खेळकरपणे ओळख करून देणारे प्रादेशिक पोशाखातील मुलांच्या सुंदर चित्रांनी सजलेले पुस्तक.

19. **आंब्याची गोष्ट**
The Story of a Mango ISBN 978-81-237-0231-5
*देबाशीश देव* पृ. 16 ₹ 35.00
या वसंतरंगी चित्रपुस्तकात गलोलीने आंबा पाडणाऱ्या दोन लहान मुलांची गोष्ट आहे. पण आंबा हाती येईपर्यंत खूप गोष्टी घडतात, ठळक आणि वेधक चित्रे.

20. **इतवा मुंडाने लढाई जिंकली**
Etoa Munda Won the Battle ISBN 978-81-237-1312-0
*महाश्वेता देवी / अनुवाद : सुधा नरवणे* पृ. 64 ₹ 40.00
एका आदिवासी मुलाला सुरुवातीपासून नुसते शाळेत जाण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाची कहाणी. विलक्षण चित्रमयी भाषा आणि सखोल आत्मीयतेने लिहिलेले एका श्रेष्ठ बंगाली लेखिकेचे अपूर्व पुस्तक.

21. **इंद्रधनुष्य**
The Rainbow ISBN 978-81-237-2930-5
*उषा जोशी/अनुवाद : विनिता भडंग* पृ. 24 ₹ 45.00
इंद्रधनुष्याची ओळख करून देणारी ही कल्पक गोष्ट इंद्रधनुष्यातील सर्व रंगाच्या चित्रांनी नटलेली आहे.

22. **इवलाले नऊ पक्षी**
Nine Little Birds ISBN 978-81-237-4817-7
*एन. टी. राजीव*
*अनुवाद : सुषमा सोनक* पृ. 20 ₹ 55.00
बालवाचकांना हमखास आवडेल अशी नऊ वाटांनी जाणाऱ्या इवलाल्या पक्ष्यांची कहाणी.

23. **ईदगाह**
Festival of Eid ISBN 978-81-237-0599-6
*प्रेमचंद* पृ. 32 ₹ 40.00
*अनुवाद : संजीवनी खेर*
ईदच्या सणाला मित्रांबरोबर गंमतजंमत करायला निघालेल्या आणि स्वयंपाक करताना आपल्या आजीचे हात भाजू नयेत म्हणून सांडशी घेऊन परतणाऱ्या एका लहान मुलाची भावपूर्ण गोष्ट. प्रभाशंकर कवडींची चित्रे.

24. **एका कौडीचे स्वप्न**
Ek Kori's Dream (Out of Print)
*महाश्वेता देवी*
*अनुवाद : अमरेंद्र गाडगीळ* पृ. 64 ₹ 7.00
चित्रे काढणाऱ्या, शिल्पे कोरणाऱ्या आणि चित्रांतून गोष्टी सांगणाऱ्या एका लहान मुलाची कथा. राणीसाठी देऊळ बांधायचे त्याचे स्वप्न खरे होते का? युधाजित सेनगुप्ता यांची चित्रे.

25. **एके दिवशी**
One Day ISBN 978-81-237-3565-8
*जगदीश जोशी* पृ. 32 ₹ 65.00
*अनुवाद : सुषमा सोनक*
एका मान्यवर चित्रकाराने चित्रित केलेले आणि अरण्यजीवनाचा लोभस परिचय घडविणारे पुस्तक. नवी आवृत्ती.

26. **एव्हरेस्ट : माझ्या जीवनातील अत्युच्च शिखर**
Everest : My Journey to the Top     ISBN 978- 81-237-1865-9
*बचेंद्री पाल / अनुवाद : सुजला नित्सुरे*     पृ. 64  ₹ 35.00
बचेंद्री पाल ही एव्हरेस्ट शिखर सर करणारी पहिली भारतीय महिला. बालपणापासून जोपासलेली उत्कट साहसी वृत्ती, अपार कष्ट, सहकाऱ्यांची मदत आणि अंगभूत कौशल्याच्या बळावर बचेंद्रीने मिळविलेल्या नेत्रदीपक यशाची रोमांचकारक कहाणी.

27. **ऐका कथा चहाची**
A Story about Tea     ISBN 978-81-237-1212-3
*अरूपकुमार दत्त / अनुवाद : ज्ञानदा नाईक*     पृ. 64  ₹ 45.00
आसाममधील चहाच्या मळ्याच्या पार्श्वभूमीवर मुलांसाठी एक रंजक हेरकथा. मृणाल मित्र यांची चित्रसजावट.

28. **ऐका रक्ताची गोष्ट**
The Story of Blood     ISBN 978-81-237-2999-2
*रेखा आणि यतीश अगरवाल/अनुवाद : ज्ञानदा नाईक*  पृ. 56  ₹ 45.00
मानवी शरीरातील रक्त, रक्तातील विविध घटक रक्तगट, रक्ताचे रोग, रक्तनिर्मिती, रक्तप्रवाह, रक्तस्राव आणि रक्तदान अशी रक्ताबाबतची वैज्ञानिक माहिती हसतखेळत देणारे पुस्तक.

29. **ओळखा पाहू कोणता प्राणी**
Name that Animal     ISBN 978-81-237-2879-4
*निरंजन घोषाल*     पृ. 16  ₹ 35.00
मुलांची निरीक्षणशक्ती वाढविणाऱ्या या चित्रपुस्तकात चौदा प्राण्यांना एकमेकांचे अवयव चिकटवले आहेत. मूळ प्राणी कोणता? हे खेळ शोधण्याचा प्रयत्न या पुस्तकात आहे.

30. **कपिलेने घेतला झोका**
Mama Moo on A Swing     ISBN 978- 81-237-0594-1
*युज्ञा आणि टॉमस विसलॅण्डर*     पृ. 28  ₹ 75.00
*अनुवाद : महेश केळुसकर*
कपिला गाय आणि कावळेदादाच्या चतुर संवादातून आणि मोहवून टाकणाऱ्या चित्रातून झोपाळ्यावर झुलायची स्वप्ने प्रत्यक्षात आणणारी एक आगळी गाय एका स्वीडीश लेखिकेने ह्या पुस्तकात उभी केली आहे.

31. **कष्टाळू मुंग्या**
Busy Ants ISBN 978-81-237-2926-8
*पुलक विश्वास* पृ. 16 ₹ 55.00
दोन मुंग्यांनी लाडूचा तुकडा पळवून आपल्या वारुळात कसा नेला याची गोष्ट सांगणारे तजेलदार रंगातले चित्रपुस्तक.

32. **कहाणी टिपू सुलतानाची**
The Story of Tipu Sultan ISBN 978-81-237-3530-8
*संध्या राव / अनुवाद : शरयू सोनावळे* पृ. 16 ₹ 30.00
म्हैसूरच्या टिपू सुलतानाची ही स्वातंत्र्यगाथा 'वाचा आणि रंगवा' ह्या योजनेखाली प्रकाशित.

33. **कहाणी वर्तमानपत्राची**
The Story of Our Newspapers ISBN 978-81-237-1753-1
*चंचल सरकार / अनुवाद : दिनकर गांगल* पृ. 64 ₹ 35.00
वर्तमानपत्रांची सुरुवात, स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी निभावलेली ऐतिहासिक भूमिका, वृत्तपत्रांचे प्रसिद्ध संपादक आणि वर्तमानपत्रांचा एकंदर आढावा घेणारे एका प्रसिद्ध पत्रकाराने लिहिलेले पुस्तक.

34. **काबुलीवाला**
Kabuliwala ISBN 978-81-237-6792-5
*रवींद्रनाथ ठाकूर / अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 20 ₹ 35.00
बांगला भाषेतील महान लेखक रवींद्रनाथ ठाकूर यांची एक अमर रचना.

35. **कावळ्याची गोष्ट**
A Crow's Tale ISBN 978-81-237-0243-8
*जुधाजित सेनगुप्त* पृ. 16 ₹ 40.00
हळुवार जलरंगात रंगविलेल्या चित्रांतून या शालापूर्व पुस्तकात कावळीने अंडी घातल्यावर ती उबवून त्यातून पिले बाहेर पडेपर्यंतची गोष्ट सहजतेने सांगितली आहे.

36. **कासवे आणि मगरींचे जग**
The World of Turtles &
Crocodiles ISBN 978-81-237-4239-7
*झई, रॉम व्हिटेकर आणि इंद्रनील दास* पृ. 64 ₹ 40.00
*अनुवाद : शैलजा ग्रब*
भारतातील वेगवेगळ्या भागांत सापडणाऱ्या मगरी आणि कासवांचे प्रकार, प्रजनन, आहार, सवयी, अधिवास इत्यादींबाबत तज्ज्ञांचे माहितीपूर्ण पुस्तक.

37. **कीटकांचे अद्‌भुत जग**
The Wonderful World of Insects ISBN 978-81-237-3185-8
*हरिंदर धनोआ मातिहार* पृ. 40 ₹ 65.00
*अनुवाद : ज्ञानदा नाईक*
विविध प्रकारचे कीटक, त्यांची शरीररचना, खाद्य, निवास, सवयी आणि वैशिष्ट्ये सांगणारे सुंदर रंगीत चित्रांनी सजलेले पुस्तक.

38. **कोणतं बरोबर कोणतं चूक?**
What's Right? What's Wrong? ISBN 978-81-237-2925-1
*सिगरुन श्रीवास्तव* पृ. 16 ₹ 30.00
*अनुवाद : नरेश परळीकर*
दोघा खोडकर भावंडांना एक रंगीत चष्मा सापडतो. चष्मा लावून त्यांना आपलं रोज खरं जग उलटंपालटं होताना दिसतं आणि मग?

39. **कोणे एके काळी : भाग-१**
Once Upon a Time (Part-I) ISBN 978-81-237-7317-9
*एम, चोकसी आणि पी. एम. जोशी* पृ. 64 ₹ 45.00
*अनुवाद : लीलावती भागवत*
भारताच्या इतिहासातील मोहन-जो-दडोपासून दक्षिणेकडील चोल साम्राज्याच्या काळातील रम्य कथा. पुलक विश्वास यांची आकर्षक चित्रे.

40. **कोणे एके काळी : भाग-२**
Once Upon a Time (Part-II) ISBN 978-81-237-0607-8
*एम.चोकसी आणि पी. एम. जोशी* पृ. 64 ₹ 45.00
*अनुवाद : लीलावती भागवत*
भारताच्या इतिहासातील बौद्ध, मौर्य आणि गुप्तकालीन पार्श्वभूमीवरील सुरम्य कथा. पुलक विश्वास यांची चित्रसजावट.

41. **कोणे एके काळी, एका गावी**
Once in a Village ISBN 978-81-237-2702-8
*मदन*
*अनुवाद : नरेश परळीकर* पृ. 24 ₹ 60.00
झाडांची तोड झाल्याने एका गावी दुष्काळ पडतो. माणसे आणि पशुपक्षी सारेच तळमळतात. मनाला भिडणारी एक गोष्ट.

42. **क्रिकेट**
Criket ISBN 978-81-237-2622-9
*विजय मर्चंट* पृ. 64 ₹ 40.00
*अनुवाद : बाळ ज. पंडित*
एका नामांकित भारतीय क्रिकेट खेळाडूने लिहिलेल्या या पुस्तकात क्रिकेटच्या खेळातील अनेक रोमांचकारी क्षण पुन्हा जागे होतात. लक्षवेधी छायाचित्रे.

43. **गब्दुल**
Friend ISBN 978-81-237-6940-0
*प्रचेत गुप्ता* पृ. 20 ₹ 35.00
*अनुवाद : राहुल कोसम्बी*
एक पांढराशुभ्र छोटा ढग हळूहळू मोठ्ठा होता होता पाण्याने भरून जातो. आपला काळा रंग आणि पाण्याबरोबर वाहून जाण्याच्या भीतीने तो व्याकूळ होतो, पण नदी त्याला समजावते आणि पाण्याने भरलेल्या या ढगाच्या बरसण्यातूनच नवा पांढराशुभ्र ढग पुन्हा जन्माला येतो!

44. **गमतीदार भुते**
Cheerful Spirits ISBN 978-81- 237-3541-2
*गीता अय्यंगार / अनुवाद : क. दि. सोनटक्के* पृ. 40 ₹ 55.00
उन्हाळ्याच्या सुट्टीतील दोन लहान मुलांच्या उपद्व्यापातून आपल्या डोळ्यांसमोर उलगडत जातो दक्षिण भारतातील एकोणिसाव्या शतकातील संयुक्त कुटुंबपद्धती, परंपरा, चालीरीती आणि वेशभूषांचा आगळा इतिहास. सहज संवाद आणि अपूर्व चित्रांतून साकार होणारी कहाणी.

45. **गोमुख यात्रा**
A Journey to Gomukh ISBN 81-237-0544-1
*शीला शर्मा / अनुवाद : कृष्णराव सबनीस* पृ. 64 ₹ 7.50
उत्तरकाशीपासून ते गोमुखपर्यंत केलेल्या हिमालयातील प्रवासाची ही कहाणी. या प्रदेशाचा इतिहास, जनजीवन, वातावरण मोठ्या कुशलतेने या गोष्टीत गुंफले आहे. पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवणार नाही असे हे एक पुस्तक. रीनी कौर यांची चित्रे.

46. **गोरा-काळा**
Gora-Kala ISBN 978-81-237-6844-1
*सय्यद असद अली* पृ. 16 ₹ 40.00
*अनुवाद : राहुल कोसम्बी*
जसा सुख-दुःखाला रंग नसतो तसा प्रेम आणि मैत्रीलाही कोणताच रंग नसतो. भेदभावापलीकडे प्रेम आणि माणुसकीला जपणारी ही कहाणी.

47. **गौतम बुद्ध**
Gautama Buddha ISBN 978-81-237-0608-1
*लीला जॉर्ज* पृ. 60 ₹ 7.00
*अनुवाद : जया देशपांडे*
या पुस्तकात गौतम बुद्धाचे जीवनचित्र ठळक प्रसंगातून उभे केले आहे. सोबत डी. एन. ब्रह्मे यांची चित्रे.

48. **ग्रीष्म ऋतूतील स्पर्धा**
The Summer Tree Contest ISBN 978-81-237-0040-3B
*राधा एम. खम्बादकोणे* पृ. 32 ₹ 55.00
*अनुवाद : सुनंदा देशपांडे*
उन्हाळ्यात बहरणाऱ्या वृक्षांची गोष्टीरूपात सांगितलेली माहिती. डीन गेस्पर यांची अप्रतिम तजेलदार रंगातील चित्रे.

49. **घरे**
Homes ISBN 978-81-237-0107-3
*विविध चित्रकार* पृ. 16 ₹ 35.00
काही भारतीय आणि जर्मन चित्रकार मिळून घरांकडे पाहताहेत. त्यांना घरे कशी कशी दिसली हे सांगणारे अविस्मरणीय शालापूर्व चित्रपुस्तक.

50. **चला नाटक करूया**
Let's do a Play ISBN 978-81-237-3375-3
*उमा आनंद* पृ. 64 Rs. 50.00
*अनुवाद : सई परांजपे*
नाटक करताना काय धमाल येते याची सुरस कथा सांगताना लेखिकेने नाट्यविश्वातील अनेक संकल्पना खुबीने वर्णन करून सांगितल्या आहेत. मिकी पटेल यांची पूरक चित्रे.

51. **चांदोबा मोजणे विसरला**
Chanda Ginati Bhul Gaya — ISBN 978-81-237-6939-4
*संजीव जायस्वाल 'संजय'* — पृ. 32 ₹ 50.00
*अनुवाद : राहुल कोसम्बी*
चांदोबाने आकाशातले सर्वच तारे मोजण्याचा निश्चय केला पण कधी तो स्वतः मोजणे विसरायचा तर कधी दिवसच संपून जायचा. शेवटी या कामात त्याला सूर्याने मदत केली आणि त्यांनी आकाशातील ताऱ्यांच्या संख्येचा शोध लावला.

52. **चाकांचा शोध**
The Coming of Wheels — ISBN 978-81-237-0608-1
*अनुप रे / अनुवाद : राहुल कोसम्बी* — पृ. 16 ₹ 40.00
चाकाच्या शोधयात्रेचे उत्कृष्ट चित्रांद्वारे केलेले सुंदर वर्णन.

53. **चालल्या बाईसाहेब बसमधून**
Madam Rides the Bus — ISBN 978-81-237-3736-X
*वल्लीकानन* — पृ. 32 ₹ 50.00
*अनुवाद : सविता जाजोदिया*
एस. गोपालन यांच्या चित्रांनी सजलेल्या पुस्तकात एका लहान मुलीच्या पहिल्याच बसप्रवासाची गोष्ट.

54. **चिमुकली लाट**
The Little Wave — ISBN 978-81-237-3737-9
*सुमन चंदावरकर / अनुवाद : नीना हेजीब* — पृ. 32 ₹ 55.00
एका लहान मुलीची चिमुकल्या लाटेशी कशी मैत्री झाली याची बहुरंगी चित्रांतून सांगितलेली गोष्ट.

55. **चित्रग्रीव**
Gay-Neck — ISBN 978-81-237-4684-5
*धन गोपाल मुखर्जी* — पृ. 160 ₹ 70.00
*अनुवाद : मारुती चितमपल्ली*
सर्वोत्कृष्ट भारतीय बालसाहित्यातील दुर्मीळ लेणे. एक संदेशवाहक कबुतर आणि त्याचे पालनपोषण करणारा पोरवयातील उत्साही कथानायक यांची आगळी कहाणी.

56. **चित्रपट निर्मिती**
How Films Are Made ISBN 978-81-237-3722-X
*ख्वाजा अहमद अब्बास / अनुवाद : मंजू अग्रवाल* पृ. 64 ₹ 40.00
खास मुलांसाठी लिहिलेल्या या पुस्तकात चित्रपट कसा तयार करतात ते रंजकतेने सांगितले आहे. अनेक कृष्णधवल छायाचित्रे.

57. **चुनमून उडू लागते**
Chunmum Finds Freedom ISBN 978-81-237-5003-3
*कमलेश मोहिन्द्रा / अनुवाद : सुषमा सोनक* पृ. 16 ₹ 40.00
छोट्या मुलांसाठी एक मनोरंजक व प्रेरणादायी गोष्ट.

58. **चौदा उंदीर घर बांधतात**
Chauda Undir Ghar Bandhatat (Marathi) ISBN 978-81-237-0059-5
*काझुओ इवामुरा / अनुवाद : नरेळ परळीकर* पृ. 32 ₹ 40.00
आनंदात एकत्र मिळून कष्ट करणाऱ्या कुटुंबाची गोड गोष्ट सांगणाऱ्या या पुस्तकात मुलांना दरवेळी नवे काहीतरी सापडेल. या पुस्तकातील चित्रे, त्यांतील तपशील आणि हलकेसे रंग मुलांना खिळवून ठेवतील.

59. **छोट्या मुंगीची मोट्ठी मेजवानी**
Chhoti Chinti Ki Badi Dawat ISBN 978-81-237-6842-7
*कुसुमलता सिंह*
*अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 24 ₹ 55.00
मुंग्या अथकपणे जेव्हा आपल्या खाण्याच्या सामानाची तरतूद जमिनीखाली करू लागतात तेव्हा लवकरच पाऊस येणार असं म्हटलं जातं. आणि योग्य वेळी या मुंग्याच कशा आपल्या या काटकसरीतून साठवलेल्या अन्नातून जंगलातील इतर मोठ्या प्राण्यांना भुकेपासून वाचवतात याचे हे गमतीदार चित्रण.

60. **झुलू**
Zulu ISBN 978- 81-237-6245-6
*रमेश पत्री / अनुवाद : चंद्रकांत निकाडे* पृ. 48 ₹ 30.00
शिकाऱ्यांमुळे एक हत्तीचे पिल्लू आपल्या आईपासून दुरावते. एक स्वामी त्याला आपल्याबरोबर मठात नेतात आणि त्याला वाढवतात. या स्वामिभक्त झुलूला स्वामींच्या मृत्यूनंतर सर्कशीत पाठवले जाते. तिथल्या गुलामगिरीविरुद्धाची त्याची चिड राष्ट्रभक्ती आणि आपल्या मातृभाषेच्या प्रेमातून व्यक्त होते. त्याचीच ही कहाणी.

61. **जग बदलले या शोधांनी : भाग-१**
Inventions that Changed
the World (Part-I) ISBN 978-81-237-1741-8
*मीर नजाबत अली* पृ. 64 ₹ 35.00
*अनुवाद : यशोधरा सुभेदार*
जगात बदल घडवून आणणारे चाक, वाफेचे इंजिन, छापखाना अशा काही महत्त्वाच्या शोधांची माहिती लेखकाने रोचक शैलीत सांगितलेली आहे.

62. **जग बदलले या शोधांनी : भाग-२**
Inventions that Changed the
World (Part-II) ISBN 978-81-237-1742-5A
*मीर नजाबत अली* पृ. 64 ₹ 35.00
*अनुवाद : ना. वा. कोगेकर*
तार, अणुशक्ती, इलेक्ट्रॉनिकी या अजून काही शोधांची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. अहमद यांची चित्रे आणि व्यंगचित्रे.

63. **जवाहरलाल नेहरू**
Jawaharlal Nehru ISBN 978-81-237-2876-6
*तारा अली बेग/अनुवाद : सुनीता गाडगीळ* पृ. 64 ₹ 55.00
नेहरूंचे बालपण, तरुण वय आणि पंतप्रधान झाल्यावर प्रौढ जीवनातील प्रसंग आणि आठवणी, दुर्मीळ छायाचित्रांसहित साकार करणारे पुस्तक.

64. **जादूगार**
The Magecian ISBN 978-81-237-4008-9
*विशाखा / अनुवाद : अलका कुंटे* पृ. 32 ₹ 35.00
जादूगार कसा असतो, कसा दिसतो, त्याच्या पोतडीतून काय निघते याची उत्कंठा वाढविणारी वैशिष्ट्यपूर्ण चित्रकथा.

65. **जालियांवाला बाग**
Jallianwala Bagh ISBN 978-81-237-0910-9
*भीष्म साहनी / अनुवाद : अरुंधती देवस्थळे* पृ. 64 ₹ 40.00
भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील जालियांवाला बागेचा इतिहास प्रत्येकाला माहीत असणे आवश्यक आहे. एक सुन्न करणारी कहाणी.

66. **जंगलातले तळे**
The Pool in the Jungle ISBN 978-81-237-0116-5
*उमा आनंद / अनुवाद : मृदुला घोडके* पृ. 32 ₹ 40.00
माणसाने जंगलांचा नाश करण्याआधीचे अरण्यजीवन कसे होते हे सांगणारे सुरम्य पुस्तक. अमीना जयाल यांची मनोवेधक चित्रे.

67. **झाडाची भेट**
What is A Tree? ISBN 978-81-237-0570-5
*मार्ती / अनुवाद : सुषमा सोनक* पृ. 24 ₹ 40.00
वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्या कारागिरांना, पशुपक्ष्यांना, आणि आपल्या पृथ्वीला झाडे काय काय देतात? झाडांचा आणि आपला अतूट संबंध दाखवणारी प्रणब चक्रवर्तींची सुंदर चित्रे असलेले पुस्तक.

68. **झाशीच्या राणीची कहाणी**
The Story of Rani of Jhansi ISBN 978-81-237-3187-2
*संध्या राव/ अनुवाद : अनुराधा आठवले* पृ. 16 ₹ 35.00
झाशीच्या राणीची प्रेरक कहाणी सांगणाऱ्या ह्या पुस्तकात झाशीच्या राणीच्या आयुष्यातील निर्णायक प्रसंग उभी करणारी चित्रे आहेत. ही उज्ज्वल स्वातंत्र्यकहाणी वाचून बालवाचकांना यातील चित्रे रंगविता येतील.

69. **झेंड्यांचे रंगीबेरंगी जग**
The Colourful World of Flags ISBN 978-81-237-6318-7
*के. व्ही. सिंग / अनुवाद : श्रुती मुरकुटकर* पृ. 88 ₹ 160.00
झेंड्यांचा जन्म, त्यांचा इतिहास, त्यांचे प्रकार, नियम आणि त्यांच्या बाबतच्या किश्श्यांसह बरीच मनोरंजक माहिती या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळेल.

70. **टपाल तिकिटांची अद्‌भुत कथा**
*एस. पी. चटर्जी* ISBN 978-81-237-7321-6
*अनुवाद : प्रथमा सुधाकर पुंडे* पृ. 64 ₹ 35.00
टपाल खाते, टपाल सेवा आणि तिकिटे, त्यांची पहिली छपाई त्यातले दोष, भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय टपाल सेवा-तिकिटे यांचा रोचक इतिहास सविस्तर आणि योग्य तपशीलांतून या पुस्तकातून आपल्या समोर उलघडत जातो. टपाल तिकिटांच्या संग्रहाविषयीही यात अमूल्य अशी माहिती दिली.

71. **टोळंभटाची भरारी**
Tolmbhatanchi Bharari — ISBN 978-81-237-0081-4
*सेइझो ताशिमा* — पृ. 36 ₹ 22.00
*अनुवाद : शिरीष निपाणीकर*
निसर्ग आणि कीटक जीवनातील सूक्ष्म घडामोडीवर आधारित रंजक जपानी गोष्टीचा अनुवाद. अप्रतिम चित्रे.

72. **www.निबिड अरण्य.com**
www.ghanajungle.com — ISBN 978-81-237-5516-8
*हरिकृष्ण देवसरे* — पृ. 56 ₹ 105.00
*अनुवाद : नीला उपाध्ये*
एका थोर भारतीय संगीतकाराची जीवनकहाणी सांगणारे पुस्तक. लेखकाने चित्रांसाठी देखणी चित्रशैली वापरली आहे.

73. **ड्रॅगन सुनामी :** *दहा जपानी लोककथा*
Dragon Tsunami — ISBN 978-81-237-6379-8
*हेमा पांडे* — पृ. 72 ₹ 95.00
*अनुवाद : अनघा हिरे*
दहा जपानी लोककथा, ज्यातून जपानी माणसाची संकटे झेलण्याची आणि परिश्रम करण्याच्या चिवट वृत्तीचे दर्शन घडते.

74. **तानसेन**
Tansen — ISBN 978-81-237-3740-9
*अशोक दावर* — पृ. 40 ₹ 35.00
*अनुवाद : सुनंदा देशपांडे दातार*
एका थोर भारतीय संगीतकाराची जीवनकहाणी सांगणारे पुस्तक. लेखकाने चित्रांसाठी देखणी चित्रशैली वापरली आहे.

75. **तिली नावचे फुलपाखरू**
Tilli the Butterfly — ISBN 978-81-237-0605-4
*रमेश बक्षी* — पृ. 32 ₹ 55.00
*अनुवाद : उमा जोशी*
तिली आणि तितल या फुलपाखरांची आणि एका लहान मुलीच्या स्वप्नरंजनाची गोष्ट. सुधासत्त्व बसूंची तजेलदार चित्रे.

76. **तुझ्यापेक्षा मीच चांगला**
I am Better than You ISBN 978-81-237-0620-7
*सिगरून श्रीवास्तव* पृ. 24 ₹ 45.00
*अनुवाद : शिरीष निपाणीकर*
कोलाज माध्यमातील मिश्कील चित्रांची रेलचेल असलेले हे पुस्तक भावाबहिणींना वाढविण्यातला सूक्ष्म फरक लक्षात आणून देते आणि भावंडातल्या चढाओढीचे आणि मायेचेही वर्णन समरसून करते.

77. **तेरा अपूर्व किशोर कथा**
The Best Thirteen ISBN 978-81-237-1896-5
*अनुवाद : सुमती सरन* पृ.144 ₹ 115.00
मिकी पटेल यांच्या चित्रांनी सजलेल्या या पुस्तकात तेरा अविस्मरणीय भारतीय किशोरकथा संग्रहित केलेल्या आहेत. उत्कृष्ट भारतीय बालवाङ्मयकारांची ओळख करून देणारे एकमेव पुस्तक.

78. **त्यांनी पाहिलेला भारत**
As they Saw India ISBN 978-81-237-3767-6
*के. सी. खन्ना / अनुवाद : भा. रा. भागवत* पृ.64 ₹ 40.00
युआन श्वांग, फा-हिन, मेगास्थेनीज आणि अल बेरुनी या प्रवाशांच्या दृष्टीतून त्यांनी पाहिलेला भारत. कृष्ण खन्ना या सुप्रसिद्ध चित्रकाराची सजावट आणि चित्रे.

79. **दोन कुत्र्यांची गोष्ट**
A Tale of Two Dogs ISBN 978-81-237-6843-4
*दीपक प्रहाराज / अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 20 ₹ 50.00
श्रीमंती किंवा गरिबी तुमच्या उपजत गुणांना रोखू शकत नाहीत. हुशारी, धाडसीपणा आणि चतुराई हे गुण जरी उपजत असले तरी त्यांचा उपयोग हा चांगल्या कामांसाठी केला तर त्या व्यक्तीची वाह-वाह होतेच.

80. **दिवाळी**
Diwali ISBN 978-81-237-2878-6
*रवि परांजपे* पृ. 12 ₹ . 30.00
दिवाळीच्या सणाची चित्रमय कहाणी. दिवे लावणे, फटाके उडवणे, नवे कपडे मिळणे, गोड खाणे अशा लहानसहान प्रसंगातून या महत्त्वाच्या भारतीय सणाचे चित्र साकारणारे चित्रपुस्तक.

81. **धम्माल रविवार**

A Happy Sunday ISBN 978-81-237-5601-1

*देबाशिष देव / अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 24 ₹ 50.00

रविवारी बंटीला सुट्टी असते. तो आज काहीही करू शकतो. तो खूप आनंदी आहे. पण संध्याकाळ होताच सोमवारच्या आठवणीने तो उदास होतो. पण आई त्याला प्रत्येक दिवसाचे महत्त्व पटवून देते.

82. **नदी बोलली त्या दिवशी**

The Day the River Spoke ISBN 978-81-237-3723-2

*कमला नायर* पृ. 36 ₹ 40.00

*अनुवाद : सविता जाजोदिया*

केरळमधील एका लहानशा गावातील एका छोट्या मुलीची ही संवेदनशील गोष्ट. तिला जायचे आहे शाळेत. शंकर सेन यांची चित्रे.

83. **नवी सकाळ**

Naya Savera ISBN 978-81-237-6259-3B

*बलदेव सिंह 'बद्दन'* पृ. 16 ₹ 40.00

*अनुवाद : राहुल कोसम्बी*

फक्त गंमत म्हणून गरजेपेक्षा जास्त प्राण्यांना मारून खाणाऱ्या सिंहाचे पऱ्या कसे मनपरिवर्तन करतात त्याचीच ही गोष्ट.

84. **नेपाळी बेडकाचे साहसी कारनामे**

Nepali Mendhak Ke Sahasi Karname ISBN 978-81-237-6380-4

*कणक मणि दीक्षित / अनुवाद : अनघा हिरे* पृ. 112 ₹ 40.00

काठमांडू घाटीतील तरुण उत्साही बेडूक आपल्या देशाची यात्रा करण्याचा निश्चय करतो. डोंगराळ, मैदानी भाग आणि विविध पात्रांच्या साहाय्याने भक्तप्रसादच्या धाडसी कारनाम्यांनी नेपाळचे एक सुंदर वास्तविक चित्र रेखाटले आहे.

85. **पळा पळा वाघ आला**

A Voice in the Jungle ISBN 978-81-237-4007-2

*जगदीश जोशी* पृ. 16 ₹ 35.00

माकडं, ससे, हत्ती, सगळे कसे रानात मजेत विहरताहेत. एवढ्यात वाघाची डरकाळी ऐकू येते. आणि मग? छोट्यांना गुंगवून टाकणारे चित्रपुस्तक.

86. **पक्षी जगत** (नवी संशोधित आवृत्ती)
Watching Birds ISBN 978-81-237-5834-3
*जमाल आरा* पृ. 64 ₹ 40.00
*अनुवाद : राजा मंगळवेढेकर*
उत्कृष्ट पक्षिनिरीक्षक होण्यासाठी छोट्यांना अतिशय मनोरंजक आणि माहितीपूर्ण पुस्तक. सुंदर रंगीत चित्रे आणि तक्ते.

87. **पाच दोस्त**
Panch Dost ISBN 978-81-237-6849-6
*शिरीन रिझवी / अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 28 ₹ 45.00
एक पोलीस, एक हेर, एक डॉक्टर आणि त्यांचे इतर दोन मित्र. हे पाच मित्र मिळून सिंहराजांचा हार सुखरूपपणे परत मिळवतात आणि चोराला योग्य ती शिक्षाही करतात.

88. **पाणी**
Water ISBN 978-81-237-2929-9
*राम / अनुवाद : शाम तारे* पृ. 64 ₹ 35.00
या पुस्तकात पाण्याविषयी अनेकविध दृष्टिकोनांतून विचार केलेला आढळेल, पाणी येते कुठून, पाणी म्हणजे काय, पाण्याचे अनेक उपयोग आणि वापराच्या योजनांविषयी यात माहिती आहे. सुधासत्व बसू यांची आकर्षक दुरंगी चित्रे.

89. **पाण्याची गोष्ट**
A Story about Water ISBN 978-81-237-0611-1
*रवि परांजपे* पृ. 16 ₹ 35.00
झिमझिम, धोधो, बुरबुर पावसातील लहान-मोठ्या गमतीजमतींची चित्रे, सोबत दुष्काळातील काही घडामोडी. एक सुबक चित्रपुस्तक.

90. **पार्सलमधून बॉम्ब?**
Dak Babu Ka Parcel ISBN 978-81-237-3533-7
*द्रोणवीर कोहली* पृ. 52 ₹ 55.00
*अनुवाद : विद्या बापट*
हिमालय प्रदेशात सुट्टी घालवायला गेलेला एक लहान मुलगा आठवणीखातर नदीतील गोटे उचलून आणतो आणि पाहता पाहता त्याच्या नजरेसमोर हिमालयातील पर्यावरणाचे चित्र उलगडू लागते. एक संवेदनशील कहाणी.

91. **प्रदूषण**
Pollution — ISBN 978-81-237-1747-0
*एन. शेषगिरी* — पृ. 64 ₹ 45.00
*अनुवाद : सुनंदा देशपांडे दातार*
नद्या, समुद्र आणि वातावरणाचे विविध प्रकारे होणारे प्रदूषण तथा मानवी जीवन व निसर्गावर होणारा याचा परिणाम हा या पुस्तकाचा महत्त्वपूर्ण विषय आहे.

92. **प्राणिसंग्रहालयात**
Who's Who at the Zoo — ISBN 978-81-237-2704-2
*रस्किन बाँड / अनुवाद : दीपक कुमार* — पृ. 64 ₹ 25.00
प्राणिसंग्रहालयात आढळणाऱ्या प्राणी आणि पक्ष्यांची ओळख करून देणारे पुस्तक. यात रघु राय या प्रसिद्ध भारतीय छायाचित्रकाराची छायाचित्रे आहेत.

93. **प्राणिसंग्रहालयास भेट**
A Visit to the Zoo — ISBN 978-81-237-3693-2
*सनत सूर्ती* — पृ. 16 ₹ 55.00
शालापूर्व आनंदी चित्रपुस्तक. प्राण्यांची ही रंगीबेरंगी चित्रे पाहताना शब्दांची गरजही वाटत नाही.

94. **प्राण्यांचे जग**
Animal World — ISBN 978-81-237-5603-5
*अरबिंदो कुंडू / अनुवाद : राहुल कोसम्बी* — पृ. 16 ₹ 35.00
जंगलातील महत्त्वाच्या प्राण्यांची दोन-दोन ओळींतून रेखाटलेली अप्रतिम स्वभावचित्रे.

95. **प्रिय पोपट**
Dear Popat — ISBN 978-81-237-6298-2
*मधु लिमये / अनुवाद : राहुल कोसम्बी* — पृ. 32 ₹ 55.00
पोपटाला पाठवलेली पत्रे पारिजातकाच्या फुलांसारखी आहेत. पत्रांमधे वैशिष्ट्यपूर्ण आवाजांची, दिसण्याची, वागण्याची नक्कल, विविध पक्ष्यांचे रंग, त्यांचा आवाज, सवयी यांचे मधु लिमये यांनी तंतोतंत वर्णन केले आहे. त्यामुळे ते आग्वाडा किल्ल्यातील तुरुंगाबाबत नसून अग्वाडा प्राणिसंग्रहालया-बद्दल बोलताहेत असे वाटते.

96. **प्रेमचंद**

Premchand ISBN 978-81-237-0321-3

*अमृत राय / अनुवाद : भा. रा. भागवत* पृ. 48 ₹ 30.00

थोर भारतीय साहित्यकार प्रेमचंद यांची जीवनकहाणी त्यांच्या आयुष्यातील काही ठळक प्रसंगांतून त्यांच्याच शब्दात सांगितलेली आहे. कृष्णधवल छायाचित्रे.

97. **फुगा**

The Balloon ISBN 978-81-237-0600-9

*दत्तात्रय पाडेकर* पृ. 16 ₹ 35.00

फुगा फुगवता फुगवता तो लहान मुलगा फुग्याबरोबर उडूनच गेला. आणि मग? एक गमतीशीर चित्रपुस्तक.

98. **फुले आणि मी**

Flowers and I ISBN 978-81-237-2701-1

*मनोरमा जफा / अनुवाद : मृणालिनी पाठक* पृ. 24 ₹ 45.00

मुलांना विविध आनंददायी छंद असतात. फुले सुकविण्याचा छंद रमवणारा तर आहेच पण त्यापासून किती वेगवेगळ्या गोष्टी शिकताही येतात. चाररंगी चित्रांचे एक टवटवीत पुस्तक. नवी आवृत्ती.

99. **बडा पाणी**

Bara Pani ISBN 978-81-237-2924-4

*लीला मजुमदार* पृ. 64 ₹ 45.00

*अनुवाद : सविता जाजोदिया*

लहानगा कनू पहाडी इलाख्यात नानांबरोबर भटकंती करताना जंगलवाचन शिकतो. पुलक विश्वास ह्यांची सिद्धहस्त चित्रे असलेले एक अविस्मरणीय पुस्तक.

100. **बाजाराला चला**

A Visit to City Market ISBN 978-81-237-3719-5

*मंजुळा पद्मनाभन* पृ. 16 ₹ 40.00

दोघे लहान बहिणभाऊ आईबरोबर बाजारात जातात तेव्हा त्यांना काय काय दिसतं? तिथं काय घडतं? अगदी छोट्यांसाठी मजेशीर शालापूर्व चित्रपुस्तक.

101. **बिरजू आणि त्याचा उडता घोडा**
Birju and the Flying Horse ISBN 978-81-237-3176-6A
*दीपा अगरवाल / अनुवाद : विद्यागौरी टिळक* पृ. 16 ₹ 35.00
एक लंगडा मुलगा आणि त्याचा जादूचा उडता घोडा यांची साहसपूर्ण कल्पनारम्य कहाणी.

102. **बुटकी म्हातारी**
Little Old Women ISBN 978-81-237-0959-8
*मार्गारेट भट्टी* पृ. 32 ₹ 45.00
*अनुवाद : शिरीष निपाणीकर*
बुटका म्हातारा डोंगर उतरून मेंढ्या आणायला जायचे ठरवतो. त्याची बायको एक मोठं बोचकं त्याला बांधून देते. ते त्याच्या कामी येतं का? खुसूखुसू हसवणारी चित्रे. नवी आवृत्ती.

103. **बेगम गुलाबो मावशी आणि तिचे फुगे**
Begum Gulabo Mousie and her Balloon ISBN 978-81-237-3526-9
*क्वादसिया झैदी* पृ. 24 ₹ 45.00
*अनुवाद : मुकुंद टाकसाळे*
बेगम गुलाबोला फुग्यात एके दिवशी एक छोटासा मित्र भेटतो. बालवाचकांसाठी सुंदर चाररंगी चित्रांनी सजलेली मनोहर कहाणी.

104. **बेडूक आणि साप**
Frog and A Snake ISBN 978-81-237-4218-2
*गणेश हलोई / अनुवाद : सुषमा सोनक* पृ.16 ₹ 35.00
बेडकांची शिकार करायला उतावीळ झालेल्या सापाला बेडूक कशा सुरेख हुलकावण्या देतात याचे गतिमान चित्रांतून वर्णन करणारे शालापूर्व चित्रपुस्तक.

105. **बैलगाड्या आणि उपग्रह**
Bullock Carts and Satellite ISBN 978-81-237-1481-3A
*मोनिषा बॉब* पृ.64 ₹ 35.00
*अनुवाद : उमाकांत ठोमरे*
प्राचीन काळापासून आधुनिक काळातील विज्ञान तंत्रज्ञान यांच्या भारतातील विकासाची मनोवेधक कहाणी.

106. **बोरीचा पूल**
Bridge At Borim ISBN 978-81-237-4604-3
*सुरेखा पाणंदीकर* पृ.80 ₹ 35.00
गोव्यातील स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवरील एक थरारक बालकथा.

107. **भटकबहाद्दर बोकोबा**
The Stoaway ISBN 978-81-237-3178-0
*मेलनी सिक्वेरा* पृ. 24 ₹ 25.00
*अनुवाद : मुकुंद टाकसाळे*
मार्को नावाचा भटकबहाद्दर बोकोबा एके दिवशी एका जहाजात चढतो आणि आपल्या जहाजावरील नाना करामतींसाठी एका उंदराला दमात घेतो. दोघे मिळून सर्वांना सळो की पळो करून सोडतात. हरिंदर सिंग ह्यांची चित्रे.

108. **भारतातील बहादूर मुले**
India's Young Heroes ISBN 978-81-237-0268-1
*सिगरून श्रीवास्तव* पृ. 64 ₹ 30.00
*अनुवाद : जगदीश काबरे*
आपल्या बहादुरीसाठी बक्षीस मिळविलेल्या मुलांच्या शूर स्वार्थत्यागाची कहाणी.

109. **भारतीय कलेतील प्राणी आणि पक्षी**
Animals and Birds in Indian Art ISBN 978-81-237-5835-0
*गितिका जैन* पृ. 24 ₹ 60.00
*अनुवाद : राहुल कोसम्बी*
भारतातील विविध प्रदेशातील विशिष्ट चित्रकलेतून झळकणाऱ्या प्राण्यांच्या शोध.

110. **भालची हौस पुरी फिटली**
Bhalchi Haus Puri Fitli
(Original Marathi) ISBN 978-81-237-0612-2
*शरच्चंद्र बडोदेकर* पृ. 16 ₹ 35.00
आपले नाव वर्तमानपत्रात छापून यावेसे भालला वाटते. यासाठी तो काय करतो? त्याच्या प्रयत्नांना यश मिळते का? नवी आवृत्ती.

111. **भूकंप आणि वणवा**

Quakes And Flames ISBN 978-81-237-3454-5

*रस्किन बाँड / अनुवाद : क. दि. सोनटक्के* पृ. 52 ₹ 25.00

एका श्रेष्ठ बालसाहित्यकाराने वर्णिलेले दोन थरारक प्रसंग. एक भूकंप आणि एका जंगलातील वणवा. दोहोंमधून गावकरी आणि मुले कशी वाट काढतात याची चित्तथरारक कहाणी. नवी आवृत्ती.

112. **भोलू आणि गोलू**

Bholu & Golu ISBN 978-81-237-4069-0

*पंकज बिष्ट / अनुवाद : नीला उपाध्ये* पृ. 80 ₹ 35.00

जंगलातील एक छोटेसे अस्वल पकडून सर्कशीत आणले जाते. त्याची सुटका करणारे उत्साही दोस्त त्याला कसे भेटतात? वन्य जीवांविषयी आत्मीयता वाढविणारी खेळकर गोष्ट.

113. **मंगूचा भोवरा**

Mangu's Top ISBN 978-81-237-0614-6

*कामाक्षी बालसुब्रह्मण्यन् / अनुवाद : विनय तट्टे* पृ. 24 ₹ 40.00

एका गरीब मुलाजवळ खेळणीदेखील नसतात. पण एक दिवस त्याला एक टवका उडालेला भोवरा सापडतो. अप्रतिम चित्रांतून उलगडणारी भावपूर्ण गोष्ट.

114. **मंत्र तंत्र**

Mantra Tantra ISBN 978-81-237-3532-0

*आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी* पृ. 32 ₹ 45.00

*अनुवाद : विद्या सहस्त्रबुद्धे*

भारतीय संस्कृतीतील बहुमोल मूल्यांचा हसतखेळत परिचय करून देणाऱ्या हिंदीतील एका मान्यवर लेखकाच्या बालकथा.

115. **मदर तेरेसा**

Mother Teressa ISBN 978-81-237-0617-7

*लीला मुजुमदार आणि बच्ची करकरिया* पृ. 64 ₹ 40.00

*अनुवाद : फ्रान्सिस दिब्रिटो*

मदर तेरेसाचे प्रेरक जीवनचित्र आणि लोकविलक्षण कार्याची साध्या सोप्या घटनांतून उलगडत जाणारी कहाणी. रंगीत मुखपृष्ठासहित, कृष्णधवल छायाचित्रे.

116. **मनीमावशीचा परिवार**
The Cat Family ISBN 978-81-237-0115-8
*एम. डी. चतुर्वेदी* पृ. 64 ₹ 40.00
*अनुवाद : सुनील सुभेदार*
अनेक कृष्णधवल छायाचित्रांनी सजलेल्या ह्या पुस्तकात भारतीय वाघांची थरारक कहाणी एका वन्यजीवनाच्या अभ्यासकाने सांगितली आहे.

117. **मनूचा मासा**
Matsya : The Bueautiful Fish ISBN 978-81-237-0602-3
*शांता रामेश्वर राव* पृ.32 ₹ 55.00
*अनुवाद : माया काबरे*
एक लहानसा मासा हळूहळू मोठा होतो आणि जगप्रलयात माणसाचे रक्षण करतो. सिगरुन श्रीवास्तव यांची कोलाज माध्यमातील आनंदी चित्रे.

118. **मला जग आवडतं**
I Like the World ISBN 978-81-237-3689-1
*जयंती मनोकरन* पृ. 32 ₹ 35.00
आपल्या भोवतालच्या जगतात रमलेल्या एका लहान मुलीची गोष्ट सांगणारे रमणीय चित्रपुस्तक.

119. **महाराजा रणजित सिंह**
Maharaja Ranjit Singh ISBN 978-81-237-1427-1
*प्रीतम सिंह* पृ. 64 ₹ 35.00
*अनुवाद : सुधा नरवणे*
पंजाब राज्याचा संस्थापक, मुत्सद्दी, लढवय्या आणि सर्व धर्मांतील लोकांना समभावाने वागवणाऱ्या एका वैशिष्टपूर्ण राजाची हकिकत. लघुचित्रांच्या शैलीने उठावदार झालेले पुस्तक.

120. **माझा आगगाडीचा प्रवास**
My First Railway Journey ISBN 978-81-237-3715-7
*मृणाल मित्र* पृ. 16 ₹ 35.00
एका मुलाचा आगगाडीचा पहिलाच प्रवास. फलाटावरची गजबज, गाडीत चढल्यावर खिडकीशी जागा, बोगद्यातून प्रवास आणि शेवटी हवे त्या ठिकाणी जाऊन पोचणे या सर्व घडामोडींमध्ये आपल्याला सामील करून घेणारे चित्रपुस्तक.

121. **माझा यंत्रमानव मित्र रोबी**
My Robot Robbi — ISBN 978-81-237-3585-6
*दिलीप एम. साळवी* — पृ. 40 ₹ 40.00
*अनुवाद : कविता भालेराव*
रोबो काय काय करू शकतो हे एका मुलाला गोष्टीरूपाने सांगताना लेखक आपल्याला सहजतेने 'रोबोटिक्स' ह्या विषयातून फेरफटका मारून आणतात आणि विज्ञानाचा मानवी जीवनावरील प्रभाव दर्शवून देतात.

122. **माझी सुटका करा**
Set me Free — ISBN 978-81-237-2849-0
*आशिष सेनगुप्ता* — पृ. 16 ₹ 30.00
*अनुवाद : सुषमा सोनक*
बंदिस्त प्राणी पाहून एका लहान मुलाला वाटते, कुणाचीही गत अशी होऊ नये. सर्वांना मोकळे सोडावे. एक संवेदनशील कहाणी आणि बोलकी चित्रे.

123. **माझी बहीण नेहा**
Neha, My Sister — ISBN 978-81-237-4918-1
*मधु बी. जोशी* — पृ. 16 ₹ 30.00
*अनुवाद : सुषमा सोनक*
छोट्या मुलांच्या कोवळ्या भावना शब्दबद्ध करणारी सुंदर रचना. अप्रतिम चित्रे.

124. **माझे जीवन : एका फुलपाखराची कहाणी**
My Life : The Tale of Butterfly — ISBN 978-81-237-4435-3
*अंजन सरकार* — पृ. 16 ₹ 40.00
*अनुवाद : सुषमा सोनक*
माहितीपूर्ण छायाचित्रांनी सजलेल्या या पुस्तकात फुलपाखरांच्या जीवनचक्रातील अनोखे आणि सुंदर बदल टिपलेले आहेत.

125. **माणूस आणि सावली आणि इतर कथा**
Manus Ani Sawali Ani Itar Katha
(Original Marathi) — ISBN 978-81-237-4992-1
*राजीव तांबे* — पृ. 24 ₹ 55.00
मानव आणि निसर्ग यांच्यातल्या सहजीवनाच्या छोट्या-छोट्या गोष्टी. अप्रतिम चित्रे.

126. **मीता आणि तिचा जादूचा बूट (सुधारित आवृत्ती)**

Mitha and her Magic Shoe ISBN 978-81-237-2651-9

*बी. जी. गुजरप्पा / अनुवाद : नरेश परळीकर* पृ. 16 ₹ 55.00

मीताला जादूचा बूट सापडल्यावर काय होतं? मजेत जादूचे बूट घालून आकाशात उडणाऱ्या मीताविषयी तिच्या आजूबाजूच्या लोकांच्या काय प्रतिक्रिया होतात?

127. **मुंगूस पण राजा**

Nevla Bhi Raja ISBN 978-81-237-6841-0

*बलदेव सिंह 'बद्दन' / अनुवाद : राहुल कोसम्बी* पृ. 24 ₹ 55.00

हिम्मत, आत्मविश्वास आणि चतुराई या गुणांमुळे कोणीही कोणत्याही संकटातून सहजपणे बाहेर येऊ शकतो. मुंगूसही यांचा योग्य उपयोग करून स्वतःला आणि जंगलातील इतर प्राण्यांना कशा पद्धतीने क्रूर बिबट्यापासून वाचवतो त्याची ही रंगतदार कहाणी.

128. **मुनियाला सोनं कसं सापडलं?**

How Munia found Gold? ISBN 978-81-237-6675-1

*जगदीश जोशी / अनुवाद : रजनीकांत प्रधान* पृ. 32 ₹ 80.00

मुनिया नावाच्या पक्ष्याला एक बी सापडते, आणि त्यातून एक झाड उगवून त्याचा मोठा वृक्ष होतो, बहरतो, लेखकाने रंगविलेली बहुरंगी छायाचित्रे.

129. **मुत्थूची मनोराज्ये**

Muthu's Dreams ISBN 978- 81-237-2847-6

*कामाक्षी बालसुब्रह्मण्यन्* पृ. 32 ₹ 55.00

*अनुवाद : सुषमा सोनक*

मुत्थू नावाच्या लहान मुलाच्या कल्पनासाम्राज्यातील भराऱ्यांना आकार देणारे एक छान शिक्षक त्याला भेटतात आणि त्याच्या जडणघडणीला कसा हातभार लावतात हे सांगणारे पुस्तक.

130. **मुलांची नाटके**

Mulanchi Natake

(Original Marathi) ISBN 978-81-237-0618-4

*संपा. रत्नाकर मतकरी* पृ. 124 ₹ 80.00

रा. ग. गडकरी, पु. ल. देशपांडे, चि. त्र्यं. खानोलकर आणि इतर प्रसिद्ध नाटककारांनी लिहिलेल्या मूळ मराठी प्रयोगक्षम नाटिका.

131. **मोरा**

Mora ISBN 978-81-237-0601-6

*मुल्कराज आनंद* पृ. 40 ₹ 65.00

*अनुवाद : सविता जाजोदिया*

एक हत्तीची मनाला भिडणारी गोष्ट. मिकी पटेल यांची अविस्मरणीय चित्रे.

132. **मोहिनी आणि भस्मासूर**

Mohini & The Demon ISBN 978-81-237-1294-9

*शांता रामेश्वर राव* पृ. 32 ₹ 55.00

*अनुवाद : मृणालिनी वडाळकर*

मोहिनी या एका निर्भय मुलीची गुंगवून टाकणारी गोष्ट. सर्वांना त्रास देणाऱ्या दैत्याला या कल्पक लहान मुलीने कसा धडा शिकविला ते या एका पुराणकथेवर आधारित चाररंगी चित्रांच्या पुस्तकात वाचा.

133. **येरे येरे पावसा**

Waiting for the Rain ISBN 978-81-237-0598-9

*कामाक्षी बालसुब्रम्हण्यन* पृ. 24 ₹ 40.00

*अनुवाद : गं. सी. वडाळकर*

एक शेतकरी कासावीस होऊन पावसाची वाट पाहतोय. वाट पाहताना त्याला एक म्हातारी भेटते. पृथ्वीमायला विश्रांती नको का रे हा तिचा विलक्षण प्रश्न. युसुफ बंगलोरवाला यांची मनात रेंगाळणारी चित्रे.

134. **युआन श्वांगची भारत यात्रा**

Hsuan Tsang's Journey to India ISBN 978-81-237-1797-5

*बेलिंदर आणि हरिंदर धनोआ* पृ. 64 ₹ 40.00

*अनुवाद : निर्मला चंद्रकांत*

चिनी शैलीतील चित्रांनी सजलेला, बौद्ध धर्माच्या शोधात प्राचीन काळी भारतात आलेल्या चिनी प्रवाशाचा जितका रोमहर्षक तितकाच उद्‌बोधक जीवनवृत्तांत.

135. **युगांतरीच्या कथा**

Tales of All Time ISBN 978-81-237-3687-7

*शांता रंगाचारी* पृ. 64 ₹ 45.00

*अनुवाद : सविता जाजोदिया*

नव्या आणि आकर्षक ढंगाने सांगितलेल्या भारतीय पुराणकथा. पी. खेमराज यांची चित्रे.

136. **रविराया आणि चंदाराणी**

The Sun and The Moon ISBN 978-81-237-3910-6

*वर्षा दास / अनुवाद : सुषमा सोनक* पृ. 16 ₹ 40.00

एका लोककथेवर आधारित ह्या पुस्तकाच्या आकर्षक चित्रसजावटीसाठी चित्रकार जगदीश जोशी ह्यांना नोमा कॉंकर्स, जपान येथील प्रशस्ती सन्मान लाभलेला आहे.

137. **रवींद्रनाथ टागोरांचे घर**

Jorasanko House ISBN 978-81-237-3695-2

*लीला मजुमदार / अनुवाद : रमेश मुधोळकर* पृ. 72 ₹ 55.00

जोरासांको येथील त्यांच्या प्रसिद्ध निवासस्थानी रवींद्रनाथ टागोरांचे बालपण कसे व्यतीत झाले आणि त्यांची संवेदनशीलता कशी आकाराला येत गेली याची अविस्मरणीय कहाणी. अनेक कृष्णधवल छायाचित्रे.

138. **रस्टीचे पराक्रम**

The Adventures of Rusty ISBN 978-81-237-1825-5

*रस्किन बाँड* पृ. 96 ₹ 45.00

*अनुवाद : क. दि. सोनटक्के*

रस्किन बाँड या प्रसिद्ध लेखकाच्या दोन किशोर कादंबरीकातील रस्टीच्या किशोर वयातील सुरस हकिकती. त्याने आखलेला पलायनाचा बेत वाचताना प्रत्येक वाचकाला आपल्या बालवयाचा पट स्मरेल. मराठी बालकुमार साहित्य संमेलनातर्फे उत्कृष्ट अनुवादाचे 1996-97 चे पारितोषिक.

139. **रामकथा**

The Prince of Ayodhya ISBN 978-81-237-3721-8

*हंसा मेहता / अनुवाद : मालती दांडेकर* पृ. 64 ₹ 40.00

महाकवी वाल्मिकीच्या रामायणाची ही छोट्यांसाठी सांगितलेली कहाणी. सुकुमार चटर्जी यांची चित्रे.

140. **रेडक्रॉस**

The Story of the Red Cross ISBN 978-81-237-3724-9

*कृष्ण सत्यानंद* पृ. 64 ₹ 35.00

*अनुवाद : दीपक कुमार*

जगाच्या पाठीवर रेडक्रॉस चळवळीचे नाव उज्ज्वल करणाऱ्या हेन्री ड्युनॉ यांच्या अथक परिश्रमांची कथा. सिद्धार्थ बानर्जी यांची चित्रे.

141. **रोहंत आणि नंद्रीय**
Rohanta And Nandriya ISBN 978-81-237-0113-4
*कृष्ण चैतन्य* पृ. 64 ₹ 50.00
*अनुवाद : शोभा वराडपांडे*
जातकावर आधारित अशा या दोन कथांमध्ये एकात कृष्णमृगाची कथा सांगितली आहे तर दुसऱ्यात एका वानराची. प्रणब चक्रवर्तीची चित्रे.

142. **रंगाचा उत्सव**
Festival of Colours ISBN 978-81-237-3699-1
*मधू पोवळे* पृ. 64 ₹ 35.00
रंगांची ओळख करून देणाऱ्या या पुस्तकात होळीच्या सणाच्या आणि रंग खेळणाऱ्या कृष्णाच्या पार्श्वभूमीचा अचूक उपयोग केला गेला आहे.

143. **लाल पतंग**
Red Kite ISBN 978-81-237-3742-3
*गीता धर्मराजन* पृ. 24 ₹ 25.00
*अनुवाद : शशांक कुलकर्णी*
आकाशात उंच उडत जाणाऱ्या लाला पतंगाची गोष्ट. शरदिन्दू सेन रॉय यांची खिळवून ठेवणारी चाररंगी चित्रे.

144. **लालू आणि लाल पतंग**
Lalu and the Red Kite ISBN 978-81-237-3191-9
*आशिष सेनगुप्ता* पृ. 16 ₹ 35.00
*अनुवाद : सुषमा सोनक*
लालू नावाच्या छोट्या मुलाचा पतंग हरवल्यावर तो आणि त्याचा राजा नावाचा कुत्रा पतंग परत आणायला जंग जंग पछाडतात. सुंदर चित्रांनी सजलेली शालापूर्व कहाणी.

145. **वनरक्षकाचे साहस**
Adventures of a Wildlife Warden ISBN 978-81-237-0603-0
*इ. आर. सी. देवीदार* पृ. 64 ₹ 45.00
*अनुवाद : भगवती ज. वाटाणे*
हस्तिदंतासाठी एका भल्या मोठ्या हत्तीच्या मागावर असलेल्या चोरट्यांची एक वन्यजीवसंरक्षकाशी गाठ पडते तेव्हा काय होते हे सांगणारी थरारक कहाणी.

146. **वर्तुळ पूर्ण करा**

Find the Half Circle ISBN 978-81-237-3709-2

*बद्री नारायण* पृ. 16 ₹ 30.00

छोट्या मुलांना अर्धवर्तुळाची कल्पना समजावून सांगायला एक प्रसिद्ध चित्रकाराने तयार केलेले मजेदार चित्रपुस्तक.

147. **वरात**

Procession : 1 to 10 ISBN 978-81-237-4217-5

*मिकी पटेल* पृ. 16 ₹ 35.00

लग्नाच्या वरातीमधील विविध घटनाप्रसंगातून मोजायला शिकवणारे एका थोर भारतीय चित्रसज्ञाकाराच्या कुंचल्यातून साकार झालेले अप्रतिम शालापूर्व पुस्तक.

148. **वाळवंटातील थरार**

Adventures in the Desert ISBN 978-81-237-3566-5

*शेरील राव / अनुवाद : सुजला देव* पृ. 72 ₹ 50.00

महानगरातील चंगळवादी संस्कृतीत वाढणाऱ्या दोन भावंडांना कच्छ प्रदेशातील प्राचीन सिंधु संस्कृतीचा शोध लागतो. पुरातत्त्वशास्त्राचा रंजक परिचय करून देणारी वेधक कहाणी.

149. **विणू लागली आजी**

Granny Knits ISBN 978-81-237-2959-6

*युरी ऑरलेव्ह* पृ. 44 ₹ 45.00

*अनुवाद : निरंजन उजगरे*

मूळ हिब्रू भाषेतील ह्या पुस्तकात एक आजी लोकरीचं इवलंसं घर, घरात पलंग, चहाची किटली अन् सरतेशेवटी लोकरीचीच मुलं विणते. पण त्या मुलांना शाळेत घेतलं जात नाही, तेव्हा काय होतं? जगाच्या पाठीवरून सर्वत्र नाकारल्या गेलेल्या ज्यू लोकांचा दाहक अनुभव अतिशय संयततेने, कल्पनारम्यतेने व्यक्त करणारे, वाचलेच पाहिजे असे एक पुस्तक.

150. **वीरांच्या कथा**

Viron Ki Kahaniyan ISBN 978-81-237-0472-0

*राजेंद्र अवस्थी* पृ. 64 ₹ 17.00

*अनुवाद : शोभा वराडपांडे*

श्रावण, एकलव्य, अभिमन्यू, कृष्ण, लवकुश आणि भरत अशा पुराणकथांतील वीरांच्या कथा शरदिंदू सेन रॉय यांच्या चित्रांनी सजवल्या आहेत.

151. **वेडा आंबा**

Mad Mango ISBN 978-81-237-0604-7

*आ. ना. पेडणेकर* पृ. 32 ₹ 55.00

एका आंब्याच्या झाडाला एकदा जग पाहायची लहर येते आणि झाड सफरीला निघतं. झाडाचे चित्रविचित्र अनुभव सांगणारी समर्थ भाषाशैली आणि परिणामकारक चित्रे.

152. **वैश्विक देणगी**

The Cosmic Gift ISBN 978-81-237-4005-8

*मोहन सुंदर राजन* पृ. 56 ₹ 40.00

*अनुवाद : निर्मला चंद्रकांत*

तीन मंदबुद्धी मुलांच्या शीरेतून एक द्रव्य देण्यात येते. ती अतिशय हुशार बनतात व कोणती धमाल उडवतात ते सांगणारी रंजक विज्ञानकथा.

153. **वृक्षांच्या विश्वात**

The World of Trees ISBN 978-81-237-2196-5

*रस्किन बाँड* पृ. 64 ₹ 100.00

*अनुवाद : सुमती सरन*

भारतातील काही नेहमीच्या पाहण्यातील झाडे, त्यावर घर करणारे पक्षी आणि त्यांच्याशी जोडलेल्या दंतकथा या पुस्तकात एका सिद्धहस्त लेखकाने सांगितल्या आहेत. कल्लोल मजुमदार यांची मनोज्ञ चित्रे.

154. **शहाणे आणि चतुर प्राणी**

The Wise And The Willy ISBN 978-81-237-3714-0

*कला थैरानी* पृ. 32 ₹ 55.00

*अनुवाद : नीना हेजीब*

रानातील सहा चतुर प्राणी बलवान प्राण्यांवर कशी मात करतात याची रंजक गोष्ट.

155. **शेपटीची गोष्ट**

The Tale of Trouble ISBN 978-81-237-3743-0

*एम. सी. गॅब्रियल / अनुवाद : सुनंदा देशपांडे* पृ. 32 ₹ 45.00

आपली लांबलचक शेपटी हरवून बसलेल्या एक उंदराने ती परत मिळवण्यासाठी काय धडपड केली असेल? ज्योतिष दत्त गुप्तांची लोभस चित्रे.

156. **शेपट्या**
Tails ISBN 978-81-237-0962-8
*हायड्रोज आलुवा / अनुवाद : सुषमा सोनक* पृ. 24 ₹ 45.00
वेगवेगळ्या प्राण्यांच्या शेपट्यांचा बाज कसा असतो हे सांगताना या पुस्तकात हनुमानाच्या शेपटीचा संदर्भदेखील नेमका आला आहे. अतनू रॉय यांची नर्मविनोदी चाररंगी चित्रे.

157. **शेरू आणि मिठ्ठू**
Sheru And Mitthu ISBN 978-81-237-2875-1
*मनोरमा जफा / अनुवाद : सुषमा सोनक* पृ. 16 ₹ 12.00
शेरू कुत्रा आणि मिठ्ठू या शाळकरी मुलाचा एकमेकांवर फार जीव असतो. एके दिवशी शेरूला गांधीलमाशी चावते, आणि मग? मुलांचे मुक्या प्राण्यांवरील प्रेम व्यक्त करणारे पुस्तक. जगदीश जोशी यांची चित्रे.

158. **समुद्राकाठचं गाव**
Samudrakathache Gav ISBN 81-237-2646-5
*अनिता देसाई* पृ. 180 ₹ 35.00
*अनुवाद : विजया देव*
या कादंबरीत सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक परिवर्तनाची चाहूल लागलेल्या भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील एक खेडेगावाचे, तेथील निसर्गाचे, आणि बदलत्या परिस्थितीतील लोकांचे कुशल चित्रण आहे.

159. **सांगा चलाख कोण**
Who's Smarter ISBN 978-81-237-3190-2
*गीता अय्यंगार* पृ. 36 ₹ 55.00
*अनुवाद : मंगला गोडबोले*
अतनू रॉय ह्यांच्या अप्रतिम चित्रांनी सजलेले, अनेक कुरघोड्यांची कहाणी सांगून हसविणारे पुस्तक.

160. **सागर सफर तृष्णाची**
The Voyage of Trishna ISBN 978-81-237-4073-7
*ब्रिगेडियर टी. पी. एस. चौधरी* पृ. 80 ₹ 35.00
*अनुवाद : श्रीकांत लागू*
शीडनौकेतून पहिल्यांदा पृथ्वीप्रदक्षिणा घालणाऱ्या भारतीय नौदलाच्या साहसी उपक्रमाची रोमांचकारी कहाणी.

161. **सापांविषयी**

The Snakes Around Us ISBN 978-81-237-2194-1A

*झई आणि रॉम व्हिटेकर* पृ. 64 ₹ 25.00

*अनुवाद : वसंत शिरवाडकर*

भारतातील विषारी आणि बिनविषारी सापांची माहिती. त्यांच्या प्रमुख जाती, त्यांची अंडी आणि पिल्ले यांची चाळिसाहून अधिक छायाचित्रे.

162. **सुंदर मोठ्ठे जग**

The Whole Wide World ISBN 978-81-237-6848-9

*जयंती मनोकरण* पृ. 16 ₹ 30.00

*अनुवाद : राहुल कोसम्बी*

हे सजीव-निर्जीव वस्तूंनी बनलेलं सगळं जग खूपच सुंदर आहे. चला थोडं लहान होऊन पुन्हा पाहू सगळं!

163. **सिंहुला शिकला गर्जना करायला**

A Baby Lion Learns to Roar ISBN 978-81-237-3215-5

*इंदु राणा* पृ. 24 ₹ 55.00

*अनुवाद : अनंत भावे*

सिंहाचा एक छोटासा छावा नाना करामती करणाऱ्या शिक्षकांकडून गर्जना करायला शिकू पाहतो आणि काय धमाल उडते हे सांगणारे अप्रतिम पुस्तक.

164. **सुब्रम्हण्य भारती**

Subramanyam Bharati ISBN 978-81-237-1868-3

*रा. अ. पद्मनाभन* पृ. 64 ₹ 45.00

*अनुवाद : संजीवनी खेर*

लोकमान्यांच्या स्वराज्यमंत्राने प्रेरित झालेल्या थोर देशभक्त तामिळ कवीचे हे छोट्यांसाठी चैतन्यदायी चरित्र.

165. **सुरस गोष्टी**

Stories of Light & Delight ISBN 978-81-237-2198-9A

*मनोज दास* पृ. 64 ₹ 35.00

*अनुवाद : लीलावती भागवत*

काही दुर्लक्षित पण सुंदर लोककथा प्रसिद्ध उडिया लेखक मनोज दास यांच्या शब्दात. मारियो मिरांडा यांची वैशिष्ट्यपूर्ण चित्रे.

166. **सूर्यफुले आणि फुलपाखरे**
Sunflowers and Butterfly ISBN 978-81-237-2872-7
*जयंती मनोकरन* पृ. 24 ₹ 15.00
*अनुवाद : वत्सला शिरोडकर*
एक लहान मुलीने रंगविलेले फुलपाखरू उडत उडत तिला एका भव्य प्रासादात घेऊन जाते. तिचा अवखळ लहान भाऊ तेथील राजकुमार झालेला तिला आढळतो. कल्पनाशक्तीला वाव देणारे सुजाशा दासगुप्ता यांनी सजविलेले चित्ररम्य पुस्तक.

167. **सुंदर मोर**
